# UNIVERSITY GRANT COMMISSION

(WRO PUNE)

## MINOR RESEARCH PROJECT

(FINAL REPORT)

## SUBJECT :- " VASUDEVACHI GEETE - EK CHIKITSTAK ABHYAS"

TENURE :- 2 YEARS

**FILE NO. :- 23-1525/14, DATE 15th FEB. 2017**

**JOINT SECRETARY**

**UNIVERSITY GRANT COMMISSION**

**WESTERN REGIONAL OFFICE**

**UNIVERSITY OF PUNE, PUNE - 7**

**IN THE SUBJECT OF MARATHI**

**RESEARCHER**

**PROF. DR. SUBHASH DINKAR AHER**

**RAYAT SHIKSHAN SANSTHA'S**

**RADHABAI KALE MAHILA MAHAVIDYALAYA**

**AHMEDNAGAR**

**TAL.DIST. AHMEDNAGAR - 414001**

# विद्यापीठ अनुदान मंडळ, पश्चिम विभाग, पुणे

लघुसंशोधन प्रकल्प (मायनर रिसर्च प्रोजेक्ट)

# विषय :- "वासुदेवाची गीते - एक चिकित्सक अभ्यास"

कालावधी - २ वर्ष

फाईल नं. :- २३ -१५२५/१४ दिनांक १५ फेब्रुवारी २०१७

## सहायक सचिव, विद्यापीठ अनुदान आयोग

## पश्चिम विभागीय कार्यालय, पुणे विद्यापीठ, पुणे - ७

विषय :- मराठी


अभ्यासक

प्रा.डॉ. सुभाष दिनकर आहेर

रयत शिक्षण संस्थेचे

राधाबाई काळे महिला महाविद्यालय

अहमदनगर

ता.जि.अहमदनगर - ४१४००१

# DECLARATION BY THE RESEARCHER

I hereby declare that this Minor Research Project titiled, " **Vasudevachi Geete - Ek Chikitstak Abhyas** " submitted is based on actual work carried out by me. Any reference to work done by any other person or institution or any material obtained from other sources have been duly cited and referenced. It is further to state that this work is not submitted anywhere else for any examination.

**Date -** **Signature of the Researcher**

**Place - Ahmednagar** **Prof. Dr. Aher Subhash Dinkar**

# ACKNOWLEDGEMENT

I express my sincere gratitude to principal Dr. D.D. Patil, Principal Dr. M.V. Bobade, Vice Principal Dr. B. K. Auti, Dr. M.B. Karande and all the colleagues of my college for their valuable guidance, continuous support throughout this Minor Research Project.

I sincerely thank all the vasudevas e.g. Mr. Mahadev Satpute, Mr. Suryabhan Tarapure, Mr. Amit Vidhate, Mr. Nitin Vidhate. They gave me their valuable time and songs. They also gave me permission for taking their photos, video recording for songs & Interviews.

I also thank to scholar of folklore Dr. Prakash Khandge & Dr. Ramchandra Dekhane. They gave me new information about vasudev. Mr. Bhagwan Raut, Social worker gave me information about old Artist in folk-art through his interview. My friends Mr. Eknath Zaware, Mr. Navnath Khare, Mr.Yogesh Shelke, Mr. Govind Potjale, Mr. Chandrakant Sonawane helped me for this research work.

I would like to thank my family who are my pillars of strength and encouragement. Their contributions cannot be put in words and I cannot thank them enough. And last, I would like to thank all persons who have helped me directly or indirectly.

**Dr.Subhash Dinkar Aher**

**Date -**

# संशोधन प्रकल्प शीर्षक

## वासुदेवाची गीते : एक चिकित्सक अभ्यास

### अनुक्रमणिका


| प्रकरणाचे नाव | | पृ.क्र. |
|---|---|---|
| प्रकरण पहिले – लोककलावंत, लोकसंस्कृती व प्रयोगात्म लोककला | | १ ते ९ |
| १.१ | प्रास्ताविक | |
| १.२ | लोककलावंतांचे लोकसंस्कृतीतील स्थान | |
| १.३ | लोकसाहित्याची व्याप्ती | |
| १.४ | लोकसंस्कृतीचे स्वरुप | |
| १.५ | लोकसंस्कृतीचे लोककलावंत व लोकसंस्कृती | |
| १.६ | प्रयोगसिद्ध लोककला व लोककलावंत | |
| १.७ | निष्कर्ष | |
| १.८ | समारोप | |
| | संदर्भटिपा | |
| प्रकरण दुसरे :– वासुदेव – कलाविष्कार स्वरुप | | १० ते २५ |
| २.१ | प्रास्ताविक | |
| २.२ | वासुदेव परंपरा | |
| २.३ | रंगभूषा–वेशभूषा–वाद्यसंगीत – जीवनपध्दती | |
| २.४ | कलेची संहिता व सादरीकरण | |
| २.५ | वासुदेवाची गीते व कलाविष्कार – वर्गीकरण | |
| २.६ | वासुदेवाचा कलाविष्कार : आस्वाद व नाटयमयता | |
| २.७ | समारोप | |
| | संदर्भटिपा | |

| | | |
|---|---|---|
| प्रकरण तिसरे :- वासुदेवाची संकलित गीते – आशयविविधता | | २६ ते ४५ |
| ३.१ | प्रास्ताविक | |
| ३.२ | वासुदेवाची संकलित गीते – आशयविविधता | |
| | १. वासुदेव सूर्यभान तारापुरे – गीत क्र.१ व आशय | |
| | २. वासुदेव सूर्यभान तारापुरे व सहकारी – गीत क्र.२ व आशय | |
| | ३. वासुदेव सूर्यभान तारापुरे – गीत क्र.३ व आशय | |
| | ४. वासुदेव सूर्यभान तारापुरे – गीत क्र.४ व आशय | |
| | ५. वासुदेव ज्ञानदेव जोशी – गीत क्र. ५ व आशय | |
| | ६. वासुदेव नितीन विधाते – गीत क्र.६ व आशय | |
| | ७. वासुदेव अमित विधाते – गीत क्र.७ व आशय | |
| | ८. वासुदेव नितीन विधाते – गीत क्र.८ व आशय | |
| | ९. वासुदेव नितीन विधाते – गीत क्र.९ व आशय | |
| | १०.वासुदेव नितीन विधाते – गीत क्र.१० व आशय | |
| | ११.वासुदेव नितीन विधाते – गीत क्र.११ व आशय | |
| | १२. वासुदेव अमृत वाघ – गीत क्र. १२ व आशय | |
| | १३.वासुदेव अमृत वाघ – गीत क्र. १३ व आशय | |
| | १४.वासुदेव अमृत वाघ – गीत क्र. १४ व आशय | |
| ३.३ | वासुदेवाची संकलित गीते – आशयवैविध्य व सौंदर्य | |
| ३.४ | समारोप | |
| | संदर्भटिपा | |
| प्रकरण चौथे :- वासुदेवाची गीते – महत्त्वपूर्ण विशेष | | ४६ ते ५४ |
| ४.१ | प्रास्ताविक | |
| ४.२ | वासुदेवाची गीते – महत्त्वपूर्ण विशेष | |

| | | |
|---|---|---|
| | १. लोकभाषा व शब्दवैभव | |
| | २. कथाकथन कौशल्य | |
| | ३. प्रयोगात्म कला - एकपात्री प्रयोग | |
| | ४. नीतिबोधाची शिकवण | |
| | ५. विचारसौंदर्य | |
| | ६. कल्पनासौंदर्य | |
| | ७. भावभावनांची अभिव्यक्ती | |
| | ८. सूचकता | |
| | ९. दान पावते करण्याची पध्दती | |
| | १०.स्थलविशिष्टता | |
| | ११.आजच्या प्रश्नांविषयी जाणीवजागृती | |
| ४.३ | समारोप | |
| | संदर्भटिपा | |
| प्रकरण पाचवे :- वासुदेव, लोककलेचे अभ्यासक व सामाजिक कार्यकर्ते यांच्या मुलाखती आणि निष्कर्ष | | ५५ ते ७० |
| ५.१ | प्रास्ताविक | |
| ५.२ | वासुदेवांच्या मुलाखती | |
| | ५.२.१ वासुदेवांच्या मुलाखती व वर्तमानपत्रातून भेटलेले वासुदेव | |
| | ५.२.२ वासुदेव महादेव सातपुते यांची मुलाखत | |
| | ५.२.३ वासुदेव अमित विधाते यांची मुलाखत | |
| ५.३ | लोककलेचे अभ्यासक - डॉ.प्रकाश खांडगे यांचे विचार व मुलाखत | |
| ५.४ | लोककलेचे अभ्यासक - डॉ.रामचंद्र देखणे यांचे लोककलाविष्कार व वासुदेव याविषयक विचार | |

| | | |
|---|---|---|
| ५.५ | लोककलेचे अभ्यासक व सामाजिक कार्यकर्ते श्री.भगवान राऊत यांचे विचार व मुलाखत | |
| ५.६ | निष्कर्ष | |
| ५.७ | समारोप | |
| | संदर्भटिपा | |

परिशिष्टे :-

१. क्षेत्रीय संशोधन करत असताना वासुदेव, लोककलेचे अभ्यासक, सामाजिक कार्यकर्ते यांची घेतलेली छायाचित्रे पृ. I ते IV

२. सूची पृ. ७१ ते ७६

अ) संदर्भग्रंथ सूची

ब) निर्देश सूची

१. ग्रंथनाम

२. व्यक्तिनाम

३. स्थलनाम

४. विषयनाम

# प्रकरण पहिले

## लोककलावंत, लोकसंस्कृती व प्रयोगात्म लोककला

## प्रकरण पहिले

# लोककलावंत, लोकसंस्कृती व प्रयोगात्म लोककला


१.१ प्रास्ताविक

१.२ लोककलावंतांचे लोकसंस्कृतीतील स्थान

१.३ लोकसाहित्याची व्याप्ती

१.४ लोकसंस्कृतीचे स्वरुप

१.५ लोकसंस्कृतीचे लोककलावंत व लोकसंस्कृती

१.६ प्रयोगसि**द्ध** लोककला व लोककलावंत

१.७ निष्कर्ष

१.८ समारोप

संदर्भटिपा

# प्रकरण पहिले

## लोककलावंत, लोकसंस्कृती व प्रयोगात्म लोककला

### १.१ प्रास्ताविक :-

लोककलावंतांनी लोककलेची परंपरा जागविली. लोककलेतून मनोरंजन केले व समाजप्रबोधनही केले. महाराष्ट्रात प्राचीन काळापासून समाजाला काहीतरी सांगणारा, शिकविणारा आणि आपल्या पारंपरिक लोककला प्रकारातून समाजाचे मनोरंजन व प्रबोधन करणारा असा एक वर्ग होता. मराठी संस्कृतीचे ते एक चालते बोलते वैभवच होते. लोकसंवादाचे ते एक प्रधान माध्यम होते. या कलावंतांनी लौकिक ज्ञानाचा वारसा नंतरच्या पिढीपर्यंत पोहचविला. महत्त्वाचे म्हणजे लोकशिक्षणाचे व लोकप्रबोधनाचे काम केले. त्यांनी "समूहभावाची निर्मिती आणि समूहनिष्ठ अस्मितेची जागृतीही केली" [१] त्यांची लोककला एका अर्थाने लोकाविष्कारच होती.


### १.२ लोककलावंतांचे लोकसंस्कृतीतील स्थान :-

परंपरेने प्रचलित असलेली अत्यंत प्रभावी अशी लोकसंवादमाध्यमे म्हणजे लोककलावंतांचे कलाविष्कार होय. त्यांनी लोकसंस्कृतीचे जतन व संवर्धन केले. हे सर्व लोककलावंत म्हणजे लोकरंगभूमीवरील लोककलाकारच होत. हे लोककलावंत जेव्हा आपली कला सादर करतात तेव्हा त्यांची व प्रेक्षकांची मनोभूमिका एकच असते. त्यांच्यात एक आंतरिक संबंध निर्माण झालेला असतो म्हणूनच त्यांनी केलेला उपदेश, सांगितलेले ज्ञान चटकन समजते. कारण हे सर्व ते लोकभाषेतून करत असतात. आजही कुटुंबकल्याण कार्यक्रम, साक्षरता प्रसार, अंधश्रध्दा निर्मूलन, वृक्षलागवड इ. प्रसार करण्यासाठी हे लोकसंवाद माध्यम उपयुक्त आहेत. वरील प्रकारच्या इतरही काही राष्ट्रीय कार्यक्रमात लोकजागरणासाठी लोकसंवाद माध्यमाचा पुरेपूर उपयोग केला पाहिजे.

विचारांचे आदानप्रदान म्हणजे संप्रेषण होय. आदर्श संप्रेषण प्रक्रियेत नुसतेच विचाराचे प्रदान होत नाही पण त्याबरोबर विचाराचे आदानही होत असते. म्हणूनच प्रभावी संप्रेषणाचे माध्यम म्हणून लोकसंस्कृतीच्या कलावंतांचा उल्लेख करता येईल. इतर जनसंपर्क माध्यमाव्दारे उदा. दूरदर्शन, आकाशवाणी, वर्तमानपत्रे इ.तून एकमार्गी संप्रेषण होते.

याठिकाणी फक्त ज्ञान प्रदान केले जाते. सहसंवाद असा भाग नसतो. ग्राहकाची प्रत्यक्ष कोणतीही कृती अथवा सहभाग नसतो. फक्त आदानाची भूमिका तो स्वीकारतो. लोकसंवाद माध्यमांच्या बाबतीत मात्र असे म्हणता येणार नाही. प्रभावी संवादमाध्यम म्हणून जी काही वैशिष्टये आहेत ती आपणास लोकसंस्कृतीच्या कलावंतांच्या कलाविष्कारातून दिसून येतील. "पहाटेपासून गावात येणारा लोककलाकारांचा वर्ग गावाच्या लोकजीवनाशी एकरुप झालेला असतो. हया लोकभूमिका म्हणजे मनोरंजनातून लोकशिक्षण देणारं आणि अंगणाअंगणात स्थिरावलेलं स्वतंत्र लोकविद्यापीठच म्हणावं लागेल" [२] त्यांचा संवाद हा लोकभाषेतच होता. लोकसंवादमाध्यमाव्दारे होणारे संप्रेषण हे व्दिमार्गी असते. गोंधळी, वाघ्यामुरळी, वासुदेव, बहुरुपी इ. लोककलावंतांच्या माध्यमातून व्दिमार्गी संप्रेषण–

प्रक्रिया दिसून येते. याठिकाणी ज्ञानाबरोबरच श्रध्दा व भावनेलाही आवाहन केलेले असते. ग्राहकाचा प्रत्यक्ष सहभाग असतो.




वरील प्रभावी लोकसंवादमाध्यमामुळे या सर्वच कलावंतांचे लोकसंस्कृतीच्या संवर्धनामध्ये फार मोठे योगदान आहे. ज्यावेळी समाजात कसलीही प्रसारमाध्यमे, मनोरंजनाची साधने नव्हती, अशावेळी सर्वच लोककलावंतानी मनोरंजाबरोबरच नीतिबोधाची शिकवण दिली. ती किती प्रभावी होती हे वरील आकृतीतून लक्षात येईल.

१.३ लोकसाहित्याची व्याप्ती :-

लोकसाहित्याची व्याख्या करणे तसे अवघड काम आहे. अभ्यासकांनी व्याख्या करण्याचा प्रयत्न केला. व्याख्या करतानाच त्यांनी लोकसाहित्याचे विशेष, लक्षणे व घटक सांगण्याचा प्रयत्न केलेला आहे. लोकसाहित्य ही संज्ञा व्यापक अर्थाची असल्यामुळे व पारंपरिक लोकजीवनाच्या सर्व माध्यमांतून झालेल्या आविष्काराचा समावेश त्याच्यात करण्यात येत असल्यामुळे त्याची व्याप्ती मोठी आहे.

"लोकसाहित्यात परंपरेने चालत आलेल्या लोकजीवनातील ज्या विशेषांचा समोवश होतो त्यांना स्थूलमानाने चार विभागात विभागले जाते"[३]

१. मौखिक आविष्कार :- पारंपरिक लोकजीवनाच्या शब्दबध्द आविष्काराचा यात समावेश होतो. उदा. लोककथा, लोककथागीते, लोकगीते, म्हणी, वाक्प्रचार, प्रहेलिका, उखाणे, मंत्र इ.

२. भौतिक संस्कृती :- यांत्रिकीकरणापूर्वी लोकजीवनात जे विशेष प्रचलित होते आणि अजूनही परंपरेने चालत आलेले आहेत त्या सर्वांचा समोवश भौतिक संस्कृतीमध्ये होतो. यात परंपरागत चालत आलेली सुतार, लोहार इ. ची कौशल्ये, तंत्र यांचा अंतर्भाव असतो. कुंभार, सोनार आदी व्यावसायिकांची कौशल्ये, शेतक-यांचे कृषिकर्म करण्याची पध्दती, घरे बांधणे, अवजारे तयार करणे इ. कौशल्ये.

३. लोकरुढी, विधी, समजूती इत्यादी :- मौखिक आविष्कार व भौतिक संस्कृती या दोहोंशी संबंध असणारा परंतु त्यांच्यापेक्षा निराळा असा तिसरा महत्त्वाचा विभाग लोकरुढी, विधी, समजुती इत्यादींचा असतो. समूहाने केलेल्या कृतीचा अंतर्भाव यात असतो. या रुढी कुटुंबाच्या किंवा समूहाच्या असतात आणि कुटुंबातील किंवा समूहातील सर्व व्यक्ती त्या रुढी पाळतात. याच्या मुळाशी काही लोकविश्वास, समजुती किंवा लोकभ्रम असतात. जन्म, बारसे, लग्न, मर्तिक इ. विधी, दृष्ट काढणे, घराच्या उंबरठयावर घोडयाचा नाल ठोकणे या सर्वांच्या मागे कुठली तरी समजूत असते. या समजुती, भ्रम एका पिढीपासून दुस-या पिढीपर्यंत चालत येतात. सामुदायिक सण, उत्सव यांचेही स्वरुप असेच असते. लोकरुढीला धार्मिक स्वरुपही असते. उपासनापध्दती, नवस, यात्रा, धोंडामारी इत्यादीचाही समावेश या विभागात करावा लागेल.

४. प्रयोगसिध्द लोककला :- लोकसंगीत, लोकनृत्ये, नृत्यखेळ, विधिनाटय यांचा समावेश यात असतो. रांगोळी, गोंदणे, सण किंवा विधीच्या प्रसंगी भिंतीवर काढावयाची चित्रे, लोकगीतगायकाने केलेले गायन, लोकनाटयाचे विविध कलाविष्कार, लोकसंस्कृतीच्या उपासकांचा कलाविष्कार इत्यादींचा समावेश यात करण्यात येतो.

मौखिक आविष्कार, भौतिक संस्कृती, लोकरुढी, विधी, समजुती आणि प्रयोगसिध्द लोककला या चार विभागातून लोकसाहित्याच्या व्याप्तीचा प्रत्यय येतो.

## १.४ लोकसंस्कृतीचे स्वरुप :-

संस्कृती हा शब्द संस्कार या शब्दापासून बनलेला आहे. बौध्दिक, कलात्मक, मानसिक व भावनिक विकासातून संस्कृती सिध्द होत असते. व्यवहारासंबंधीच्या शिकवणुकीला किंवा शिकलेल्या मानवी व्यवहारालाच संस्कृती म्हणता येईल. संस्कृतीमुळे मानवात एकसंघता विकसित होत असते. त्यामुळेच मानव एकत्र संघटित स्वरुपात राहतो. संस्कृती ही सदैव प्रवाही, गतिशील असते. प्रवाहीपणा अथवा अखंड संचारण हे संस्कृतीच्या जिवंतपणाचे लक्षण असते. संस्कृतीत मानवनिर्मित वस्तूंचा, वैयक्तिक प्रेरणांचा, कृतिउक्तींचा अंतर्भाव असतो. विविध वैशिष्टयपूर्ण व अर्थपूर्ण वाटणा-या प्रतीकांचा विचारही संस्कृतीत होतो. म्हणजेच संस्कृती प्रतीकरुप असते. "एखाद्या देशाची एकूण संस्कृती ही अनेक लोकसंस्कृतीच्या सुसंघटनेतून साकार होत जाते व ती प्रवाही बनते"[४] याचाच अर्थ संस्कृती बहुआयामी असते.

'लोकसाहित्य' पदातील 'लोक' हा शब्द जे अर्थ सूचित करतो. तेच अर्थ 'लोकसंस्कृती' मधील 'लोक' सूचित करतो. परंपरेने चालत आलेले जीवन जगणारे, अकृत्रिमतेचा स्वीकार करणारे लोक म्हणजे लोकसंस्कृतीतील लोक. या लोकांची जीवनपध्दती म्हणजे लोकसंस्कृती. ही लोकसंस्कृती भूपरिसर, धर्म, नीती, लोकव्यवहार, भाषा, दैवतकल्पना, कला, समूहजीवनाच्या रुढी, परंपरा, चालीरीती, सण, उत्सव, लोकश्रध्दा इ. मधून आविष्कृत होत असते. खरे पाहता लोकसंस्कृती ही फार व्यापक संकल्पना आहे. लोकसंस्कृती ही एकूण संस्कृतीचा एक भाग असते. एकूण संस्कृती समजून

घेण्यासाठी त्या संस्कृतीचे एक अंग म्हणून लोकसाहित्य हे एक अनेक साधनांपैकी एक साधन असते. या लोकसंस्कृतीमधून लोकजीवनाचेच दर्शन घडते. लोकसंस्कृती ही कालसापेक्ष असते. काळानुरुप झालेले बदल लोकजीवनावर परिणाम करतात व त्याचे प्रत्यंतर लोकसंस्कृतीतून येते.

लोकजीवनपध्दतीचा अभ्यास म्हणजे लोकसाहित्याचा अभ्यास. लोकसाहित्याचा अभ्यास म्हणजे पर्यायाने लोकसंस्कृतीचा अभ्यास असतो. लोकसाहित्य व लोकसंस्कृती वेगळी करता येणार नाही.

लोकसंस्कृती फक्त ग्रामीण, बहुजन समाजाची व अशिक्षितांची असते असे म्हणणे चुकीचे असते. कारण सुशिक्षित शहरी लोकांमध्येही काही प्रमाणात लोकसंस्कृती असते. लोकसाहित्य या संकल्पनेतील 'लोक' या पदाचा अर्थ तसा आपण मर्यादित स्वरुपात घेत असल्यामुळे लोकसंस्कृतीसही मर्यादित अर्थ दिला जातो. लोकसंस्कृती ही विशिष्ट समूहगटाशी तसेच भूप्रदेशाशी व काळाशी निगडित असते. एखाद्या भूपरिसरात असलेली लोकसंस्कृती त्या परिसरातील सर्व लोकसमूहाला आत्मीयतेच्या, एकात्मतेच्या सूत्रात एकत्र गुंफणारी असते. त्या लोकसमूहातील प्रत्येक व्यक्तीमध्ये 'समूहभाव' निर्माण झालेला असतो. ही लोकसंस्कृती नेहमी विविध पातळयांवर वावरत असते. या पातळया वर - खाली, श्रेष्ठ - कनिष्ठ अशा स्वरुपाच्या नसतात. मात्र विशिष्ट समूहगटाच्या तुलनेत त्या तशा असू शकतात. उदा. एखाद्या गावाच्या यात्राउत्सवात सर्व समूहगटाचे लोक एकाच भावात्म व एकात्म पातळीवर सहभागी झालेले असतात. तर लग्नविधीच्या पध्दती विविध जाती - धर्मानुसार वेगवेगळया असतात.

लोकसंस्कृतीतून एकतेची जाणीव वाढीस लागते. लोकसंस्कृतीच्या भावनिक ऐक्यावरच

तिचे प्रवाहीपण अवलंबून असते. परकीय संस्कृती अथवा राजसत्ता काही काळ विशिष्ट प्रदेशातील विशिष्ट लोकसंस्कृतीवर वर्चस्व गाजविते. परंतु ही लोकसंस्कृती संघर्ष करुन त्या संस्कृतीचे काही अवशेष स्वीकारुन आपल्या अस्मितेशी प्रामाणिक राहून कालपरिसरसापेक्षता सिध्द करत असते व नव्या जोमाने प्रवाहित होत राहते.

नागर भागातही परंपरेने जीवन जगणारे लोक असतातच. परंपेरेने चालत आलेली काही आदर्श मूल्ये, तत्त्वे व जीवनपध्दती नागर लोकांमध्येही दिसतात. म्हणूनच लोकसंस्कृती केवळ अनागर, बहुजनांची नसते, केवळ नागर लोकांची नसते. या दोन्हीमुळे ती बनत असते. या दोन्हीही लोकांमध्ये आढळणारी लोकसंस्कृती हे लोकसाहित्याचे व्यक्त रुप असते. ही लोकसंस्कृती शब्दरुप व कृतिरुप या दोन्ही आविष्कारातून व्यक्त होते.

"कोणत्याही देशाच्या आणि समाजाच्या संस्कृतीचे दर्शन पुढील पाच गोष्टींच्या आधारे घेता येत"[५]

१. जन्मविधी  २. विवाह - विधी व प्रथा  ३. मर्तिक विधी व प्रथा  ४.पारलौकिक तत्त्वज्ञान, नीती, पापपुण्य कल्पना  ५. दैनंदिन कौटुंबिक व व्यावहारिक जीवन.

या पाच गोष्टींचा अभ्यास लोकसाहित्यात केला जातो. एका अर्थाने त्यातून लोकसंस्कृतीचेच दर्शन घडते.

लोकसंस्कृतीच्या जडणघडणीमध्ये कृषिजीवन व निसर्गाचा मोठा वाटा आहे. कृषी व निसर्गाबद्दलचा कृतज्ञता भावच या लोकमानसातून व्यक्त होत असतो. विविध सण, उत्सव, विविध पूजाविधी, रुढी परंपरा या निसर्गाशी संबंधित आहेत. निसर्गाचा सहवास, त्याच्याबद्दलचे कुतूहल लोकसंस्कृतीतून ध्वनित होत असते. ही लोकसंस्कृती परंपरेला अधिक मानते. याठिकाणी कसलाही शास्त्रीय दृष्टिकोन नसतो. ती सामूहिक जीवनशैली असते. या लोकसंस्कृतीस धर्माचे अधिष्ठान आहे. विविध देवदेवतांविषयक कल्पनांचा, श्रध्दा व रीतिरिवाजांचा समोवशही लोकसंस्कृतीत होतो. लोकसंस्कृतीच्या जडणघडणीमध्ये लोकसंस्कृतीचे उपासक व संतांचाही मोठा वाटा आहे. "भागवत धर्माच्या प्रभावाने मराठी लोकसंस्कृतीचे स्वरुप पुष्कळच सौम्य - सात्त्विक बनले आहे"[६]

वेदकाळापासून संस्कृतीचे दोन प्रवाह सांगता येतात. आर्येतरांची, जनसामान्यांची लोकसंस्कृती व आर्यलोकांची अभिजात म्हणजेच वैदिक संस्कृती. कालांतराने या दोन संस्कृतीत आदान प्रदानाची प्रक्रिया सुरु झाली. आदिमसंस्कृती, लोकसंस्कृती व नागर संस्कृती या तिन्हीमध्ये परस्पर आदान प्रदानाची प्रक्रिया चालू असते.

१.५ लोकसंस्कृतीचे लोककलावंत व लोकसंस्कृती :-

लोककलावंतांनी समाजमनाला प्रबोधनाचे, रिझवण्याचे कार्य परंपरेने केले. मराठी लोक धर्म व लोकसंस्कृतीचे जतन केले आहे. हे मागते बहुधा फिरस्ते असतात. आपल्या उदरनिर्वाहासाठी ते भटकंती स्वीकारतात त्यांना लोकगायक असेही म्हटले जाते. लोकसंस्कृतीची जोपासना व उपासना करणा-या या लोकगायकांना रा.चिं. ढेरे यांनी लोकसंस्कृतीचे उपासक असे म्हटले आहे.

मराठी लोकसंस्कृतीत वासुदेव, गोंधळी, वाघ्यामुरळी, मसणजोगी, पोतराज, बहुरुपी, पांगूळ, नंदीबैलवाले, भुत्ये, भराडी, चित्रकथी इत्यादींना आगळेवेगळे स्थान आहे. धर्मविधीच्या प्रसंगी देवतोत्सवात भिक्षा मागताना हे उपासक पारंपरिक गाणी गातात, सादरीकरण करतात. लोकसंस्कृती संपन्न करण्यात या पारंपरिक लोकप्रकटन सस्थांचा महत्त्वाचा वाटा आहे. धार्मिक व सांस्कृतिक जीवनाचे विशेष त्यांच्या गीतातून दिसतात.

"मराठी लोकसंस्कृतीच्या उपासकांचे प्रामुख्याने दोन वर्ग करता येतात"[७]

१. भगताचा एक वर्ग की ज्यात वासुदेव, गोंधळी, वाघ्यामुरळी, जोगी, मसणजोगी, पोतराज, बहुरुपी, पांगूळ, नंदीबैलवाले, भुत्ये, भराडी, चित्रकथी, आराधी, डहाक वाजविणारे कुंभार इत्यादींचा समावेश करता येतो. देवदेवतांच्या उपासनेत यांना 'भगत' म्हणून लोकजीवनात महत्त्वाचे स्थान आहे.

२. लोकांचे केवळ रंजन करण्यासाठी अस्तित्वात असलेले उपासक कलेचे उपासक ज्यात पांगूळ, बहुरुपी, नंदीबैलवाले, कुडमुडे जोशी इ. समावेश होतो.

लोकसंस्कृतीचे उपासक हे कोणत्या ना कोणत्या देवतेचे भगत असतात. समाजातील लोक देखील ज्या देवताचे ते भक्त असतात ते दैवतच दाराशी आले असे समजून मोठया भाविकतेने त्यांना भिक्षा वाढतात. हयांपैकी काही भक्तांचा जणू हक्क असतो. वर्षातून काही विशिष्ट दिवशी दाराशी येऊन हे भगत आपल्या हक्काची भिक्षा मागतात. समाजातील सर्व स्तरातील लोकांकडून

भिक्षा मागण्यात येते. आज या उपासकांच्या काही संस्था नामशेष होत आहेत. तरीही त्यांचा लोकसंस्कृतीच्या जडणघडणीतील सहभाग विसरता येणार नाही. त्यांची उपासना पध्दती, त्यामागील लोकमानस, लोकजीवनातील त्यांचे सांस्कृतिक कार्य, त्यांची पारंपरिक गाणी व कलात्मक आविष्कार इत्यादीतून तत्कालीन समाजजीवनाचे पैलू उलगडतात. लोकजीवनातील असे अनेक उपक्रम हया उपासकांशिवाय होऊच शकत नाही, असे त्यांचे स्थान आहे. उदा. कुलधर्म कुलाचार म्हणून घातलेला देवीच्या गोंधळाचा कार्यक्रम, नवसपूर्ती व कुलाचार म्हणून खंडोबा देवतेचा उपासक वाघ्यामुरळी व त्याचा जागरणाचा कार्यक्रम.

लोकसंस्कृतीच्या उपासकांनी आपापल्या परीने जोपासना करुन मराठी लोकसंस्कृती अधिक उदात्त केली. लोकगीतांच्या माध्यमातून लोकजीवन आदर्शाकडे नेण्याचा प्रयत्न केला. आदर्श मूल्ये समाजात रुजविण्याचाच त्यांचा प्रामाणिक प्रयत्न होता. भैरवाची कृपा संपादन करणारा भराड, मुंज्याची उपासना करणारा डहाक, गावावरील सकंट दूर व्हावे म्हणून गावबांधणी करणारा, मरीआईचा गाडा ओढणारा पोतराज, महादेवाची उपासना करणारा स्मशानजोगी, भल्या पहाटे धर्मगीते गाणारा पांगूळ, मोरपंखी टोपी घातलेला कृष्णभक्त वासुदेव, एक कुलपरंपरा व धर्मविधी म्हणून कलाविष्कार करणारे गोंधळी व वाघ्यामुरळी आदी उपासकांनी लोकसंस्कृतीचा जागरच मांडलेला होता. खऱ्या अर्थाने प्राचीन काळापासून असलेली लोकगायकांची परंपरा या सर्वच उपासकांनी टिकवून ठेवली. लोकभाषेतून व लोकसंवादमाध्यमातून यांनी लोकसंस्कृती शिकविली व घडविली. भ्रष्ट, अप्रामाणिक मनाला ताळयावर आणण्याचे व त्यावर सुसंस्कार करण्याचे, नीतिबोधाचे कार्य आपल्या लोककलेतून या उपासकांनी केले. समाजाचे नैतिक आरोग्य अबाधित ठेवले. नीतिमूल्यांची शिकवण दिली, लोकसंस्कृतीचे संवर्धन केले, लोकमानसात लोकसंस्कृती पोहचविली. त्यांनी पौराणिक कथा, उपदेशपर कथा गीतमाध्यमातून सांगून धर्मश्रध्दा जोपासल्या. समाजातील अनिष्ट प्रवृत्तींवर भाष्य केले. समाजमनाला उदात्तेचा व धार्मिकतेचा स्पर्श होऊन समाजाचे नैतिक आरोग्य चांगले राहिले. धार्मिक विधी व कुलाचार यांची पूर्तता देवदेवतांच्या या उपासकांमार्फत केली जात होती. संतांनी या उपासकांच्या भाषेत, भूमिकेत उपदेश केला. या दोहोंनीही लोकजीवनाला मार्गदर्शन करुन ते आदर्शाकडे नेण्याचा प्रयत्न केला. समाजविसंगती नेमकेपणाने दाखविली. पौराणिक घटनांवर आधारित देवदेवताविषयक श्रध्दा व उपदेशपर कथा सांगून लोकजीवनापुढे आदर्श ठेवले. "संतांनी परमार्थविचार लोकमानसात रुजविण्यासाठी लोकगायनरीतींचा विपुल वापर केल्यामुळे एकूणच लोकसंस्कृतीच्या अभ्यासासाठी महत्त्वाची सामग्री म्हणून संतवाङ्मय उपकारक ठरु शकेल. गोंधळी, भराडी, वाघ्यामुरळी, पांगूळ, बाळसंतोष, वासुदेव इ. अनेक लोकगायकांच्या गीतसरणीचे माध्यम वापरुन संतांनी परमार्थाची अलौकितता लौकिक पातळीवर आणण्याचा प्रयत्न केला"[८]

लोककलावंतांनी आदर्श जीवनाची शिकवण व उपदेश करुन समाजाला अंतर्मुख केले. लोकसंस्कृतीचे भव्य व दिव्य दर्शन घडविले. काळ व परिस्थितीनुरुप झालेले बदल स्वीकारुन लोकमानस घडविले. या उपासकांच्या कलेचा आस्वाद सामूहिक पातळीवरच घेतला जातो. त्यातुनच लोकसंस्कृतीची जोपासना होऊन समूहमनात एकतेची भावना निर्माण होते. क्रियात्मकता, प्रयोगात्मता, विधिसबंध्दता, मंत्रात्मकता, संकेत, नित्यनूतनता, लोकभाषा, लोकमानसाची अभिव्यक्ती आदी वैशिष्टये बहुतांश उपासकांच्या गीतांची आढळतात. त्यांच्या गीतांना धार्मिक व सांस्कृतिक जीवनाचे संदर्भ आहेत. धार्मिकतेतून, मनोरंजनातून त्यांनी उद्‌बोधनाची भूमिका पार पाडली. देवाधर्माविषयीच्या

श्रध्दा जागृत ठेवल्या. ख-या अर्थाने या सर्वच उपासकांना नीतिशिक्षणाचे धडे देणा-या अनौपचारिक संस्थाच म्हटल्या पाहिजे. या उपासकांच्या कलाविष्कातून मराठी जीवनाचे, सुखदुःखाचे व संस्कृतीचे विविध रंगछटा असणारे चित्र साकार होते.

या लोकसंस्कृतीच्या काही पैलूंचा आविष्कार लोकसंस्कृतीच्या उपासकांनी करुन लोकसंस्कृतीचे संवर्धन करण्याचे मोलाचे कार्य केले. त्यांनी धर्माचा जागर केला. लोकधर्म लोकांच्या दारात नेला व हसतखेळत धर्म सांगितला. आपल्या नाटयात्म आविष्कारातून लोकसंस्कृतीचे जतन केले. "लोकसंस्कृतीच्या घडणीत वासुदेव, गोंधळी, भुत्या, वाघ्यामुरळी, भराडी इ. लोकसांस्कृतिक संस्थांचा महत्वाचा वाटा आहे "[९] धर्मभावना जागृत ठेवून समाजाला नीतिबोधाची शिकवण त्यांनी दिली.

१.६ प्रयोगसि**द्ध** लोककला व लोककलावंत :-

लोकसाहित्यातील बहुतांश भाग प्रयोगात्मक स्वरुपाचा आहे. प्रयोगाचे सादरीकरण, कलावंत, प्रेक्षकवर्ग, संहितासंदर्भ, परिसरसंदर्भ यांच्या एकात्मभावातून प्रयोगाचा आविष्कार होतो. लोककलाविष्कारातून सांस्कृतिक इतिहास अभ्यासता येतो. प्रयोगसिध्द लोकसाहित्यप्रकारांचा परस्परांशी फार घनिष्ठ संबंध असतो. लोकसाहित्य हेच मुळी प्रयोगरुप साहित्य आहे. प्रयोगात्मकता हे त्याचे प्रधान वैशिष्टय आहे. प्रयोगातून शब्दसौंदर्य, भावसौंदर्य, विचारसौंदर्य आविष्कृत होतात. क्रियात्मकता व क्रीडनात्मकता प्रयोगसिध्द लोककलेत असते. लोककलेचा प्रयोग म्हणजे मांडणी, विधिनिषेध, वाद्ये, नृत्य, वेशभूषा, मौखिक संहिता, नृत्य, हालचाली व प्रेक्षक यांचा तो एकात्मिक आविष्कारच असतो. यासाठी लोककलेचा प्रयोग पाहणे आवश्यक आहे. मनोरंजनाबरोबरच प्रबोधनाची भूमिका या लोककलांची आहे. या लोककलांच्या प्रयोगाविष्कारात पुढील घटक विचारात घेतले जातात.

१. कलावंत :- त्याची वेशभूषा, पोशाख प्रयोगावेळी विशिष्ट प्रकारचा असतो.

२. प्रेक्षक :- या प्रयोगाचा आस्वाद घेणारा प्रेक्षक श्रध्दाळू, रुढी व परंपरा मानणारा असतो. त्याच्या मनाची जडणघडण लोकजीवनातच झालेली असते. प्रयोगात प्रेक्षक हा एक महत्त्वाचा घटक असतो.

३. प्रयोग :- प्रयोगासाठी आवश्यक बाबी उदा. रंगमंच, वाद्ये, प्रयोग सादरीकरणाचा हेतू, प्रयोगाची मौखिक संहिता, प्रत्यक्ष प्रयोग सादरीकरणावेळी भारलेले वातावरण या सर्वांचा विचार करावा लागतो. लोकपंरपरेने चालत आलेले नाटयाविष्कार हे सदैव संदर्भयुक्तच असतात. लोकरंगभूमीवर प्रेक्षक व कलावंत यांच्यात सतत प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष संवाद होतो. लोकगायक परंपरेने चालत आलेली गाणी स्वतःच्या आवाजात म्हणतात. या गीतांवर लोकपरंपरा व विविध घटकांचा प्रभाव पडतो व संस्कार होतात. प्रत्येक लोककलावंताची वेशभूषा,पोशाख, सादरीकरण, नृत्यपध्दती, वाद्ये इ. वेगवेगळी असतात.

या लोकगायकांजवळ वाक्‌चातुर्य, हजरजबाबीपणा, शब्दलाघव, अभिनय-सामर्थ्य, आवाजातील कणखरपणा इ. गुण असतात. ते संवादकौशल्य व अभिनय कौशल्य यांच्या जोरावर

प्रसंगातले नाटय उभे करतात. वर्तमानकालीन संदर्भ दिले जातात. वर्तमानकालीन स्थितिगतीवर, प्रवृत्तीवर, विकृतीवर, आक्षेपार्ह लक्षणांवर विदारक प्रकाश टाकतात. हे अनुभवण्यासाठी प्रत्यक्ष प्रयोग पाहणे सर्वात महत्त्वाचे आहे.

प्रेक्षकसापेक्षता हे एक वैशिष्टय या लोककलांचे आहे. लोकनाटयाचे सादरीकरण सुरु असताना कलावंत अधूनमधून प्रेक्षकांशी संवाद साधतात. लोकरंगभूमीवरील संवाद तीन प्रकारचे असतात. कथागत पात्रांशी, स्वतःशी व प्रेक्षकांशी संवाद. इतर नाटकात प्रेक्षकांशी संवाद साधला जात नाही. परंतु लोककलांत प्रेक्षकांशी संवाद साधला जातो. लोकनाटयाचे अनेक प्रकार व लोकसंस्कृतीच्या उपासकांचे कलाविष्कार हे धर्मश्रध्देच्या पायावर उभे आहेत. प्रयोगरुप लोककलाप्रकाराचे विधिनाटय व लोकनाटय असे दोन भाग पडतात. हे लोककलावंत रंगभूमी म्हणून झाड, अंगण, सार्वजनिक ठिकाणे, चौक, मंदिर, मोकळी जागा, घराचा ओटा इत्यादींचा वापर करतात. वृक्षाचा रंगभूमीसारखा उपयोग करणारा पांगूळ हा एक आगळावेगळा लोकधर्मोपासक आहे. भल्यापहाटे पारंपरिक वेशभूषेत वासुदेव अंगणात येतो. अंगण हीच त्याची रंगभूमी. टाळ व चिपळयांच्या साथीवर तो गाणी गातो. प्रत्यक्ष प्रयोगावेळी प्रेक्षक किंवा श्रोत्याने दिलेली विविध प्रकारची दाद त्याच्या आस्वादजाणिवेचे स्वरुप स्पष्ट करणारी ठरते. शाब्दिक दाद, मुद्राविभ्रम, हास्य, टाळया आदींव्दारा तो प्रयोगास दाद देतो.

१.७ निष्कर्ष :-

१. लोककलावंतांनी लोककलाविष्कारातून मनोरंजन, समाजप्रबोधन व धर्मश्रध्दावृद्धीचे काम केले. ते असाक्षर किंवा अल्पसाक्षर लोकांना अनौपचारिक शिक्षण देणारे लोकशिक्षकच होते.

२. लोककलावंतानी कलेतून समूहभावाची निर्मिती व समूहनिष्ठ अस्मितेची जागृतीही केली.

३. बहुतेक लोककलाप्रकारांचा उगम धर्मभावनेत आहे.

४. लोककलेचे संगीत परंपराधिष्ठित असते.

५. अनेक लोकसंस्कृतीच्या सुसंघटनेतून एखादया देशाची संस्कृती साकार होत जाते व ती प्रवाही बनते.

६. लोकजीवन व लोकसंस्कृतीचा आविष्कार लोकसाहित्यातून होतो. लोकसाहित्य हा जीवन जगण्याचाच भाग आहे.

७. लोकसाहित्याचे दालन संपन्न, समृध्द व विविधतेने नटलेले आहे. लोकसाहित्याची व्याप्ती फार मोठी आहे. मौखिक आविष्कार, भौतिक संस्कृती, रुढी विधी समजुती, प्रयोगसिद्ध लोककला अशा चार विभागात लोकसाहित्याची व्याप्ती दाखविता येईल.

८. लोकसाहित्यातील लोकांमध्ये समान सौंदर्यभावना, परंपरासातत्य, सामाजिक - सांस्कृतिक एकत्व इ. वैशिष्टये असतात.

१.८ समारोप :-

लोकसंस्कृतीच्या जडणघडणीमध्ये लोककलावंतांचे महत्त्वपूर्ण योगदान आहे. लोककलावंतांनी सादर केलेली कला हा एक प्रयोगच असतो. सर्वच उपासकांच्या कलाविष्काराचे स्वरुप भिन्न आहे. परंतु ते सर्वच कलाविष्कार प्रयोगसिद्ध लोककलाच आहेत. या उपासकांच्या प्रयोगाची संहिता अलिखित असते तसेच लवचिकही असते. कालौघात ती काही बदलही स्वीकारते व नित्यनूतन राहते. वर्तमानाशी ती सुसंगत राहण्याचा प्रयत्न करते.

संदर्भटिपा :-


१. प्रभाकर मांडे, 'लोकरंगभूमी', प्र.आ., गोदावरी प्रकाशन, औरंगाबाद, १९९४, पृ.४१०.

२. डॉ.रामचंद्र देखणे, 'अंगणातील विद्यापीठ', प्र.आ., संस्कृती प्रकाशन, पुणे, २०१७, पृ.८.

३. प्रभाकर मांडे, 'लोकसाहित्याचे स्वरुप', तृ.आ., गोदावरी प्रकाशन, औरंगाबाद, १९९५, पृ.४७ ते ५१.

४. गंगाधर मोरजे, 'लोकसाहित्य आकलन आणि आस्वाद', दास्ताने रामचंद्र आणि कंपनी, पुणे, १९९३, पृ.५.

५. द.ता.भोसले, 'संस्कृतीच्या पाऊलखुणा', प्र.आ., पद्‌मगंधा प्रकाशन, पुणे, २००१, पृ.६३.

६. रा.चिं.ढेरे, 'लोकसंस्कृतीचे उपासक', गोदावरी प्रकाशन, पुणे, १९९६, पृ.१७५.

७. शरद व्यवहारे, 'लोकवाङ्मय रुप - स्वरुप', प्र.आ., साहित्यसेवा प्रकाशन, औरंगाबाद, १९९१, पृ.३८.

८. रा.चिं.ढेरे, उनि., पृ.११२.

९. प्रभाकर मांडे, 'लोकसाहित्याचे स्वरुप', सहावी आ., गोदावरी प्रकाशन, औरंगाबाद, २०१७, पृ.२७६.

# प्रकरण दुसरे

# वासुदेव - कलाविष्कार स्वरुप

# प्रकरण दुसरे

## वासुदेव - कलविष्कार स्वरुप

२.१ प्रास्ताविक

२.२ वासुदेव परंपरा

२.३ रंगभूषा - वेशभूषा - वाद्यसंगीत - जीवनपध्दती

२.४ कलेची संहिता व सादरीकरण

२.५ वासुदेवाची गीते व कलाविष्कार - वर्गीकरण

२.६ वासुदेवाचा कलाविष्कार : आस्वाद व नाटयमयता

२.७ समारोप

संदर्भटिपा

## प्रकरण दुसरे

## वासुदेव - कलाविष्कार स्वरुप

### २.१ प्रास्ताविक :-

प्राचीन काळापासून आजपर्यंत अस्तित्वात असलेली वासुदेव ही संस्था लोकगायकांच्या परंपरेशी नाते सांगणारी आहे. लोकांना गीताच्या माध्यमातून कृष्णकथा, आध्यात्मिक गोष्टी, सामाजिक आशयपर नीतिबोधाची माहिती सांगून आपला उदरनिर्वाह करणारी ही संस्था लोकजीवनात लोकांच्या जिव्हाळयाची होती. वासुदेवांशी कौटुंबिक संवाद साधला जात होता. त्याच्याजवळ आपल्या सुखदु:खाचा निरोप, आपली खुशाली जवळच्या नातेवाईकासाठी दिली जात होती. या दृष्टीने लोकसंपर्काचे, लोकसंवादाचे माध्यम म्हणूनही वासुदेवाचे हे जिव्हाळयाचे कार्य कौटुंबिकदृष्टया मोलाचे होते.

### २.२ वासुदेव पंरपरा :-

वासुदेव श्रीकृष्णाचा परमभक्त असून आपल्या उरनिर्वाहासाठी दारोदर भिक्षा मागत श्रीकृष्णाची गाणी तो गातो. सामान्यत: उपदेशपर व आध्यात्मिक विषयावरील गीते तो म्हणतो.

महाराष्ट्राची लोकरंगभूमी गाजविणारा एक उपासक म्हणून वासुदेवाचा उल्लेख केला जातो. वासुदेवाने दान स्वीकारल्यानंतर आपल्या वाडवडिलांचे नाव घेतले की त्यांचा उध्दार होतो अशी भाबडी लोकश्रध्दा आहे.

वासुदेवाच्या कुळारंभाचा शोध श्रीकृष्णापर्यंत जातो. वासुदेव हा कृष्णसखा आहे. श्रीकृष्णाशी असलेल्या जवळीकीची निदर्शक म्हणून त्याने आपल्या मस्तकी मोरपिसांची शंक्काकृती टोपी धारण केली आहे. एका ब्राम्हण ज्योतिषाला कुणबी स्त्रीपासून झालेला सहदेव हा आपला पूर्वज असल्याचे वासुदेव सांगतात.

छत्रपती शिवाजीमहाराजांच्या काळात वासुदेव समाजाने व्यावसायिक कौशल्याचा वापर हेरगिरीच्या कामासाठी केला होता. याची महाराजांना मदत झाली होती.

वाडवडिलांचा उध्दार फक्त वासुदेवाच्याच हस्ते करावा. उध्दरण्यास वासुदेवच योग्य असतो. हे पटविण्यासाठी वासुदेव म्हणतात.

"वाहण्यास गंगा, पिंडीस ब्राम्हण

सुतकास न्हावी, उध्दरण्यास वासुदेव"

## २.३ रंगभूषा - वेशभूषा - वाद्यसंगीत - जीवनपध्दती :-

वासुदेव पारंपरिक पोशाखात वावरतो. अंगात घोळदार अंगरखा किंवा झगा, धोतर किंवा सलवार, उपरणे, डोक्यावर मोरपिसांची शंकूच्या आकाराची टोपी, काखेत झोळी (विशेषतः लाल रंगांची), पायात घुंगराचे चाळ, कमरेला बांधलेला शेला त्यात खोचलेली बासरी किंवा मुरली, गळयातून पुढे दोन्हीकडे सोडलेला शेला, एका हातात टाळ, दुस-या हातात चिपळया, कपाळाला गंध, गळयात कवडयाच्या, रुद्राक्षाच्या किंवा तुळशीच्या माळा, गळदावण (दोरी), केशरी रंगांचा धज अशा वेशभूषेत वासुदेव दारासमोर अंगणात किंवा रस्त्यावर देवतांचा नामघोष करीत एका हाताने टाळ वाजवीत गाणी म्हणतो.

वासुदेव पहाटे ५ - ६ वाजता भिक्षा मागायला सुरुवात करतात. दररोजची मिळकत ५० - ६० रुपये, थोडेफार धान्य मिळते. वासुदेवांची भिक्षा मागण्याची गावे ठरलेली असतात. पण आता वासुदेवाची संख्या कमी झाल्यामुळे कोणी कोणत्याही गावी भिक्षा मागतो. हा व्यवसाय सर्वच वासुदेव घराण्यात पिढीजात असतो. लोक वासुदेवाकडे भिकारी म्हणून बघत नाही. त्याला भिक्षा वाढणे हे धर्मकर्तव्य मानले जात असे. त्यात तुच्छतेचा, अवहेलनाचा भाव नसे. खेडयापाडयातील यात्रा - जत्रात वासुदेवाची उपस्थिती असते. वासुदेव तीर्थक्षेत्री नदीच्या काठाने फिरतात. कारण नदीच्या पात्रात उभे राहून वासुदेवास दान करणे पुण्यकर्म समजले जाते. वासुदेव दान मिळाल्यावर वाडवडिलांचा उध्दार करतात. यात्रा जत्रा नसल्या म्हणजे हे लोक गावोगावी घरोघर फिरुन श्रीकृष्णचरित्र गीतातून गाऊन भिक्षा मागतात. वासुदेव घरी येणे भाग्याचे मानले जाते. त्याचे कौतुक करुन कपडे, धान्य व पैसे दिले जातात. "वासुदेव विशेषत्वाने कृष्णकथा गातो, परंतु त्याबरोबरच भक्तीचा महिमा पटविण्यासाठी अनेक कथागीते गातो. रामायणातील कांचनमृगाची कथा राम आणि सीता यांच्या संवादातून गायिलेली असते. त्याशिवाय लाक्षागृहाची कथा इत्यादी कथागीते ते गातात"[१] सकाळच्या प्रहरी प्रसन्न वातावरणामध्ये रामकृष्ण नामाचा गजर करणारी वासुदेव ही एक लोकधर्मी संस्था आहे. वासुदेवाची गावे मागण्याची ठरलेली असतात. वासुदेवाला विधिपूर्वक दीक्षा दिली जाते. वयाच्या १५ व्या वर्षी ही दीक्षा देण्यात येते. महानुभाव साहित्य व संतसाहित्यात वासुदेवाचा उल्लेख आलेला आहे. वासुदेव हा कृष्णाचा उपासक आहे. खेडयापाडयातील यात्रातून, आषाढी - कार्तिकेला तीर्थक्षेत्रांच्या ठिकाणी वासुदेव आवर्जून भेटतात. "समाजाने सुखी व्हावे, आनंदी व्हावे, समाधानी व्हावे, बंधुभाव नांदावा, भगवत्भाव जागा व्हावा, सदाचाराचा बोध व्हावा म्हणूनच हा वासुदेव श्रेष्ठ जीवनमूल्यांचे दान मागतो आणि संतांच्या विचाराचे ते दान मला मिळाले आहे असे समजून आनंदाने गिरकी घेत घेत म्हणू लागतो, दान पावलं....दान पावलं.... हा वासुदेव म्हणजे अंगणाअंगणात येऊन प्रबोधन घडविणारा खरा लोकशिक्षकच"[२] पिढयानपिढया प्रबोधनाचे काम त्याने केले.

वतनाच्या गावी भिक्षा मागताना वासुदेव डोक्यावर मोरपिसांची टोपी घालतो. इतर गावी भिक्षा मागताना तो मोरपिसांची टोपी घालत नाही. पण आज वतनाची गावे राहिली नाहीत. लोकांचाही वासुदेवाकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलत आहे. त्यामुळे वासुदेवाला पारंपरिक जीवनपध्दतीने उदरनिर्वाह करणे कठीण होत आहे. असे असले तरी वासुदेव ही संस्था आपले अस्तित्व टिकवून ठेवण्याचा प्रयत्न करीत असल्याचे दिसते. सध्या वासुदेवांतील नवी पिढी शिक्षण

घेऊन पुरोगामी विचारांची बनत आहे. त्यामुळे पारंपरिक वासुदेवपण स्वीकारण्याकडे त्यांचा कल नाही.

वासुदेव समाजात पंढरपूर व येरमाळयाची यात्रा केली जाते. या यात्रा न केल्यास प्रपंचात बरकत येणार नाही. अशी त्यांची समजूत असते. पूर्वी जातीच्या रिवाजाप्रमाणे हक्काची म्हणजे वतनाची गावे मागावीच लागत. टाळाटाळ केल्यास जातीत कमी समजत.

## २.४ कलेची संहिता व सादरीकरण :-

वासुदेव हा मराठी लोकसंस्कृतीतील सात्त्विक भूमिका करणारा एक लोककलावंत आहे. पहाटेच्या वेळी तो गावात येतो. लोकांना जागे करतो. दान पावलं, दान पावलं हे पालूपद आळवीत, टाळ चिपळयांच्या तालात व पायातील घुंगराच्या नादात मंद पावले टाकत तो गाणी म्हणतो. दान झोळीत पडताच वासुदेव दात्याला वाडवडिलांचे नाव विचारतो आणि दात्याच्या दिवंगत पितरांचा नामोच्चार करुन महाराष्ट्रातील सर्व देवदेवतांना दान पावते करतो. स्वतःभोवती गिरकी मारुन पावा किंवा टाळ, चिपळया, वाजवून तो म्हणू लागतो.

"दान पावलं दान पावलं
भिमाशकंरी महादेवाला
कोल्हापुरात महालक्ष्मीला
पंढरपुरात विठू रायाला
जेजुरीमध्ये खंडेरायाला
आळंदीमधी ज्ञानदेवाला
देहूगावात तुकारामाला
पैठणमधी एकनाथाला
सज्जनगडी रामदासाला
शिर्डीत साईनाथाला
पुणतांब्यात चांगदेवाला
तुळजापुरात भवानीमातेला
दान पावलं पावलं सद्‌गुरुरायाला
दान पावलं पावलं जनता जनार्दनाला" [३]

वासुदेव ज्या भागात फिरतो त्या भागातील देवदेवतांचीही नावे घेऊन त्या देवदेवतांना दान पावते करतो.

वासुदेव रस्त्यावर भक्तिगीते गाताना संथ लयीत हात उभारुन नृत्यपूर्ण पदन्यास करतो. त्याची गाणी म्हणण्याची ढब देखील वैशिष्टयपूर्ण असते. क्वचित तो एका हाताने चिपळया व दुस-या हाताने टाळ वाजवितो. जागच्या जागी पाय नाचवून किंवा वाकून पुढे सरकवीत नृत्य करतो. साथीला पायातील घुंगरांचा आवाज, त्याचप्रमाणे टाळ आणि चिपळया ही वाद्ये असतात. वासुदेवाच्या गाण्यांचे स्वरुप देवतांच्या नमनांचे तसेच कथारुप लीलागायनाचे असते. दिलेले दान पावते करण्याची त्याची पध्दत वैशिष्टयपूर्ण असते. दान पावते केल्यानंतर तो म्हणतो -

"आईवाचून , माया आहे

बापावाचून , जलाम आहे

भावावाचून , बोळवण आहे

धंद्यावाचून , दुनिया आहे

सासूवाचून , अक्कल आहे

लेकीवाचून , ववी आहे

पुतरापासून , कुडीला दीप

वासुदेव येगळा , उग्दावर नाही

गुरु येगळा , मार्ग नाही"

प्रत्येकाचे महत्त्व तो सांगतो. उद्धार करण्यासाठी वासुदेवाशिवाय दुसरे कोणी नाही व गुरुशिवाय मार्ग सापडणार नाही असेही गीतातून सांगतो. शेवटी ज्यांनी दान दिले त्यांना तो आशीर्वाद देतो.

"अन्नदान, गौदान, भूमीदान, मोतीदान,

वस्त्रदान, भांड दान, सोनं दान, रुपं दान

कोनी वाटी कन्यादान -

बारा ब्रम्ह, अकरा रुद्र, संक ब्रम्ह तुका विष्णू,

तृप्त केला माहावी ऐसा गुण महादेव

देईन सहस्त्री गुणी, शेती सदा कळती गदा,

पोरी पुत्राचे पाळणे, नवनाथ खेळ मांडवा चढं

कन्यापुत्री रामराज होऊ दे, महादेव हरहर महादेव दत्त"[४]

वासुदेव बहुधा पौराणिक कथागीते गातो या देवदेवतांच्या कथागीतांबरोबरच काही लौकिक आख्याने गाऊन लोकांचे उद्‌बोधन करण्याचा प्रयत्न करतो. कथागीते गाताना वासुदेव जणू एकपात्री नाटयच सादर करतो. कथागीतांचे सादरीकरण निरनिराळया अनुरुप आरोह - अवरोहांच्या आणि त्याला पूरक अशा आंगिक व सात्त्विक अभिनयाच्या साहाय्याने प्रभावी करतो. पोटासाठी भटकंती करणारा वासुदेव दान नाही मिळाले तरी नाराज होत नाही.

"पोटासाठी गातो गाणी
ऐका वासुदेवाची कहाणी
वासुदेव आला रे, वासुदेव आला
हरिनामाचा भजन केला
वासुदेव घालीतो फेरा
काहीतरी दान पुण्य करा
नाहीतर जातो माघारा"[५]

## २.५ वासुदेवाची गीते व कलाविष्कार - वर्गीकरण :-

वासुदेव विविध स्वरुपाची कथागीते गातो. श्रीकृष्णचरित्रपर, पौराणिक आशयपर, सामाजिक व उपदेशपर, अध्यात्मपर आणि ओवीसदृश्य गीते तो गातो. कथात्म गीतातून तो पुराणातील आदर्श व्यक्तीजीवनाची, त्यातील घटना प्रसंगासह कथा सांगतो. हरिश्चंद्र - तारामती, श्रीयाळ - चांगुणा, सत्यवान - सावित्री, श्रीकृष्ण - द्रौपदी अशा स्वरुपाचे कथानक वासुदेव आपल्या गीतांतून सांगतो. श्रीकृष्णविषयक गीतातून कृष्णाच्या बाललीला, खोडया, यशोदामातेचा वत्सलभाव, गोकुळातील गवळणी यांचे दर्शन रसाळवाणीने केलेले असते. आध्यात्मिक स्वरुपाच्या गीतांतून आत्मा परमात्मा, देह, देहाला त्रास करणारे विकार, आत्म्याचे अमरत्व, नाशिवंत देह, मानवी जीवनाचे सार्थकत्व विविध दृष्टांताच्या आधारे व्यक्त केले जाते. गीतांना नृत्य, संगीत व अभिनय यांची जोड असते. दारापुढील अंगणात त्याने सादर केलेल्या कलाविष्काराला एक प्रयोगात्मकता लाभते. घरापुढील अंगण हे त्यावेळी लोकरंभूमी बनते. त्याच्या गीतात कथनपरता व निवेदनपरता अधिक जाणवते.

"वासुदेवाच्या गीतांचे वर्गीकरण पुढीलप्रमाणे केले जाते"[६]

अ) रचनासुरी वर्गीकरण

१) कथात्मगीते  २) स्फुटगीते  ३) ओवीसदृश गीते  ४) कुटात्म गीते

ब) आशयानुसारी वर्गीकरण

१) श्रीकृष्ण भक्तीपर गीते  २) पौराणिक आशयपर गीते  ३) अध्यात्मपर गीते

४) सामाजिक आशयपर गीते  ५) उपदेशपर गीते

वरीलप्रमाणे वर्गीकरण केले जात असले तरी या गाण्यांचे स्वरुप एकमेकांना पूरक असे असते. श्रीकृष्ण चरित्रपर गाणी पौराणिक आशयपर तसेच अध्यात्मपर गीतातही मोडतात. तसेच सामाजिक आशयपर गीतातूनही उपदेश केलेला असतो. त्यामुळे या गीतांच्या वर्गीकरणातील सीमारेषा धूसर होतात.

१. कथात्म गीते :-

पुराणातील व्यक्ती, घटना व प्रसंगाचे रसाळवर्णन या कथागीतांमध्ये असते.

श्रीयाळ - चांगुणा, हरिश्चंद्र - तारामती, श्रावणबाळ यासारख्या पुराणकथाही तो गीतांच्या माध्यमातून सांगतो. जीवननिष्ठा व जीवनमूल्ये जोणासणा-या व्यक्तीच त्यांच्या कथागीतांचे नायक असतात. वासुदेवाच्या पौराणिक कथागीतांची धाटणी जवळ जवळ एकाच प्रकारची असते. बोली भाषेतील छोटेखानी संवाद, साधी सोपी निवेदन पध्दती व लोकगीताची धाटणी ही त्याच्या कथागीतांची वैशिष्टये आहेत.

श्रीयाळ - चांगुणा या कथागीताबरोबरच आपल्या मातापित्याची सेवा करणारा श्रावण - बाळ, पतिव्रताच्या बळावर पतीचे प्राण परत मिळविणारी सावित्री, विठ्ठलाच्या दर्शनासाठी आसुसलेली सखूबाई, जनाबाई अशा आशयाची कथागीते तो गातो.

वासुदेवाच्या सामाजिक कथागीतातून सासुरवाशीण, आईची माया, बदफैली पुरुष यांचेही चित्रण येते.

वासुदेवाच्या कथात्मगीतात श्रीकृष्णकथांचे एक वेगळेपण आहे. लहान, सुटसुटीत पण स्वतंत्र अशी ही कथागीते आहेत. श्रीकृष्णाच्या जीवनातील एक एक छोटेखानी कथागीत असे या गीतांचे स्वरुप आहे. कृष्णजन्म, यशोदा व कृष्ण यांच्यातील भावबंध, कृष्णाच्या बाळलीला, पुतनावध, कालियामर्दन यासारख्या घटनाप्रसंगावर आधारित ही कथागीते प्रवाही आहेत. कालियामर्दन या कथागीतातील एक प्रसंग वासुदेव किती सुबोध व सोप्या लोकभाषेत कथन करतो.

"कृष्णानं बाई, मारली की बुडी
सावळयानं हया मारली की उडी
गेला यमुनेला तळाला
कालियाच्या घराला
कृष्ण झुंजतो कालियाला
मुडदा कालियाचा पाडला"[७]

वरील गीतात यमक बुडी - उडी, तळाला - घराला असा जुळविलेला आहे. गीताची भाषा प्रासादिक व लोकजीवनातील नित्याच्या वापरातील आहे.

श्रीकृष्ण व राधा यांच्यातील प्रीतिभाव तो गीतमाध्यमातून निवेदनातून उलगडून दाखवितो. श्रीकृष्णाच्या प्रेमावर संशय घेणारी त्याला जाब विचारणारी राधा व तिला तिने घेतलेल्या आक्षेपांचे समर्पक उत्तर देणारा श्रीकृष्ण पुढील गीतातून दिसतो.

"देवा! खरं बोला, कृष्णा! खरं बोला जी,

कां डोळे झाले लाल!

कुणी झोप मोडली, नूर तुमचा सुकला जी ।।धृ।।

राधा म्हणे हरीला, खरं वचन बोला ।

कोणी पाणी टाकलं, पितांबर भिजला ।

कोण्या सवतीनं भोग दिला सेजेला ।

जन म्हणती नारी टोंगळा फुटला ।अंगी काप सुटला

तितकाच धमका आला ।।

तवाच म्या वळखिला, अहो लक्षण कळलं तुमचं ।।१।।

त्यावर कृष्ण तिची समजूत घालतो. खेळत असता कळपातील गाय चुकून गेली. त्यामुळे तिच्यामागे अनवाणी पळालो. त्या रस्त्यात पडल्यामुळे दोन्ही पायांचे टोंगळे फुटले त्यामुळे हे सर्व झाले आहे. त्यावर राधा पुन्हा विचारते -

"चोरिता कशाला, आता पिवळी हळद शेल्याला।

कोणी टाकला, गुल्लेल परिमल सुटला ।

काजळ व्हटाला जी, आता मोहनमाळ उराला ।।

कोणी आवळून धरला माझ्या सवतीनं, झग्याचा बंध सुटला ।।

आता छातीत वल्ला झाला ।।

कुणी करीला जादुटोणा मनमोहना ।देवा खरं बोला ।।२।।

रस्त्यात जांभूळ खाताना ओठांना काळे लागले. झाडाला टेकल्यामुळे मोहनमाळ रुतली. ती काढताना बंध तुटला. वाटेत खंडोबाच्या मंदिरातील भंडारा शेल्याला लागला. मोग-याचा सुगंध पागोटयामध्ये आला. कारण ते मोग-याच्या जाळीत अडकले होते. अशी अनेक कारणे सांगून शेवटी कृष्ण सांगतो 'आम्ही नव्हं त्या कर्माचे किती छळती रे' शेवटी राधेचे समाधान झाले"[८]. ही गवळण लावणीच्या धाटणीची आहे. यशोदा - श्रीकृष्ण या मातापुत्राचा प्रेमभाव, यशोदेला कृष्णाची असणारी काळजी, ताप आलेल्या बाळाला कोणाची तरी दृष्ट लागली. ती दृष्ट उतरविली पाहिजे, असा लोकभाव तसेच यशोदेचा वात्सल्यभाव पुढील गीतातून व्यक्त होतो.

"श्रीक्रिस्नाला देवी निघाल्या यसोदा तळमळी

किती बाळाला जतन करु मी, सावळया वनमाळी

फुन फुन फुन फुन ताप बाळाला आली

कोण्या बाईची, दिष्ट याला लागली

निंब नारळ बाळावरुनी टाकी उतरुनी

चौसष्ट देवी निघाल्या श्रीक्रिस्नाच्या पाठीवरी

आणि एकवीस निघाल्या तान्ह्या बाळाच्या पोटावरी

गळया भोवत्याला सात निघाल्या कंठ शोभतो हरी

दिष्ट होईन बाळाला बिलावा कवडी बांधा पायाला

श्रीक्रिस्नाला देवी निघाल्या यसोदा तळमळी

किती बाळाला जतन करु मी, सावळया वनमाळी "[९]

वासुदेवाच्या कृष्णविषयक गीतात त्याच्या खोडयाविषयी गोपींनी केलेल्या तक्रारी आहेत. त्याच्या खोडयांनी संत्रस्त झालेल्या गोपींनी त्याला उखळीला बांधण्याचा केलेला निश्चयही आहे. पुढील गीतातून त्याचा निर्देश होतो.

"बांधा उखळाला, याला बांधा उखळाला

नंदाचा पोर, याला बांधा उखळाला ।।धृ।।

न कळत हरि हा घरांत शिरतो,

दहि - दुध - लोणी - चोरुनि खातो,

सोडुं नका याला, आतां बांधा उखळाला,

नंदाचा पोर, याला बांधा उखळाला ।।१।।

पाणियांसी जाता घागर फोडी,

भर रस्त्यावर पदरचि ओढी,

अहो लाज नाही याला, मुळी लाज नाही याला,

नंदाचा पोर, याला बांधा उखळाला ।।२।।

मुरलीधर हा लटकाच भारी,

लबाड काळा कृष्ण मुरारी,

सोडू नका याला, आतां बांधा उखळाला

नंदाचा पोर, याला बांधा उखळाला ||३||" [१०]

२. अध्यात्मपर गीते :-

वासुदेवाच्या गीतातून संतांचे अध्यात्मपर विचारही व्यक्त होतात. वासुदेवाच्या अध्यात्मपर गीतातून आत्मा, परमात्मा, देहप्रपंच, ज्ञान - अज्ञान, वासना - विकार याविषयीचे विचार अत्यंत सोप्या भाषेतून व्यक्त होतात. लोकरंजानातून आध्यात्मिक प्रबोधन हा एक उद्देश असतो.

आपल्या संस्कृतीचे, पुराणवाङ्मयाचे स्मरण व्हावे आणि सदाचरणाचा मार्ग स्वीकारुन अध्यात्माच्या आश्रयाने जीवनात एक प्रकारचे समाधान लाभावे. समाज सद्‌गुणसंपन्न, धर्मप्रवण व्हावा यादृष्टीने त्यांचे कार्य महत्त्वाचे आहे.

आत्मा परमात्मा विषयावरील वासुदेवाची गाणी विपुल आहेत. देह आणि आत्मा याचे स्वरुप, त्यांच्यातील परस्पर संबंध, देहाचा नाशिवंतपणा, प्रपंचाचा लटकेपणा यासारख्या बाबी वासुदेवाच्या गीतांतून स्पष्ट केल्या जातात.

"आत्मा देहाचा त्याग करुन निघून जात असता देह म्हणतो -

आत्म्या, नको मला जावू टाकून

तू गेल्यावर काय करु मी राहून ?

भरल्या पुरात, कास म्या बळकट धरली हाता

वाटले, पैलथडीला न्याल तुमी गुणवंता

तुला आसरा, मला कोण करील सखा?

आत्मा काही काळ देहात राहिला हे खरे पण देह हा नाशिवंत आहे. आत्मा परमात्म्याचा ताबेदार आहे. देहाचा नव्हे तेव्हा आत्मा देहाला म्हणतो -

मी हुकमाचा ताबेदार, भरविला मायेचा बाजार

वसरुन गेला, पडला अंधार

उठलं ठाणं, आलं जाणं, झाला अंधार " [११]

अशा वेळी माणसाने हे नीटसे जाणून घ्यावे व खालीलप्रमाणे जीवन जगावे असा उपदेशही करतो.

"प्राण आहे तोवर करा देहाचे साधन

प्रपंचात परमार्थ करा, नामाचं स्मरण "

प्रपंचात परमार्थ करा देवाचे नाव घ्या असा सोप्या शब्दातून उपदेश करतात. त्यामुळे अनाकलनीय वाटणारे आध्यात्मिक विचार जनसामान्यांना चटकन समजतात.

३. ओवीसदृश गीते :-

ओवीछंदात रचलेली वासुदेवाची गीते स्त्रियांमध्ये अधिक प्रिय आहेत.

वासुदेवाच्या नृत्यप्रयोगाच्या प्रेक्षकांत स्त्रियांचा सहभाग अधिक प्रमाणात असल्यामुळे स्त्री जीवनाला, स्त्रीमनाला भावणारे विषय वासुदेव आपल्या गीतातून गातो. पुराणातील घटना, व्यक्ती, अध्यात्म, देवदेवता, समाजजीवन यावर आधारित ओवीगीते असतात. प्रत्येक ओवी स्वतंत्र अनुभव, भाव व विचार व्यक्त करणारी असते.

उदा. १) पहिली माझी ववी गं, कौशल्याच्या रामाला

बंधु लक्ष्मणाला, आन् सीता नारीला

गोविंदा तू माधवा|

२) रामाच्या प्हारी

आपुल्या दारी

सूर्याचा दिवा जळतो गं

लवकर उठा आळस झाडा

वासुदेव सांगून जातो गं|

४. सामाजिक आशयपर व उपदेशपर गीते :-

या गीतातून वासुदेव सद्य:स्थितीचे चित्रण करतो. त्यातून त्याची लोकोद्धाराची तळमळ

दिसते. लोकांनी नीतीने वागावे, सद्‌गुणांची कास धरावी, सदाचरणी व्हावे म्हणून तो लोकशिक्षकाच्या भूमिकेतून उपदेश करतो. त्याच्या उपदेशपर रचना, धर्म, अध्यात्म व लौकिक जीवनावर आधारित असतात. वासुदेवाचा वावर लोकजीवनात नित्य असल्याने समाजातील आचारविचार, चालीरीती, गुणदोष, धार्मिकता - अधार्मिकता, सद्‌गुण - दुर्गुण आणि व्यक्तीचे वागणे, व्यक्तिस्वभाव इ. त्याला परिचित असतात.

माणसाने गर्व, अहंकार, अभिमान बाळगू नये. अहंकाराचा त्याग करुन त्याने जीवनातील उत्कट आनंद घेण्याचे तो पुढील गीतातून सांगतो. त्यासाठी तो पुराणातील दाखलेही देतो.

"अभिमानानं कैक बुडाले, सांगू कोण कोण

दहाशीर, वीसभुजा, तो एक रावण ||

कुळशील वंश बुडाला, पहा दुर्योधन

भस्मासुर भस्म झाला, धरुन अभिमान "[१२]

बदलत्या समाजजीवनातील विचाराचे, वृत्तीप्रवृत्तींचेही दर्शन त्याच्या काही गीतांतून घडते. जे घडत आहेत ते चांगले नसल्याची खंतही तो व्यक्त करतो. त्याचे समाजनिरीक्षणही अचूक असते.

"खोटं बोलणं, खोटी ग्वाही, उलटा जमाना

शहाणा चतुर पंडित, त्येला कोणी इचारीना ||"

धर्मानुसार आचरण करण्यापेक्षा माणसे चुकीच्या पध्दतीने वागत आहेत हेही तो गीतातून सांगतो.

'कीर्तनाला कोणी पुसना, नाच्यावर प्यार' ||अशी टिप्पणीही करतो.

यासारख्या रचनांमधून तो समाजजीवनाचे सद्यःकालीन समाजस्थितीचे दर्शनही घडवितो.

"अरे ऐक पराण्या
तुला मी सांगितो
हरीबंद राहू नको
अवो दुही भावांचा
तंटा चालला
सरकारामंदी जाऊ नको
आई मावली वाटेनी चालली
तिची निंदा करु नको
दिली देवाना संपत्ता
गर्व मनी धरु नको
अरे शाळेमंदी मूल घातला
त्याचे लाड करु नको
अरे लांडी लबाडकी
घर कुणाचं घालू नको "[१३]

'शहाण्याने कोर्टाची पायरी चढू नये' अशी एक लोकाक्ती आहे.

याचा प्रत्यय वरील गीतातून येतो. कोणत्याही स्त्रीकडे वाईट नजरेने पाहू नकोस, अहंकार बाळगू नकोस, लबाडी करु नकोस, मुलांना शिक्षण दे, कोणाचे घर बुडवू नकोस असे विविध प्रकारचे उपदेश वासुदेव वरील गीतातून करतो. वरील गीतातून व्यक्त होणारा आशय कवी अनंत फंदीच्या 'बिकट वाट वहिवाट नसावी धोपट मार्ग सोडू नको' या फटक्यातील आशयाशी साम्य दर्शवतो.

वासुदेवाचे तत्त्वज्ञान दैववादी आहे. आपण सन्मार्गाने चालावे आणि भल्याबु-या फळाची जबाबदारी दैवावर टाकावी अशी त्याची जीवनदृष्टी आहे.

"राम हरी भगवान, भजावे मुखी राम

सुंबरान करा -

खोटी वासना सोडुनी द्या

पण देवाचे चरण धरा ||राम हरी

आईबाप घरची काशी

जाऊनी त्यांचे चरण धरा ||राम हरी

तीन दिवसांचा बाजार भरला

पाहुणी सौदा खरा करा ||राम हरी

घराम्होरं तुळस लावली

हिची सेवा बराबर करा ||राम हरी " [१४]

वरील गीतातील आशयाप्रमाणेच आशय पुढील गीतातूनही व्यक्त होतो.

"रामसंगती करा गडयांनो, आधार देवाचा

भरवसा नाही या जीवाचा ||

सद्गुरु चरणी लक्ष लावा, हरी चरणी मन

प्रपंचात प्रेमार्थ करा नामाचं स्मरण

दानधर्म करा, पुढं इश्रांती जीवाला

धर्म पुण्य करा, चला तुम्ही सोडा पापाला " [१५]

अशा स्वरुपाचा उपदेश करुन अंतर्मुख होण्यास सांगत मानवी जीवनाला किती महत्त्व आहे, परमेश्वराचे नाव घ्या, पापाचरण सोडा असेही तो बजावतो.

शेतकरी कुटुंबात जन्माला आलेल्या माणसाला वासुदेव काळया आईची सेवा करायला सांगतो, गाईला मारु नकोस, गर्व धरु नको, म्हातारी झालेली गाय कसायाला विकू नकोस, आई वडील, मोठे भाऊ यांची मर्जी सांभाळ, आईवडिलांची सेवा कर असा सोप्या भाषेतील उपदेश पुढील गीतातून जाणवतो.

"बळीच्या वंशा जन्म घेतला
काळीचा धंदा सोडू नको
ऐक पराण्या तुला सांगतो
हरीभजनाविण राहू नको
दिली देवानं धनसंपदा
गर्व मनामधी धरु नको
चरत गाय ती शेती आली
तिच्या मुखावर मारु नको
झाली म्हातारी गाय बाप्पा
कसाबाला तू इकू नको
पोर घातलं शाळंमधी
लाड त्याचा तू करु नको
वडिल बंधू बापापरमानं
मर्जी मोडून बोलू नको
पित्याच्या वंशी जन्म घेतला
त्याच्या सेवेला चुकू नको
आईच्या पोटी जन्म घेतला
वाईट वंगाळ बोलू नको
दोघा भावाचा तंटा लागला
सरकारामधी जाऊ नका"[१६]

दुनियाच लबाड होत चालली आहे. माणसांच्या डोळयावर धुंदी चढली. ज्या पुत्रासाठी नवस केले तोच पुत्र आई वडिलांना मारतो. दोन बायकांची हौस असलेल्या नव-याची स्थिती कशी

होते?, पैशासाठी स्वतःच्या मुलीचा विवाह वृध्द नव-याशी लावणारे बाप आजच्या समाजातही आहेच याचे चित्रण वासुदेवाच्या पुढील गीतात आलेले आहे.

"लबाड दुनिया बालटं निघाली कशी कळी फिरली
डोळयांवरती धुंदी चढली वळख नाही धरली ||धृ||
पुत्रासाठी नवस केले गावच्या मारोतीला
चांदीसोन्याचा पाळणा वाहीन देवा मी तुजला
नवस केला पुत्र झाला बरा देव पावला
हातात खेटर घेऊन बापाच्या अंगावर गेला
दोन बायका कशाला केल्या घरात चाललं भांडण
नवरा जातो सोडवाया मारिती चाटुच्या दांडयाने
काशी केली यात्रा केली मिशा काढुनी आला
जिवंत होते आईबाप तेव्हा अन्न नाही दिले दोघांला
हजार रुपयांचा हुंडा घेतला लेकीच्या बापानं
म्हातारा नवरा डंगरा पाहून लेक दिली त्यानं
लबाड दुनिया बालटं निघाली कशी कळी फिरली
डोळयांवरती धुंदी चढली वळख नाही धरली ||धृ||" [१७]

वरील गीतातून नीतिबोध केलेला आहे. गीताची धाटणी रामजोशीच्या लावणीसारखीच आहे. 'सुंदरा मनामध्ये भरली, जरा नाही ठरली' या लावणीची चाल वरील गीतास आहे.

गोंधळी व वाघ्यामुरळीप्रमाणेच वासुदेवही जागरण घालतात. मात्र गोंधळी, वाघ्यामुरळीच्या तुलनेत वासुदेवाच्या जागरणाचे कार्यक्रम कमी होतात. या जागरणात गण-गवळण-आख्यान असे स्वरुप असते.

२.६ वासुदेवाचा कलाविष्कार : आस्वाद व नाटयमयता :-

भल्या पहाटे वासुदेव अंगणात येतो. अंगणात आलेला वासुदेव गाणे म्हणतो. त्याची गीते वृध्द, लहान मुले, स्त्री व पुरुष या सर्वांनाच आवडतात. कथागीते गाताना वासुदेव एकपात्री प्रयोगच सादर करत असतो. सादरीकरणावेळी तो अनुरुप आरोह-अवरोहाच्या मदतीने आंगिक व सात्त्विक अभिनय करतो, नृत्य करतो. वासुदेवाच्या नाटयाला संगीत, नृत्य, वाद्य व अभिनय यांची जोड असते. प्रेक्षकसापेक्ष असे त्याचे सादरीकरण असते. त्याचे सादरीकरण हे प्रयोगात्मक स्वरुपाचे असते. नृत्य, संगीत, नाटय या नाटयगुणांबरोबरच त्याची पारंपरिक वेशभूषाही त्याच्या प्रयोगात नाटयात्मकता व

कलात्मकता आणते. टाळ, चिपळया, पावा आणि पायातील चाळ या लोकवाद्यांचे संगीत त्याच्या गीतांना लाभते.

## २.७ समारोप :-

लोकसंस्कृतीच्या जडणघडणीत वासुदेव या कलावंताचा मोठा वाटा आहे. प्रसारमाध्यमे व प्रबोधनाची कोणतीही साधने नसताना प्राचीन काळापासून समाजाला नीतिबोधाची, न्यायाची शिकवण, धर्माने वर्तनाची शिकवण वासुदेवाने समाजाला दिली. अगदी पहाटेच वासुदेवाची फेरी निघते टाळ वाजवित तो देवतांचे नामसंकिर्तन करतो. दान करणा-याचे दान देवतांना पावते करतो व आशीर्वाद देतो. शेवटी दान देणा-याच्या दिवंगत पितरांना देवतांच्या मालिकेत अंतर्भाव करुन त्यांच्याही नावाने दान पावते करतो. काळाच्या ओघात आता वासुदेवाची गाणी लुप्त होत आहेत.

## संदर्भटिपा :-


१. प्रभाकर मांडे, 'लोकसाहित्याचे स्वरुप', सहावी आवृत्ती, गोदावरी प्रकाशन, औरंगाबाद, २०१७, पृ.२७६.

२. डॉ.रामचंद्र देखणे, 'अंगणातील विद्यापीठ', प्र.आ., संस्कृती प्रकाशन, पुणे, २०१७, पृ.१३.

३. 'वासुदेव रखमा सुपेकर' यांची प्रस्तुत अभ्यासकाने घेतलेली मुलाखत.

४. प्रभाकर मांडे, 'लोकरंगभूमी', प्र.आ., गोदावरी प्रकाशन, औरंगाबाद, १९९४, पृ.२७२.

५. 'वासुदेव रखमा सुपेकर' यांची प्रस्तुत अभ्यासकाने घेतलेली मुलाखत.

६. शरद व्यवहारे, 'लोकसंस्कृतीचा अंतःप्रवाह', प्र.आ., प्रतिमा प्रकाशन, पुणे, १९९९, पृ.१२७.

७. तत्रैव, पृ.१३३.

८. प्रभाकर मांडे, 'लोकसाहित्याचे अंतःप्रवाह', दु.आ., गोदावरी प्रकाशन, औरंगाबाद, १९९७, पृ.३२.

९. संपा. सरोजिनी बाबर, 'एक होता राजा', व्दि.आ., भाग १, 'वासुदेवाची गाणी' संग्राहिका विद्या देसाई, महाराष्ट्र राज्य लोकसाहित्य समिती, पुणे, प्रसिध्दी संचालनालय महाराष्ट्र शासन, पुष्ण दहावे, १९६५, पृ.५०.

१०. रा.चिं.ढेरे, 'लोकसंस्कृतीचे उपासक', पद्मगंधा प्रकाशन, पुणे, १९९६, पृ.१६०.

११. शरद व्यवहारे, उनि., पृ. १३७.

१२. तत्रैव, पृ.१३९.

१३. संपा. सरोजिनी बाबर, उनि., भाग १, 'वासुदेवाची गाणी 'संग्राहिका कुमुदिनी पवार, पृ. ५५ – ५६.

१४. तत्रैव, संग्राहिका विद्या देसाई, पृ.४९.

१५. शरद व्यवहारे, 'लोकसाहित्य उद्‌गम आणि विकास', प्र.आ., विश्वभारती प्रकाशन, नागपूर, १९८७, पृ.११४.

१६. साहेब खंदारे, 'लोकसाहित्य : शब्द आणि प्रयोग', प्र.आ., प्रतिमा प्रकाशन, पुणे, २००४, पृ.४६.

१७. संपा. र. ना. वरखेडे, 'लोकसाहित्य ', सु.आ., मुक्त विद्यापीठ प्रकाशन, नाशिक, २००४, पृ.९८.

# प्रकरण तिसरे

## वासुदेवाची संकलित गीते - आशयविविधता

## प्रकरण तिसरे

## वासुदेवाची संकलित गीते - आशयविविधता

३.१ प्रास्ताविक

३.२ वासुदेवाची संकलित गीते - आशयविविधता

१. वासुदेव सूर्यभान तारापुरे - गीत क्र.१ व आशय

२. वासुदेव सूर्यभान तारापुरे व सहकारी - गीत क्र.२ व आशय

३. वासुदेव सूर्यभान तारापुरे - गीत क्र.३ व आशय

४. वासुदेव सूर्यभान तारापुरे - गीत क्र.४ व आशय

५. वासुदेव ज्ञानदेव जोशी - गीत क्र. ५ व आशय

६. वासुदेव नितीन विधाते - गीत क्र.६ व आशय

७. वासुदेव अमित विधाते - गीत क्र.७ व आशय

८. वासुदेव नितीन विधाते - गीत क्र.८ व आशय

९. वासुदेव नितीन विधाते - गीत क्र.९ व आशय

१०.वासुदेव नितीन विधाते - गीत क्र.१० व आशय

११.वासुदेव नितीन विधाते - गीत क्र.११ व आशय

१२. वासुदेव अमृत वाघ - गीत क्र. १२ व आशय

१३.वासुदेव अमृत वाघ - गीत क्र. १३ व आशय

१४.वासुदेव अमृत वाघ - गीत क्र. १४ व आशय

३.३ वासुदेवाची संकलित गीते - आशयवैविध्य व सौंदर्य

३.४ समारोप

संदर्भटिपा

# प्रकरण तिसरे

## वासुदेवाची संकलित गीते - आशयविविधता

### ३.१ प्रास्ताविक :-

वासुदेव हा एक लोककलेची पिढयानपिढया जोपासना करणारा एक लोककलावंत आहे. त्याच्या गीतामध्ये विविध वैशिष्टये आपणास जाणवतात. प्रस्तुत अभ्यासकाने वासुदेवाच्या भेटी, मुलाखती घेऊन त्यांची काही गीते संकलित केली आहेत. त्या गीतांचा अभ्यास केल्यांनतर त्यातील विचारसौंदर्य व कल्पनेसौंदर्याबरोबरच आशयात विविधता जाणवली. देव, धर्म, नीती अनीती, समाजजीवन, दानाचे महत्त्व, माणसाचे वर्तन कसे असावे?, पापपुण्याची कल्पना, प्रामाणिकपणाचे जीवन, कृष्णकथा, चांगुणाची कथा, कबीराची आतिथ्यशीलता, जनाईची भक्ती, कर्म संपत्तीचे भांडण इ. संबंधीचा आशय वासुदेवाच्या गीतातून व कथागीतातून येतो. "वासुदेव विशेषत्वाने कृष्णकथा गातो, पंरतु त्याबरोबरच भक्तीचा महिमा पटविण्यासाठी अनेक कथागीते गातो. रामायणातील कांचनमृगाची कथा राम आणि सीता यांच्या संवांदातून गायलेली असते. त्याशिवाय लाक्षागृहाची कथा इत्यादी कथागीते ते गातात"[१] ही कथागीते व गीते गाताना नृत्य, वादन, अभिनय, संगीत आदि कृती तो एकटाच करत असतो. त्यामुळे प्रयोगात्म मूल्य त्याच्या सादरीकरणाला लाभलेले असते. त्याचा नाटयप्रयोग हा एका अर्थाने एकपात्री प्रयोगच असतो.

### ३.२ वासुदेवची संकलित गीते - आशयविविधता :-

वासुदेव हे कधीही स्थिर नसतात. भटकंती करत, गावात जाऊन गाणी म्हणून ते दान मागत असतात. प्रस्तुत अभ्यासकाने वासुदेवांच्या भेटी घेऊन त्यांच्या मुलाखती घेतल्या. त्याचबरोबर त्यांची गीते ध्वनिमुद्रित केली. ध्वनिमुद्रित केलेली गीते लिहून काढणे, त्यातील शब्दोच्चार समजून घेणे हे तसे प्रयत्नसाध्य काम आहे. प्रस्तुत अभ्यासकाने ध्वनिमुद्रित केलेली गीते लक्षपूर्वक ऐकून लिहून काढली. त्यातील आशय विविध स्वरुपाचा आहे तो पुढीलप्रमाणे -

१. वासुदेव सूर्यभान तारापुरे - गीत क्र.१ व आशय

आत्मा येथे टाकूनी ती हो राया जीऽऽऽ
आणि त्याहून चालवती रे प्राण्या त्याहूनी चालवती
आत्मा येथे टाकूनी ती हो ऽरे राया जी ऽऽजी ऽऽ
मज दानधर्म हे किती केले रे ऽऽ
तीर्थ तपोवन किती केले हो ऽऽ
आणि खरं सांग म्हणती रे देवा खरं सांग म्हणती
बापूला रे ऽऽओम गांजती हो राया जी ऽऽजी

दान धर्म हे बहु केलो रे

देवा तीर्थ तपोवन बहु केलो रे

आणि गादीवर बसवी रे बापूला गादीवर बसवी

बापूला फुलाच्या हार घाली हो

हो राया जी ऽऽऽ, अरे गादीवर बसविले ते वाहन गादीवर बसवी

खरं गादीवर बसविली

बापूला फुलाच्या हार घाली रे

अन् महादेव बोल मला हो

अरे सज्जनगडा हो मला हो

वरी का भ्रांती पडली रे देवा का भ्रांती पडली रे

बापूला कसली रे राया हो जी ऽऽऽ

राया हो जी ऽऽऽ

वासुदेव - सूर्यभान लक्ष्मणराव तारापुरे

संकलक - प्रा.डॉ.सुभाष आहेर

❖ आशय :- मानवाला मृत्यू अटळ आहे. शरीर हे नाशिवंत आहे आणि आत्मा अमर आहे. माणसाचा मृत्यू झाल्यावर आत्मा येथेच टाकून जावा लागतो. वासुदेव जणू प्रश्न विचारतो की, 'तू आयुष्यभर मला किती दान धर्म केला?, तीर्थभेटी किती केल्या? चांगले असे सद्‌वर्तन किती केले? याचा लेखाजोखा याचठिकाणी द्यावा लागतो. या प्रश्नांची उत्तरे तू खरी खरी दे. देवाघरी सत्यच बोलावे लागते. यासाठी माणसाने आपल्या जीवनात दानधर्म बहू म्हणजे भरपूर करावे, देवधर्म तीर्थभेटी नित्यनेमाने कराव्यात. सद्‌वर्तनाने माणसाची प्रगती होते. अशा सद्‌वर्तनाने व जगण्याने माणसाला कसलाही त्रास होत नाही. चांगले दानधर्म, चांगले आचरण केले तर माणसाला कसलीही चिंता म्हणजे भ्रांती राहता कामा नये. भारतीय संस्कृतीत मृत्यूबाबतचे व्यक्त केलेले चिंतनच या गीतातून व्यक्त झालेले आहे. "महाराष्ट्रातील कलेची पंरपरा स्वंतत्रपणे अभ्यास करण्यासारखी आहे. संस्कृतीचे वैशिष्टय व संस्कृतीचा मिलाफ कलांच्या क्षेत्रात जितका दिसून येतो तितका इतर अंगातून क्वचितच येतो."[२] छोटयाशा गीतातून भारतीय संस्कृतीचे, मृत्यूविषयीचे, मानवाच्या जगण्याचे तत्त्वज्ञान इत्यादीचे दर्शन घडते.

२. वासुदेव सूर्यभान तारापुरे व सहकारी - गीत क्र.२ व आशय

गुणवंत सून गुणवंत देखीले

येळवंत देखीले कोरवंत सुनले

नाथा रे पंथान

विठ्ठलराव बापूच्या नावाने देऊन

वासुदेवा म्हणून दान रे देऊन

चरण धरुन पाची रे बोटानी

अन्नदान देऊन

शिधादान देऊन

रुपैदान देऊन

गहूदान देऊन

गायीदान देऊन

धनधान्य देऊन (खळदान, हळदान)

ये उघडा देह जीवाच्या संगाटी

सोबती रे नाही जोडया वाचूनी

संसार नव्हे राम, संसार पाण्याचा

पाण्याचा बुडबुडा जाईल विरघळून (विघ्नुनी)

जाईल बसून

आला रे अहंकारा

टाकील पसारा बापा रे वाचून

हा जन्म नव्हे राम माई ग वाचून

अन् माया नव्हे राम कोकरा वाचून

दिपक न्हवे राम कुकंवा रे वाचून

अहेवपण नव्हे राम धन्या रे वाचून

(आकल) अक्कल नव्हे राम सास-यावाचून

वैभव नव्हे राम सासु रे वाचून

वैभव नव्हे राम भावा रे वाचून

बोळवण नव्हे राम माम्या रे वाचून

(आजुळ) आजोळ नव्हे राम माये ग वाचून

(माहयर) माहेर नव्हे राम कोण्या कोण्या

औंढया मध्ये राम नाग रे नाथाले

परळेमध्ये राम वैजा रे नाथाले

आळंदीमध्ये राम ज्ञानेश्वरीले

(देहोमधी) देहूमध्ये  राम तुकाराम साधुले

वासुदेव - सूर्यभान लक्ष्मणराव तारापुरे व सहकारी

संकलक - प्रा.डॉ.सुभाष आहेर

❖ आशय :- या गीतातून वासुदेव दान देणा-या प्रसंगाचे वर्णन करतो. भरल्या घरातील सुनेने वासुदेवाला अन्नधान्य देऊन दानधर्म केलेला आहे. अन्न, शिधा, रुपये, गायी, गहू, धनधान्य इ. प्रकारचे दान लोक वासुदेवास करतात. आलेला उघडा देह एक ना एक दिवस मृत्यूबरोबरच नष्ट होतो. संसार म्हणजे नुसता एकटयाचा नसतो तर तो दोघांचा असतो. त्याचबरोबर या संसारात हरीनामाशिवाय काही अर्थ नाही. संसारापेक्षा रामनाम महत्त्वाचे आहे. संसार हा पाण्याच्या बुडबुडयासारखा आहे. संसार हा अशाश्वत आहे. माणसाला अहंकाराचा वारा लागावयास नको. आईवाचून जन्म नव्हे, कोकरावाचून माया नव्हे, कुळाला दीपक हवा असेल तर पती लागतोच, अहेवपण हे धन्याशिवाय मिळेल का? अक्कल म्हणजे संसाराचे शहाणपण सास-याकडून मिळते. घराला एकत्रित ठेऊन वैभवाला नेणारी सासू महत्त्वाची असते. मायेशिवाय आजोळ असू शकत नाही. काही लेकींना दुर्देवाने माहेर नसते. शेवटी औंढयामध्ये नागनाथाला, परळीमध्ये वैजानाथाला, आळंदीमध्ये ज्ञानेश्वराला, देहुमध्ये तुकोबारायाला वासुदेव दान पावते करतो.

३. वासुदेव सूर्यभान तारापुरे - गीत क्र.३ व आशय

नावामध्ये नाम रे देवाले

तुम्हा दान हे पावतं

वाल्या रे कोळयाच्या वाल्मिकी रे केलं

या निरा नदीच्या आंगुळा करुनी

पंढरपुरात विठोबा देवाले

रुक्मिणी मातेले पुंडलिक भक्ताले

रोहिदास चांभारा जोडी आहे कुंभारा

नामदेव पायरीला या मिराबाईले

कान्हुपात्राले गरुड खांबाले

चंद्रभागेच्या आंगुळा केल्या आहे राम

वाळवंटा तिरी राम दान रे देऊनी

तेथे रे बसू देवा वडिलाच्या नावाने

दान रे देऊनी चरण धरुनी

नाव रे सांगोनी मावनी दत्ताले

या या अनुसयाले रेणुकामातेले

परशरामाले अवलिया भक्ताले

या पर्द भक्ताले केलं रे गंगुळच्या

आंगुळी करुनी

शेगावमध्ये राम गजानन बुवाले

बामनगावाचे बोधले बुवाले, तुम्हा दान पावतं

कोल्हापूरचे लक्ष्मीमातेले (लक्ष्मुमातेलं)

तुळजापुरचे जगदंबा मातेले

जालन्यामध्ये राम या मंबादेवीले (मम्मादेवीले)

रामुशामध्ये राम बारालिंगाले

रामलिंग स्वामिले रामेश्वराले

तोरडीमधी राम हैबतबाबाले

कान्होबादेवाले हदगाई दत्ताले

वाळकीमधी राम इसाईमातेले

अयोध्यामध्ये शेवंतामातेले (सीतामातेले)

देहू रे गावाचे तुकोबा साधुले

टोकळीमध्ये जानुबा बापूले

नांदेडमध्ये नवनाथाले

सारे तीर्थाले

या शनीदेवाचे दर्शन घेऊनी

जेजुरीमधी राम खंडोबा देवाले

पैठणामध्ये राम एकनाथाले

गावच्या हनुमंता चौफेर

विठ्ठलराव भक्ताच्या नावाची रे आन

सांभाळ मारुती रक्षण करती

वासुदेव येगळा आशीर्वाद नाही

गुरुयेगळा (वेगळा) मार्ग नाही

हरिहरा - - -

महादेव - - दत्त

वासुदेव - सूर्यभान लक्ष्मणराव तारापुरे

संकलक - प्रा.डॉ.सुभाष आहेर

❖ आशय :- नावामध्ये नाव देवाचे सातत्याने घेतले पाहिजे. त्यामुळेच वाल्या कोळयाचा वाल्मिकी ऋषी झाला. याची आठवण गीतातून वासुदेव करुन देतो. दानाचे माहात्म्य गीतातून सांगितलेले आहे. गीतातून स्थलविशिष्टता व तेथील दैवते यांचे उल्लेख आलेले आहेत. पहिल्या कडव्यात पंढरपूराचे वर्णन आलेले आहेत. पंढरपूर येथील विठ्ठल, रुक्मिणी, पुंडलिक, रोहिदास, नामदेव, कान्होपात्रा या सगळयांना तो दान पावते करतो. दत्त, अनुसया, रेणुकामाता, परशराम यांचेही उल्लेख पुढे आलेले आहेत. शेगावमध्ये गजानन महाराज, बामनगावात बोधले बुवा, कोल्हापुरात लक्ष्मीमाता, तुळजापुरात जगदंबामाता, जालन्यात मंबादेवी, तोरडीत हैबतबाबा, अयोध्येत सीतामाता, देहूत तुकोबाला, नांदेडमध्ये नवनाथाला, जेजुरीत खंडोबाला, पैठणमध्ये एकनाथास, गावच्या हनुमंतास या सर्वांना सुनबाईने दिलेले दान तो पावते करतो. गावचा मारुती गावाचे रक्षण करील. वासुदेवाच्या आशीर्वादासारखा दुसरा आशीर्वाद नाही आणि जीवनात गुरुशिवाय मार्गदर्शन नाही असे महत्त्व तो शेवटी अधोरेखित करतो.

४. वासुदेव सूर्यभान तारापुरे - गीत क्र.४ व आशय

चला मजला आईपित्याची सेवा करु द्या पुरी (२ वेळा)

विठ्ठल पांडुरंगा हा म्हणा तोवरी (तवरी) (तोवर - तोपर्यंत) ।।धृ।।

त्रिभवनी दैवत माझे वंदय पिता अन् आई (वदर्य)

काशी मथुरा गोकूळ सारे ग तिथं तयाच्या छाये

या आईबापाच्या सेवेसाठी उर तयाचा सागरी

विठ्ठला हो पांडुरंगा हा म्हणा तवरी ।१।

प्रितीचे रे पायी याच्यामध्ये इकडे येणे केले

प्रश्न करुनी भगवंताला पुंडलिक ते बोले

म्हणे पाठीमागे विट फेकली उभे राय विटवरी

विठ्ठला हो पांडुरंगा हा म्हणा तवरी

विठ्ठला मजला आई पित्याची सेवा करु द्या पुरी

विठ्ठला हो पांडुरंगा हा म्हणा तवरी ।२।

विठ्ठल माझा पिता मनीचा, आई माता हो रुक्माई

या आईबापाविना दैवत माझे जगात दुसरे नाही

कुठे आहे पंढरी विठ्ठला कुठे चंद्रभागा

आणि कुठे आहे पंढरी विठ्ठला कुठे चंद्रभागा

विठ्ठला हो पांडुरंगा हा मना तोवरी ।३।

वासुदेव - सूर्यभान लक्ष्मणराव तारापुरे

संकलक - प्रा.डॉ.सुभाष आहेर

❖ आशय :- वरील गीतातून वासुदेवाने भक्तश्रेष्ठ पुंडलिकाची कथा सांगितलेली आहे. पंढरीचा पांडुरंग साक्षात विठ्ठल पुंडलिकाला भेटण्यासाठी आले आहेत. परंतु पुंडलिक म्हणतो की, मला माझ्या आईवडिलांची सेवा पूर्णपणे करु द्या. तोपर्यंत तुम्ही थांबा व हो म्हणा, असे पुंडलिक विठ्ठलाला सांगतो. तीन भूवनात माझ्यासाठी आई वडील हेच श्रेष्ठ दैवत आहे. त्यांच्या सान्निध्यात काशी, मथुरा, गोकुळ इ.चे पुण्य मिळते. भगवंता माझ्यावरील प्रेमापोटीच तुम्ही इकडे येणे केले  ना? असा प्रश्न पुंडलिक विठ्ठलाला करतो. परंतु आता माझी आईवडिलांची सेवा करणे चालू आहे. पाठीमागे फेकलेल्या विटेवर थोडावेळ उभे रहा. आईवडिलाच्या सेवेत मग्न असणा-या पुंडलिकाची भक्ती पाहून विठ्ठलाला आनंद होतो.

शेवटच्या ओळीत अर्थाला कलाटणी मिळते. पुंडलिक म्हणतो, 'माझ्या मनीचा पिता हा विठ्ठल व आई माता रुक्माईच आहे'. या आईबापाविन दुसरे दैवत माझे जगात नाही. विठ्ठलालाच भक्त पुंडलिक प्रश्न विचारतो - 'कुठे आहे पंढरी आणि कुठे आहे चंद्रभागा'? हे दोन्हीही मला माझ्या घरीच आईवडिलांच्या चरणी दिसतात.

वासुदेवाच्या या गीतातून भक्त पुंडलिकाच्या आईवडिलांच्या सेवेचा महिमा सांगितलेला आहे.

५. वासुदेव ज्ञानदेव जोशी - गीत क्र.५ व आशय

तू दान दिलं
दान दैवाच्या नावाचं
दान घालू तुकोबाच्या, वंश वाढू तुकोबाला SS
ही भाग्यवंताच्या वाडयात SS

दान वाढलं उद्धार SS
नाव मुखात राहीन, कीर्ती जागोर जगात (जागर)

हो धनदान्य, उद्धार लाभू दे SSS
धनदान उद्धार लाभू दे SSS

वासुदेव - ज्ञानदेव कौतिक जोशी

संकलक - प्रा.डॉ.सुभाष आहेर

❖ आशय :- या गीतात दानाचे महत्त्व अधोरेखित केलेले आहे. तुकोबाच्या नावाने तो दान पावते करतो. तू दानधर्म केला ही चांगली गोष्ट आहे. या वाडयाचा वंश वाढू दे, भाग्यवंताच्या वाडयात भरभराट होऊ दे. दानधर्म केल्यामुळे तुमच्या सर्व कुळाचा उद्धार झाला. दानधर्म केल्यामुळे जगात नावलौकिक वाढेल, कीर्ती प्राप्त होईल. सर्वांच्या मुखी तुमचे नाव राहीन अशी आशा वासुदेव गीतातून दात्याविषयी व्यक्त करतो.

या घरात काहीच कमी पडू देऊ नको, धनदान्य भरपूर पिकू दे अन् या घराची प्रगती होऊ दे असा आशीर्वाद वासुदेव दात्याला देतो. या गीतातून कुटुंबाचे हीत होवो अशी भावना वासुदेवाने व्यक्त केली आहे.

६. वासुदेव नितीन विधाते - गीत क्र.६ व आशय

वासुदेव सांगतो ऐका
कुणी नेला संगतीला पैका
वासुदेवाच्या मांगट टाळू
झाला मायापायी घोळ

किती कमवलं कोटयानुकोटी
राहील शेवटी धरतीच्या पोटी
धर्म करा धर्मगती
धर्म जीवाचा सोबती आहे
जन्म झाला की जणू वाया
शूद्र आहे त्याची काया
धर्म केला पाची पांडवांनी
गुणवंताच्या नावाने
हरी ओम SSS पांडुरंग हरी
गोपाळ कृष्ण हरी
ब्रम्हदेवा- - - -

वासुदेव - नितीन विधाते
संकलक - प्रा.डॉ.सुभाष आहेर

❖ आशय :- वासुदेव हा आपल्या गीतातून समाजाला नीतिबोधाची शिकवण देतो. याची साक्ष वरील गीतातून वाचकास पटते. तुम्ही नीट लक्ष देऊन ऐका असे आवाहन वासुदेव करतो. कुणी जाताना पैसा घेऊन जातो का ? हे सर्व येथे सोडून जायचे आहे. संसार हा मायेचा बाजार आहे. हे सर्व येथेच टाकून जायचे आहे. तरी माणूस 'मी' पणाच्या अहंकारात व 'माझेपणाच्या' स्वार्थात अडकला आहे. तुम्ही कितीही कमवले तर मृत्यूनंतर हे सर्व येथेच टाकून जावे लागणारे आहे. आपल्याला शेवटी धरतीच्या पोटीच विसावा घ्यावा लागणार आहे. धर्म करा म्हणजे दानधर्म करा. दानासारखे पुण्य नाही. धर्म (दान) जीवाचा सोबती आहे. धर्म केला नाही तर जन्म वाया गेल्यासारखाच आहे. ही काया, हे शरीर दानधर्माविना खरोखरच क्षुद्रच आहे. म्हणून दानधर्म करा. पाची पांडवांनीही भरपूर दानधर्म केला होता. त्यामुळे त्यांना समाजातील अनेक गुणीजनांचे आशीर्वाद मिळाले होते.

समाजातील लोकांना दानाचे महत्त्व पटवून देऊन दान करण्याचे आवाहन वासुदेवाने या गीतातून केलेले आहे.

७. वासुदेव अमित विधाते - गीत क्र.७ व आशय

'सोवळयात नाचला पंढरी
संत ज्ञानेश्वरानी चालवली भिंत
जनीसंगे गीत गात
गायलेत गीत
तुझ्या नामाच रं ठेवा
हृदयात दाटला SSS
सोहळा तो दाटला पंढरी

सोहळा तो दाटला पंढरी
हरी ओम... विठ्ठला ऽऽ
पंढरीच्या पाटला ऽऽ
नमो गजानन नमो हनुमान
हनुमान बोले मी बलवान
गजानन बोले मी बलवान
नमो गजानन नमो हनुमान
दान पावलं.....दान पावलं...'

वासुदेव - अमित विधाते
संकलक - प्रा.डॉ.सुभाष आहेर

❖ आशय :- या गीतातून वासुदेवाने पंढरीनाथाचा गुणगौरव केलेला आहे. भक्तासाठी सोवळयात असताना पंढरीनाथ नाचला होता. संत ज्ञानेश्वरांनी भिंत चालविली होती. पंढरीनाथ जनीसंगे गीत गायले होते. या विठ्ठलाचे भक्तप्रेम पाहून वासुदेव म्हणतो की तुझ्या नामाचा महिमा, मोठेपणा माझ्या हृदयात दाटला. तुला भेटण्यासाठी सर्व भक्तगण पंढरीला एकत्र येतात या सोहळयासाठी भक्तांनी भरपूर गर्दी केलेली आहे. वासुदेवाने विठूरायाला 'पंढरीच्या पाटलाची' उपमा दिलेली आहे. पुढील चार ओळीत हनुमान व गजानन या दोघांमध्ये बलवान कोण? असा वाद होतो. या वादात वासुदेव न पडता दोघांनाही तेवढयाच आदराने नमस्कार करतो व म्हणतो.

"नमो गजानन नमो हनुमान" शेवटी 'दान पावलं, दान पावलं' असा उल्लेख करत दानाचे महत्त्व सांगतो.

८. वासुदेव नितीन विधाते - गीत क्र.८ व आशय

'हरीनाम बोला
वासुदेव आला हरीनाम बोला
हरी ओम ऽऽ हरी ओम
पंढरीच्या विठ्ठला
चरणी वाहतो
भेटतील तुझं ओव्या.... हे जीवनात
हरी हरी गोपाळकृष्ण हरी
वासुदेव हरी
पांडुरंगा शंभो नारायणा वासुदेवा
माझं विघ्न दूर करा
दान केलं ते विठ्ठलाला
दान केलं पांडुरंगाला
दान केलं महादेवाला

दान केलं मच्छींद्रनाथाला
दान केलं कानिफनाथाला
वासुदेव आला SS हरीनाम बोला
वासुदेव म्हणतोय दानधर्म करा वो दान
हरीनाम बोला....'

वासुदेव - नितीन विधाते
संकलक - प्रा.डॉ.सुभाष आहेर

❖ आशय :- सकाळच्या वेळी वासुदेव फेरी घालतो. लोकांना तो 'हरीनाम बोला हरीनाम बोला' असा आग्रह करतो. तसेच पहिले नमन तो पंढरीच्या विठ्ठलाला करतो. पांडुरंगाला, शकंराला, नारायणाला, वासुदेवाला विघ्न दूर करण्याचे आवाहन या गीतात केलेले आहे. दान केले तर सर्व विघ्न दूर होईल. केलेले दान विठ्ठलाला, पांडुरंगाला, महादेवाला, मच्छिंद्रनाथाला, कानिफनाथाला पावते करण्याचे काम वासुदेव करतो. शेवटी हरीनाम बोला असा आग्रह धरतो. पुन्हा दानधर्म करण्याचे आवाहन करतो, दानाचे महत्व सांगतो.

९. वासुदेव नितीन विधाते - गीत क्र.९ व आशय

'हरिओम
रामकृष्ण हरी वासुदेवाची स्वारी
पंढरीचा विठ्ठल कुणी पाहिला SS
पंढरीचा विठ्ठल कुणी पाहिला SS
उभा कसा राहिला विटेवर
उभा कसा राहिला विटेवर
अंगी शोभे पितांबर पिवळा (पुळा)
गळयामंदी वैजयंतीच्या माळा
चंदनाच्या या टिळा माथे शोभिला SS
चंदनाच्या या टिळा माथे शोभिला SS
उभा कसा राहिला विटेवर
विठोबाला जाऊ पंढरीला राहू
डोळे भरुनी माऊलीला पाहू
हरीनामाचा झेंडा तिथं लाविला
हरीनामाचा झेंडा तिथं लाविला
उभा कसा राहिला विटेवर
हरीओम वासुदेव हरी
पंढरीच्या विठुला
वाहतो मी मंजिरी
उभे टोपी नं पुढं
येशील गात येशील गात
धन्य धन्य तुझा महिमा

करुनिया थाट येशील गात
भेटू तुला कुठं घेशील गाठं'

वासुदेव – नितीन विधाते
संकलक – प्रा.डॉ.सुभाष आहेर

❖ आशय :– गीतातून पंढरीनाथाचे हुबेहुब चित्र उभे करण्याचे वासुदेवाचे कौशल्य या गीतातून दिसते. पंढरीचा विठ्ठल कुणी पाहिला? असा प्रश्न विचारुन त्याचे वर्णन वासुदेवाने पुढे केलेले आहे. युगानुयुगे विटेवर विठोबा उभा कसा राहिला? असा प्रश्न विचारुन पुढे पंढरीनाथाच्या वेशभूषेचे वर्णन पुढील शब्दात केलेले आहे. पंढरीनाथाने अंगात पिवळा पितांबर घातलेला आहे. गळयात वैजयंतीच्या माळा घातलेल्या आहेत. कपाळावर चंदनाचा टिळा किती चांगल्या पद्धतीने शोभून दिसतो आहे. पण हा विठ्ठल युगानुयुगे हात कंबरेवर ठेऊन विटेवर उभाच आहे. ही चिंता वासुदेवाला पडलेली आहे. या उत्सुकतेपोटी आपण पंढरीला जाऊन विठोबाला भेटू, दर्शन घेऊ आणि डोळे भरुन हया माऊलीला पाहू अशी इच्छा व्यक्त केलेली आहे. पंढरीला हरीनामाचा झेंडा तेथे लाविला. हा पंढरीनाथ विटेवर कसा उभा राहिला असेल? असा प्रश्न भक्ताच्या मनात सारखाच येतो. तेथे गेल्यांनतर पंढरीच्या विठ्ठलाला मी मंजिरी वाहतो. प्रचंड गर्दी झालेली आहे. तुझा महिमा गीतातून गात गात अनेक भक्तगण आलेले आहेत. या उत्सवात तुझा थाट हा काही वेगळाच आहे. भक्तही विठोबाच्या भेटीला तयारी करुन निघाले आहेत. विठ्ठलाच्या भेटीची ओढ त्यांना लागलेली आहे.

१०. वासुदेव नितीन विधाते – गीत क्र.१० व आशय

'उठा हो जागा झाला सारा
उठा हो पांडुरंगा, उठा चंद्रभागा
मराठयाच्या मुलखामधी
होई जागा पंढरीनाथ
घाला तुळशीला पाणी
साधुसंत गाती उठा पांडुरंगा
ऐका वासुदेवाची वाणी
घाला तुळशीला पाणी हरी ओम
वासुदेव म्हणतोय गानं
जागे होऊन करा हो दानं
सारा मायेचा हा बाजार
धर्म कामाला येणार'

वासुदेव – नितीन विधाते
संकलक – प्रा.डॉ.सुभाष आहेर

❖ आशय :- गाव जागवत येणारा वासुदेव देवादिकांची नावे घेत गाणी म्हणत लोकांना जागे करत असतो. सूर्य उगवला, सारे जग, निसर्ग जागा झाला आहे. तो आवाहन करतो, 'उठा हो पांडुरंगा, उठा चंद्रभागा' मराठयाच्या मुलखामध्ये पंढरीनाथ जागा झालेला आहे. उठा - आंघोळ करा आणि तुळशीला पाणी घालण्याचे आवाहन वासुदेव करतो. 'साधुसंत गाती उठा पांडुरंग' अशा आवाहनातून तो गावक-यांनाच जागे करत असतो. वासुदेवाची वाणी ऐकून तुम्ही जागे व्हा आणि स्नान करुन तुळशीला पाणी घाला. तुमच्या दारी येऊन वासुदेव गाणी म्हणतो आहे, तरी तुम्ही आता ऊठा, जागे व्हा आणि स्नानानंतर वासुदेवाला दानधर्म करा. हे जग, हा संसार हा एक मायेचा बाजार आहे. त्यामुळे या मोहात जास्त अडकू नका. अशावेळी तुम्ही केलेला धर्म, तुम्ही केलेला दानधर्मच तुमच्या कामास येणार, तुमच्या मदतीस येणार व तोच तुम्हाला तारणार. असा आशावाद शेवटी गीतातून व्यक्त झालेला आहे.

११. वासुदेव नितीन विधाते - गीत क्र.११ व आशय

'हरी ओम विठ्ठला पांडुरंगा वासुदेवा
वासुदेवा ब्रम्हदेवा
आलं विघ्न दूर करा
सत्यनारायणा माझी नौकं (नौका)
किना-याला लावं
सत्यनारायणा माझी नौकं (नौका)
किना-याला लावा
नौका किना-याला लावं रे देवा
नौकं किना-याला लावं रे देवा
श्रावणाला लाव देवा
पावण्याला पाव देवा
या क्षणी तू धाव
सत्यनारायणा माझी नौका
किना-याला लाव
नौका माझी पार बुडाली
या क्षणी तू धाव
सत्यनारायणा माझी नौका
किना-याला लाव
हरिओम
पांडुरंग हरी वासुदेवा'

वासुदेव - नितीन विधाते
संकलक - प्रा.डॉ.सुभाष आहेर

❖ आशय :- प्रत्येक माणसाचे जीवन हे विविध अडीअडचणी व प्रश्नांनी भरलेले असते. संसारात कुठलेही विघ्न यायला नको, आपल्या संसाराची नौका किना-याला सुखरुप लागावी अशी प्रत्येक माणसाची इच्छा असते. म्हणून माणूस विठ्ठल, पांडुरंग, वासुदेव, ब्रम्हदेव या सगळयांना विघ्न दूर करण्याची विनंती करतो. सत्यानारायणाला माझी नौका सुखरुपपणे किना-याला लाव अशी विनवणी करतो. श्रावणासारख्या पवित्र महिन्यात माझी नौका किना-याला लावा, माझ्या सग्यासोय-यांवरही कृपा करा, याक्षणी मात्र तुम्ही लवकर धाव घेऊन माझी नौका किना-याला लावा अशी आर्जवपूर्वक विनंती गीतातून सत्यनारायणास केलेली आहे. सत्यनारायणाने लवकर धाव घेऊन मला मदत करावी कारण 'माझी नौका पार बुडाली'. याच क्षणाला सत्यनारायणाने धाव घेऊन माझी बुडालेली नौका किना-यावर लावावी अशी आग्रहपूर्वक विनंती गीतातून केलेली आहे. पुनरावृत्तीमुळे आर्जव, विनंती याची परिणामकारकता प्रभावकारक ठरेलेली आहे.

१२. वासुदेव अमृत वाघ - गीत क्र.१२ व आशय

वडिलाच्या नावाने
अहो दान केले राव
दानधर्म पावन
जगदंबे नावान
खंडेराय देवाला
शनी शिंगणापूरात
दान महादेवाला
(वाडवडिलाचे) वाडवडलाचे दान
माझ्या चिंधूभावाच्या
खैरनार रायाच्या
(परविन) प्रविण दादाने
दान केले वडिलाचे
अहो जमान्याच्यामागे धावू (गाऊ)
कवाडाचे ओझं धावू
कवाडयाचे गाडयाचे
आपण जातो मिरवत
येतानी जन्माला काय आले घेऊनी?
आला होता जन्माला, तेव्हा नव्हती कोकी (लंगोट) रावू
तेव्हा नव्हता सदरा रावू
तेव्हा नव्हते कमरीला वस्त्र रावू
नव्हता तुला करदोडा
जगी नंगा होऊनी
संसारी आला रावू
घरदार बांधले, कन्यापुत्र झाले रावू
बहीणभाऊ झाले रावू
माझं माझं म्हणूनी
शेवटी वाया जाशीन
आला काळ नेण्याला

यमराज भेटीचा
पोरं बसले घरात
तुला मला घेऊनी
मसणात जाशीन
येथे नाही नौकरी
येथे नाही सावकारी
येथे नाही भिकारी
लाकूड गवरीचं सरण रचलं
या आपल्या रावूनं
कोणी दिली चेटून
तवा हे खोटं रावू
आम्ही मेल्या मानवाचा
उध्दार करतो .. दान पावलं
दान पावलं ..

वासुदेव - अमृत शकंर वाघ
संकलक - प्रा.डॉ.सुभाष आहेर

❖ आशय :- दानधर्म मिळाल्यानंतर वासुदेव विविध देवतांच्या नावे दान पावते करतो.दात्याच्या नावाचा गीतातून उल्लेख केलेला आहे. जमान्याच्या मागे धावून, मायारुपी संसाराच्या मागे आपण फक्त पळत राहतो. जन्म झाला तेव्हा साधा करदोडा, कमरेला वस्त्र, सदरा काहीही नव्हते. नंगाच जन्म होतो. संसारात रमल्यावर आपण घरदार बांधतो, मुलेबाळे होतात. बहीणभावात आपण रमतो. संसारात आपण 'माझे माझे' म्हणत बसतो. शेवटी मात्र काळ आपल्याला घ्यायला येतो. येथे भेदभाव नाही, सावकारी नाही, कोणी भिकारी नाही, शेवटी सर्वांनाच स्मशानात जायचेच असते. सरणावर आपले शरीर ठेऊन अग्नी दिला जातो. म्हणून सर्वांनी मनी खूणगाठ बांधा की मृत्यू अटळ आहे. माझं माझं म्हणत बसण्यापेक्षा इतरांसाठी जगा, दानधर्म करा, सेवा करा. 'मी' पणा सोडून द्या. शेवटी वासुदेव म्हणतो की आम्ही मेल्या मानवाचा उध्दार करतो.

१३. वासुदेव अमृत वाघ - गीत क्र.१३ व आशय

सांगा देवा नऊ महिन्याची कशी केली यंत्रणा
सांग प्रभू नऊ महिन्याची कशी झाली यंत्रणा
पहिल्या महिन्यामध्ये बाळाला निज रुजविले रे
दुस-या महिन्यामध्ये बाळाला माथाचे डोळे बनविले ना
तिस-या महिन्यामध्ये बाळाला शीर मान आले
चौथ्या महिन्यामध्ये बाळाला हात पाय फुटले
पाचव्या हो महिन्यात पंचभूत केले
सहाव्या महिन्यात बाळाला सव्वे जत्रा सारली रे
सातव्या महिन्यात बाळाला नख केस फुटले
आठव्या महिन्यामध्ये अख्खे अंग तयार केले

नवव्या महिन्यामध्ये हात जोडूनी देवाला बोले
शंभो आला क्षण भाग्याचा
लाभूदे कलियुगाचा वारा
तुझी सेवा करीन
शंकरा येथ जन्मभरा
सरले नव्व (नऊ) दिवस बाळाला ढकलुनी दिले
लागला कलियुगाचा वारा (कलियोगाचा)
तो क्यांव क्यांव बोलला
उच्चारण्या माझा शब्द बाळ विसरला
महादेव भोळा रे सदाशिव शकंर भोळा
बापाच्या मस्तकी नणिवेचा पुतळा
सदाशिवाला पार्वती बोलली हसून
नव महिने व नव दिवसाची पटली शंभू खूण
सात वाराचं बाळ जन्मला तो कैसा होईन
सात वाराचे सात प्रकार सांगा मला जन्मीन
तवा शकंरा हसून बोलतो गिरिजा कारण
मंगळवारी तो जन्मला सुखात राहीन
मंगळवारी होईल जन्म कुळ जात राहीन
बुधवारी रे तो जन्मला, देवाचे रे ध्यान
बस्तरवारी होईल जन्म, गुरुचे हो ध्यान
शुक्रवारी तो जन्मला, चंचल त्याचे मन
शनिवारी दादा तो जन्मला कर्जात राहीन
शनिवारी रे तो जन्मला कर्जात राहीन
ऐतवारी होईल जन्म कीरदी (कीर्ती) लावीन
सोमवारी रे बाळ जन्मला आहे पुण्यवान
मंगळवारी रे तो जन्मला स्वर्गात जाईन
सात वार नव महिन्याचे ऐकावे खूण
त्या बाळाचा पिंड घडवला ब्रम्हदेवानं
कुडीत आत्मा घातला गिरीजाने शकंरानं
पालनपोषण केले विष्णूदेवानं
एकदा येणं एकदा जाणं
ठेवा राजा ध्यान
(मानवता) जातीपुरते रहा तुम्ही सिध्द, घ्या तुम्ही ऐकूनी
गर्भवतीची खूण सांगतो
अमृत येऊनी
सदाशिवाला पुसे पार्वती गर्भाची खूण
सांगा शकंरा नवमहिन्याची कशी होती रत्न

वासुदेव - अमृत शकंर वाघ
संकलक - प्रा.डॉ.सुभाष आहेर

❖ आशय :- या गीतात नऊ महिन्याची गर्भातील बाळाची वाढ कशी होते? याचा प्रवास शब्दबध्द केलेला आहे. प्रत्येक महिन्यात गर्भाची कशी वाढ होते याचे सूक्ष्म वर्णन गीतातून केलेले आहे. बाळाला हळूहळू डोळे, मान, हात, पाय, पचेंद्रिये, नख, केस असे सर्व अवयव येतात. आठव्या महिन्यात सर्व शरीर तयार झाले. नवव्या महिन्यानंतर भाग्याचा क्षण येतो आणि बाळाचा जन्म होतो. कलियुगाचे वारे त्याला लागते. मात्र मोठे झालेले बाळ परमेश्वराची सेवा करण्याचे वचन विसरते. पुढे पार्वती शकंराला सात वारांना जन्म झालेल्या बाळांचे वैशिष्टय विचारते. तेव्हा शकंर तिला सांगतो की, सोमवारी जन्मलेला पुण्यवान, मंगळवारी जन्मलेला स्वर्गात जाईन - सुखात राहीन, बुधवारी जन्मलेला देवाचे ध्यान करीन, बस्तरवारी (गुरुवारी) जन्मलेला गुरुचे ध्यान करीन, शुक्रवारी जन्मलेला चंचल राहीन, शनिवारी जन्मलेला कर्जात राहीन, रविवारी जन्मलेला कीर्ती मिळवीन अशी सात वारांची जन्मकथा तो सांगतो. बाळाचा पिंड ब्रम्हदेवाने घडविला व कुडीत आत्मा घातला तो गिरिजा व शकंराने, पालनपोषण केले ते विष्णूदेवाने असे सांगून वासुदेव माणसाला आवाहन करतो की जन्माला येणं जाणे हे एकदाच आहे. म्हणून चांगले जीवन जगा. जन्माला आलेल्या प्रत्येकाला मृत्यू हा आहेच. जन्माचे रहस्य, नऊ महिने होणारी गर्भाची वाढ व विकास, साती वारांचे महत्त्व हे शकंर पार्वतीच्या संवादातून वासुदेवाने सांगितलेले आहेत. गीताच्या शेवटी वासुदेवाने आपले 'अमृत' हे नाव गुंफलेले आहे.

१४. वासुदेव अमृत वाघ - गीत क्र.१४ व आशय

या संसारासाठी बारा वाटा जाशी
संसाराचा भरला माझ्या अंगी ताठा
कोणी संभाळा संभाळा नर नारी
कठीण आहे यमाचा झपाटा
अरे येतानी काय घेऊन येशी
मग जातानी नगरीबाहेरी काय बांधुनी नेशी?
तुम्ही एकच घ्यावे प्रभुचे नाम
त्यातूनी तारीन तुला एक भगवान
येशील जैसा जाशील जाशील
संगती काय नेशील?
येशील जैसा जाशील प्राण्या
कोणावरी रुसशी? ।।१।।
येशील जैसा जाशील जाशील
संगती काय नेशील? ।।धृ।।
काही केले तू न जन्मी येऊनी
काही केले मी न जन्मी येऊनी
मोठया गर्वात घालू नको जीवन
जगी मस्तीत घालू नको जीवन
थोडे ठेवा शांतती तुमचे मन
अहो चुकले प्रभुचे भजन
हरीनाम मुखाने जेंव्हा घेशील घेशील ।।२।।
संगती काय नेशील
येशील जैसा जाशील जाशील ।।धृ।।
धन जोडीले कवडी कवडी

आपण राहण्यास बांधली माडी
अहो राहण्यास बांधली माडी
गावाबाहेर तुझी शेतीवाडी
तुला झोपायला गादीची घडी
आला काळ तुला रे नियाला
सर्व सोडून मसणात जाशी
अवघं टाकूनी मसणात जाशी
आला काळ तुला रे नियाला
अवघं टाकूनी मसणात जाशी ।।३।।
येशील जैसा जाशील मुर्खा
संगती काय नेशील ।।धृ।।
नाही कोणाचे कन्यापुत्र,
धनासाठी रे रडती जगात
सांगा कोणाचे कन्यापुत्र,
धनासाठी रे रडती जगात
अवघी माया लबाड तुझी,
हसशी हसशी कुणावरी रुसशी
येशील जैसा जाशील प्राण्या ।।४।।
येशील जैसा जाशील जाशील
संगती काय नेशील? ।।धृ।।
तुका म्हणतो अवघे जन
शिल्लक नाही राहिले तुझे कोण?
शिल्लक नाही राहिले तुझे कोण?
भावा-भावाचं दुश्मन बनं
सर्व पैशाकडे माझं ध्यान
आत्मा गेला सोडून सर्व
जाशील जाशील ।।५।।
येशील जैसा जाशील जाशील
संगती काय नेशील ।।धृ।।

वासुदेव - अमृत शकंर वाघ
संकलक - प्रा.डॉ.सुभाष आहेर

❖ आशय :- माणसाला हा सर्व संसार एक दिवस सोडून जगाचा निरोप घ्यायचा आहे. म्हणून गर्व सोडून वागले पाहिजे. शांत मन ठेवून ईश्वराचे नामस्मरण करण्याची अपेक्षा वासुदेव आपल्या गीतातून करतो. पैशाच्या पाठीमागे न धावता सदाचरण माणसाने ठेवले पाहिजे अशी अपेक्षा वासुदेव या गीतातून करतो. संसारात ताठा म्हणजे गर्व काहीच कामाचा नाही. यमाचा झपाटा म्हणजे मृत्यू कधीही येऊ शकतो म्हणून कोणावरही रुसू नकोस, जाताना काहीही नेणार नाही, येताना काहीही आणले नव्हते एवढे तू लक्षात ठेव. गर्व व मस्ती बाजूला ठेऊन जीवन जग. मनात शांती व समाधान ठेव. यासाठी नेहमीच प्रभूचे नाव तू घे, संगती तू काहीच

नेणार नाहीस. कवडी कवडी एकत्र करुन तू धन जमा केले, माडी बांधली, गावाबाहेर शेतीवाडी घेतली, झोपण्यास गादी पण काळ (यम) तुला घ्यायला आल्यावर हे सर्व तुला येथेच सोडून जायचे आहे. अवघे येथेच सोडून तुला शेवटी स्मशानात जायचे आहे. कन्या व पुत्र शेवटी कामी येत नाही. धनासाठी ते एकमेकांमध्ये भांडतात. त्यामुळे अवघी माया, संसार लबाड आहे. शेवटी आपले कोणीही रहात नाही. संपत्तीवरुन भाऊ भाऊ एकमेकांचे शत्रू बनतात. सर्वांचे लक्ष पैशाकडे लागले आहे. म्हणून तू जन्माला आल्यावर प्रभूचे नामस्मरण कर. प्रभूचे नामस्मरण तुला तारेल. त्यामुळे तू 'माझं माझं' करत बसू नकोस. येताना रिकाम्या हाती आला होता. जाताना सुद्धा रिकाम्या हातीच तुला जायचे आहे. हे लक्षात ठेव अशी सूचना गीतातून वारंवार वासुदेव करतो.

## ३.३ वासुदेवाची संकलित गीते - आशयवैविध्य व सौंदर्य

वासुदेवाच्या संकलित गीतातून आशयवैविध्य जाणवले. अनेक गीतातून दानाचे महत्त्व अधोरेखित केले आहे. भावनासौंदर्य व विचारसौंदर्य यांचाही प्रत्यय वासुदेवाच्या गीतातून येतो. मृत्यूचे तत्वज्ञान, दानाचे माहात्म्य, सद्वर्तन यावरही वासुदेवाच्या काही गीतातून प्रकाश पडलेला आहे. संसार हा मायेचा बाजार आहे. तसेच त्याचे अस्तित्व पाण्याच्या बुडबुडयासारखे आहे. अहंकार हा जीवनाचा नाश करतो. संसारातील मानवी नात्यांतील भावबंधही काही गीतातून उलगडून दाखविलेले आहेत. संसारात रामनाम महत्त्वाचे आहे. येताना देह उघडा असतो. जातानाही बरोबर काही नेता येत नाही. दानधर्म केल्यामुळे कीर्ती वाढेल, भक्त पुंडलिकाच्या भक्तीचा महिमा, नीतिबोधाची शिकवण, पंढरीनाथाचा गुणगौरव, नित्यनेमाने चांगली कामे करण्याचा उपदेश, संसाराची नौका, मायारुपी संसार व काळाची भेट, नवमहिन्यांची वाढ व साती वारांचे महत्त्व, शकंर पार्वतीचा संवाद, सदाचरणाचे महत्त्व, स्वार्थी नातेसंबंध अशा विविधांगी स्वरुपाचा आशय संकलित केलेल्या गीतातून प्रकर्षाने जाणवला. वासुदेवाची गीते ही मानवी मनाला सद्वर्तनाचे आवाहन करतात. तसेच वासुदेवाच्या गीतांतून मानवी मनाच्या भावभावना, इच्छा आकांक्षा प्रतिबिंबित होतात. "लोकसाहित्य हे लोकजीवनाला सामग्र्याने गवसणी घालणारे असल्यामुळे त्यात लोकांच्या भाव-भावना, इच्छा-आकांक्षा, सुख-दुःखे, श्रध्दा-धारणा, राग-व्देष, आचार-विचार अनावृत्त स्वरुपात व्यक्त होत असल्यामुळे अभिजात साहित्याला त्याच्यापासून जीवनरस प्राप्त करणे शक्य होते."[३] याचा प्रत्यय वरील संकलित गीतातून येतो. वासुदेवाच्या गीतातून व्यक्त होणारे विचार मौलिक स्वरुपाचे आहेत. धर्म, संस्कृती, समाजजीवन आणि व्यक्तिजीवन या संदर्भात विचार गीतातून मोठया प्रमाणात आलेले आहे. आईवडील हेच आपले खरे दैवत, त्यांची सेवा करणे हाच आपला धर्म असे तो प्रेक्षकांच्या मनावर संस्कारित करतो. गावक-यांना तो उठवितो व म्हणतो की, 'रामाच्या पहारी आपुल्या दारी, सूर्याचा दिवा जळतो गं' यातील 'सूर्याचा दिवा' ही कल्पना अप्रतिमच आहे. विठोबाचे वर्णन करताना तो 'पंढरीच्या पाटला' असे म्हणतो. अशाप्रकारे वासुदेवाची जी गीते संकलित केली होती त्यात आशयवैविध्य, विचारसौंदर्य व कल्पनासौंदर्य वरील प्रकारे जाणवले.

## ३.४ समारोप

वासुदेवाची भेट होणे, त्यांची मुलाखत घेणे, त्यांचे फोटो काढणे आणि गाणी ध्वनिमुद्रित करणे हा एक प्रयत्नसाध्य, कष्टप्रद असा भाग आहे. काहीवेळा वासुदेव माहिती देत

नाहीत. परंतु आपला प्रामाणिक हेतू, अभ्यासाचा भाग, वस्तुस्थिती सांगितली तर ते माहिती देतात. असा प्रस्तुत अभ्यासकाचा अनुभव आहे. ध्वनिमुद्रित केलेली गाणी पुन्हा पुन्हा ऐकून ती लिहून काढणे हा एक अभ्यासातील चिकाटीचा महत्त्वपूर्ण असा भाग आहे. अशा क्षेत्रीय पध्दतीचा वापर करुन प्रस्तुत अभ्यासकाने वासुदेवाची गीते संकलित केली. वासुदेवाची गीते म्हणजे मराठी वाङ्मयात पडलेली मोठी भरच आहे. वासुदेवाच्या गीतांतून व्यक्त होणाऱ्या सौंदर्यदर्शनामध्ये कल्पनासौंदर्य व विचारसौंदर्याचा वाटा मोठा आहे. समाजातील वृतीप्रवृतींचे दर्शन व मानवी जीवनाच्या क्षणभंगुरतेचे दर्शन वासुदेवाच्या गीतातून दिसते. वासुदेव आपल्या गीतातून जीवनविषयक व्यापक तत्त्वज्ञान अतिशय सोप्या भाषेत सांगतो. मराठी लोकसंस्कृतीच्या जडणघडणीत वासुदेवाचेही योगदान मौलिक स्वरुपाचे आहे.

संदर्भटिपा :-


१. प्रभाकर मांडे, 'लोकसाहित्याचे स्वरुप', सहावी आ., गोदावरी प्रकाशन, औरंगाबाद, २०१७, पृ.२७६.

२. इरावती कर्वे, 'मराठी लोकांची संस्कृती', दु.आ., देशमुख आणि कं., पुणे, १९६२, पृ.२४६.

३. दुर्गा भागवत, 'लोकसाहत्याची रुपरेखा', दु.आ.(सु.आ.), वरदा बुक्स, पुणे १९७७, प्रस्तावना पृ.८.

# प्रकरण चौथे

## वासुदेवाची गीते - महत्त्वपूर्ण विशेष

# प्रकरण चौथे

## वासुदेवाची गीते - महत्त्वपूर्ण विशेष

४.१ प्रास्ताविक

४.२ वासुदेवाची गीते - महत्त्वपूर्ण विशेष

१. लोकभाषा व शब्दवैभव

२. कथाकथन कौशल्य

३. प्रयोगात्म कला - एकपात्री प्रयोग

४. नीतिबोधाची शिकवण

५. विचारसौंदर्य

६. कल्पनासौंदर्य

७. भावभावनांची अभिव्यक्ती

८. सूचकता

९. दान पावते करण्याची पध्दती

१०. स्थलविशिष्टता

११. आजच्या प्रश्नांविषयी जाणीवजागृती

४.३ समारोप

संदर्भटिपा

# प्रकरण चौथे

# वासुदेवाची गीते - महत्त्वपूर्ण विशेष

## ४.१ प्रास्ताविक :-

वासुदेव हा कृष्णभक्त आहे. परंतु कृष्णकथेबरोबरच इतर अनेक कथा तो गीतातून सांगत असतो. परंपरेने चालत आलेली गीते तो म्हणतो, परंतु त्यात काहीवेळा स्वतःची भरही तो घालत असतो. लोकगीते गाणारा प्रत्येक कलावंत त्यात काही नव्याने शब्दांचीही भर घालतो. वासुदेवाच्या गीतातून विचारसौंदर्य, कल्पनासौंदर्य, भावसौंदर्य, निवेदनाचे कौशल्य, प्रयोगात्मकता, लोकभाषेची अभिव्यक्ती, नीतिबोधाची शिकवण, स्थलविशिष्टता आदी वैशिष्टये प्रकर्षाने जाणवतात. धर्मभावना जागृत ठेवण्याचे, लोकदेवतासंबंधी श्रध्दा अविचल राखण्याचे व समाजाला नीतिबोधाची शिकवण वासुदेव पिढयानपिढया करत आलेला आहे. वासुदेव भक्तीचा महिमा लोकांना गीताच्या माध्यमातून पटवून देतो. "खेडेगावात जत्रेमध्ये वासुदेव जातो. नदीच्या पात्रात उभे राहून वासुदेवाला दानाच्या रुपात काही काही देण्याची पध्दत आहे. जेव्हा गावोगाव फिरुन वासुदेव भिक्षा मागतो तेव्हा प्रत्येक वासुदेवाला गाव नेमून दिले जाते. दरवर्षी भिक्षा मागण्यासाठी तो तेथे जातो. नेमलेली गावे सोडून जेव्हा तो दूरच्या गावात जाऊन भिक्षा मागतो तेव्हा डोक्यावर मोरपिसांची टोपी घालत नाही"[१] असे काही नीतिनियम वासुदेवांमध्ये असतात. दान पावलं ऽऽ दान पावलं असे गात तो भल्या पहाटेच फेरी काढतो. त्या त्या गावांची, देवांची नामावळी उच्चारित असताना टाळांनी साथ देऊन एक नादमाधुर्य त्याच्या गीतगायनास प्राप्त होते. "भगत मागत्यांच्या गायकांमध्ये कृष्णसखा वासुदेव हा लोकसंस्कृतीचा महत्त्वाचा संरक्षक आणि प्रसारक मानला जातो."[२] वासुदेव अंगणात, दारात उभा राहिला म्हणजे प्रत्यक्ष भगवान श्रीकृष्णच भेटल्याचा आनंद होतो.

## ४.२ वासुदेवाची गीते - महत्त्वपूर्ण विशेष :-

वासुदेवांच्या गीतांचा अभ्यास केल्यानंतर त्यांची काही वैशिष्टये प्रकर्षाने जाणवली. परंपरेने चालत आलेली गीते जरी तो म्हणत असला तरी तो त्यात नित्यनूतन अशी भर घालत असतो. कालौघात वासुदेवाची परंपरा लोप पावत आहे. त्यामुळे त्यांची गीतेही लोप पावतील अशी भीती आहे. वासुदेवाच्या गीतांचे पुढील काही विशेष आहेत.

### १. लोकभाषा व शब्दवैभव -

वासुदेवाची गीते ही लोकभाषेतूनच व्यक्त होतात. भाषेचा जिवंतपणा त्यांच्या गीतातून दिसतो. मौखिक परंपरेने चालत आलेली ते गीते म्हणतात. काही वेळा आठवले नाही तर समयस्फूर्त रचना करुन भावाभिव्यक्ती करतात. त्यांच्या गीतात शब्दवैभवाबरोबरच उच्चारवैभवही आढळते. एकच शब्द कितीतरी रुपांत निरनिराळया उच्चारात बोलला जातो. उदा. पृथ्वी हा शब्द पिरथवी, पुरथवी, पिरथिमी, प्रिथवी इ. उच्चार रुपात बोलला जातो.

अर्थाच्या दृष्टीने शब्दांचा उपयोग दुहेरी स्वरुपात केला जातो. "वासुदेवाच्या गीतांची रचना, साधी, चाली सोप्या असतात. त्यात उपमा अलंकाराचा सोस नसतो. नृत्य, संगीत आणि त्यातून प्रकट होणारे नाटय हे वासुदेवांच्या गाण्यांचे विशेष होत."[३] वासुदेवाची कथागीते ही लोकजीवनातील नेहमीच्या वापरातील शब्दांनीच बध्द असतात. बोलीभाषेचा नेमका वापर आणि निवेदनातील भाषेचा ग्रामीण ढंग या गोष्टीमुळे वासुदेवाची गाणी श्रवणीय बनतात. व्यापक व जीवनास उपयुक्त तत्त्वज्ञान वासुदेव सहज सोप्या भाषेत मांडतो. भ्रांती, रुपै (रुपया), संगाटी (सोबती), विघ्रुनी (विरघळुनी), आकल (अक्कल), मैया (माया), आजूळ (आजोळ), माहयर (माहेर), देहोमधे (देहूमध्ये), सेवातामाता (सीतामाता), येगळा (वेगळा), तोवरी < तवरी (तोपर्यंत), वदर्य (वंदय), जागोर (जागर), पैका (पैसा), पुळा (पिवळा), नौकं (नौका), नव < नव्व (नऊ) अशाप्रकारचे उच्चारसौकर्य असणारे शब्द आढळतात. हे उच्चारसौकर्य गीताला यमक व चाली देण्याच्या प्रभावातून व लोकभाषेच्या प्रभावातून आलेले असते.

२. कथागायन कौशल्य -

वासुदेवाच्या गीताचे निवेदनकौशल्य हे सहज व उत्स्फूर्त असते. श्रीयाळ-चांगुणा, कबिराची आतिथ्यशीलता, जनाईची भक्ती, कर्मसंपत्तीचे भांडण आदि कथागीते गाताना तो सामाजिक भाष्यही करत असतो. वासुदेवाची काही कथागीते सामाजिक आशयप्रधान असतात. वासुदेवाची कथागीते प्रासादिक शैलीत असतात. पौराणिक व्यक्तींच्या आदर्शातून भक्तीचा महिमा अशा कथागीतातून वासुदेव सांगत असतो. वासुदेवाच्या कथागीतांना आणि स्फूटगीतांना नृत्य, संगीत व नाटय यांची साथ लाभलेली असते.

३. प्रयोगात्म कला - एकपात्री प्रयोग :-

वासुदेवाच्या कलेचा एक महत्त्वपूर्ण विशेष म्हणजे टाळ, चिपळया तोच वाजवितो, नृत्यही तोच करतो, गीतही तोच गातो. अशा विविध भूमिका तो एकटाच करत असतो. एका अर्थाने त्याचा लोककलाविष्कार म्हणजे एकपात्री नाटयप्रयोगच असतो. तो पारंपरिक पोशाखात घरोघरी फिरुन गीते गातो. गीताला संगीत, नृत्य व अभिनयाची जोड असते. बासरी, पायातील चाळ, टाळ व चिपळया ही त्याची पांरपरिक संगीतवाद्येच आहेत.

४. नीतिबोधाची शिकवण -

भल्या पहाटे अंगणात येऊन गाणी गाणारा वासुदेव समाजाला नीतिबोधाची शिकवण गीताच्या माध्यमातून देत असतो. समाजातील वृत्ती, अपप्रवृत्तींचे दर्शन त्यांच्या गीतातून त्यांनी घडविले. लोकांची मानसिक व सांस्कृतिक गरजापूर्ततेचे कामही वासुदेवाने केले. प्राचीन काळापासून अस्तित्वात असलेल्या 'वासुदेव' या संस्थेला लोकजीवनात व लोकसंस्कृतीत आगळेवेगळे स्थान आहे. वासुदेव धर्मोपासना व लोकशिक्षणाचे कार्य करीत आलेला एक कलावंत आहे. या संस्थेने लोकांना धर्मकथा सांगितली, नीतिबोध केला व अध्यात्माची ओळख करुन

दिली. हरीभक्ती प्रसारक व नीतिशिक्षण देणारा वासुदेव हा लोकशिक्षकच आहे. महाराष्ट्राचे लोकसंचित समृध्द करण्याचे कार्य वासुदेवाने केले. अनेक गीतातून त्याचा प्रत्यय येतो.

'आई मावली वाटंनी चालली

तिची निंदा करु नको'

आयुष्यात माणसाने चांगले जीवन जगावे पुढे तो म्हणतो -

'अरे लांडी लबाडी, घर कुणाचं बुडवू नको'

समाजातील अभिमानी व गर्विष्ठ वृत्तीवर वासुदेवाने टीका करुन नैतिकतेने वागावे असे म्हटलेले आहे. रामनामाची महती तो गाताना 'मनीचा भाव शुध्द असावा' असे आवाहन तो करतो. समाजाने सुखाने, आनंदाने जगावे यासाठी तो संतांचे विचार व उच्च जीवनमूल्ये गीतातून सांगतो. उदा.

'पाण्याचा बुडबुडा जाईल विघ्रुनी

जाईल बसून

आला रे अहंकार'

पुंडलिकाच्या कथागीतातून तो आईवडिलांच्या सेवेचा संदेश देतो. माझे वडील हेच विठ्ठल व आई हीच रुखमाई हे सांगताना वासुदेव म्हणतो -

"विठ्ठल माझा पिता मनीचा, आई माता हो रुकमाई

या आईबापाविन दैवत माझे जगात दुसरे नाही"[४]

सकाळी फिरताना वासुदेव आपल्या गीतातून लोकांसाठी जणू जागल्याचीच भूमिका करत असतो.

"ऐका वासुदेवाची वाणी

घाला तुळशीला पाणी

वासुदेव म्हणतोय गाणं

जागं होऊन करा हो दान

सारा मायेचा हा बाजार

धर्म कामाला येणार"[५]

अशा विविधांगी प्रकारे नीतिबोधाची शिकवण तो देत असतो.

५. विचारसौंदर्य :-

वासुदेवाच्या गीतांचे वैशिष्टय म्हणजे मोजक्या शब्दांचा चपखल वापर करुन विचार सौंदर्य त्यातून प्रतिबिबिंत होते. भावाभावांनी आपसातील भांडण मिटवून घ्यावे उगीच कोर्टाची पायरी चढू नये. हे सांगताना तो म्हणतो -

"अवो दुही भावांचा

तंटा चालला

सरकारामंदी जाऊ नको" - सरकारामध्ये म्हणजे कोर्टामध्ये जाऊ नका असे त्याला सांगायचे असते. वासुदेव या उपासकाने लोकांचे रंजनच केले नाही तर चांगले विचार देऊन लोकांना सुस्कांरित केले. वासुदेवाच्या गीतांतून व्यक्त होणा-या सौंदर्यदर्शनामध्ये विचारांचा मोठा वाटा आहे. गीतातून व्यक्त होणारे विचार मौलिक स्वरुपाचे असून त्यांना जीवनानुभूतीची जोड आहे. प्रत्यक्ष जीवन जगताना हे उपयुक्त ठरतात. या विचारांची परिणामकारकता मोठी आहे. उदात्त व भावगर्भ विचार व्यक्त होतात. धर्म, संस्कृती, समाज आणि व्यक्तिजीवन या संदर्भात विचार गीतातून आलेले असतात. जीवनात आपण उघडेच येतो, जातानाही आपण रिकाम्या हातानेच जातो. अशा आशयाचा विचार वासुदेवाच्या अनेक गीतातून आलेला आहे. परमेश्वराच्या नामस्मरणाबरोबरच आईवडिलाची सेवा करावी, आईवडील हेच आपले खरे दैवत असा मौलिक विचार तो मांडतो. दानधर्म केल्याने तुझे नाव जगात राहीन असा विचार त्याचा सुखावून जातो. "वासुदेवाच्या मुखी रंगणारी गाणी विविध प्रकारची आहेत. त्या गाण्यांत काही बाळकृष्णाचे चरित्र रंगविणारी आहेत, काही भक्तीचा महिमा आळविणारी आहेत; काही प्रपंचाचे स्वरुप रेखाटून तो नेटका करण्याची नीती सांगणारी आहेत; काही कौटुंबिक भावबंध उलगडणारी आहेत आणि काही गाणी सरळ-सुबोध भाषेत वेदान्त स्पष्ट करणारी आहेत."[६] वेदान्तातील विचार सोप्या भाषेत व कमी शब्दात वासुदेव सांगत असतो.

६. कल्पनासौंदर्य :-

वासुदेवाच्या गीतातील कल्पनाविलासातून येणारी सौंदर्यप्रचिती इंद्रियगोचर असून मानसिक पातळीवरचा आनंद देणारी अशी आहे. काव्यमय कल्पना, उपमा, रुपकांचा-यमकांचा वापर त्यामुळे कल्पनासौंदर्य वृध्दिंगत होते. उदा. वासुदेव कृष्णगीतात राधाकृष्णाच्या लटक्या भांडणाचे व त्यांच्यातील प्रश्नोत्तराचे सुंदर वर्णन करतो. कृष्ण राधेच्या विविध प्रश्नांना उत्तरे देतो व शेवटी म्हणतो, 'आम्ही नव्हं त्या कर्माचे, किती छळती रे?' असा प्रश्नही करतो. भल्या पहाटे येणारा वासुदेव सहजरित्या गीते म्हणतो त्यातूनही कल्पनासौंदर्य जाणवते - उदा.

"रामाच्या पहारी, आपुल्या दारी
सूर्याचा दिवा जळतो गं
लवकर उठा आळस झाडा
वासुदेव सांगून जातो गं|"

'सूर्याचा दिवा' ही कल्पना अप्रतिमच आहे. आपल्या अगोदर पाखरांचा किलबिलाट, गोठयातल्या जनावरांची हालचाल म्हणजेच आळस सोडा व कामाला लागा असा सुंदर विचार या कल्पनेतून तो देतो. मूळ आशयाशी एकरुपता ठेवून कल्पनेच्या मदतीने लोकभाषेतून हे विचार आविष्कृत होतात. मौलिक अर्थ त्यामुळे प्राप्त होतो. माणसाचा देह जाताना आत्मा येथे सोडून तो जातो, संसार म्हणजे पाण्याचा बुडबुडा, मायेवाचून माहेर नव्हे, धर्म जीवाचा सोबती आहे, नौका किना-याला लावणे इत्यादी ओळीतून कल्पनासौंदर्याचा प्रत्यय येतो. वासुदेव गीतातून विठोबाचे 'पंढरीचा पाटील' असे वर्णन करतो.

७. भावभावनांची अभिव्यक्ती :-

वासुदेवाच्या अनेक गीतातील विचारांना अनेक भावच्छटाही असतात. अनेक भावगर्भ विचारांची अभिव्यक्ती हा एक विशेष त्याच्या गीतांचा असतो. आईवडिलांमध्ये देवत्व पाहण्याचा उदात्त व व्यापक विचार वासुदेवाच्या अनेक गीतातून दिसतो. ही गीते म्हणजे सहजस्फूर्त आविष्कार. माणसाने माणुसकीने, नीतिमत्तेने जगावे, लाचारी पत्करु नये, आईवडिलांची सेवा करावी, रावणासारखा अहंकार करु नये, जीवन हे क्षणभंगुर आहे अशी भावनांची अभिव्यक्ती त्याच्या गीतातून जाणवते. वासुदेवाच्या दान पावलं SS या पावतीमागे दान देण्याचे, दान स्वीकारण्याचे आणि दान पावते करण्याची भावना आहे. दानाच्या माध्यमातून वाडवडिलांविषयी कृतज्ञताच तो व्यक्त करतो. वासुदेवाच्या गीतात कृष्णकथा, पुराणकथा, संतमहिमा कथा, भक्तमहिमा कथा, अध्यात्म त्याचबरोबर बदलत्या समाजव्यवस्थेचे, कौटुंबिक नात्याचे चित्रणही येते. वासुदेवाच्या गीतांची निर्मिती समूहमनातून होत नसली तरी त्याच्या गीताचे आवाहन समूहमनाला असते. पुराणातील मूळ कथाबंध कायम ठेवून वासुदेव लौकिक जीवनाचे अनेक संदर्भ देऊन हा कथाबंध विकसित करीत असतो.

'दिपक नव्हे राम कुंकवा रे वाचून
अहेवपण नव्हे राम धन्या रे वाचून'

अशा ओळीतून स्त्रीच्या मनातील विविध भावना वासुदेव प्रकट करीत असतो. कोणा कोणा लेकीला माहेर नसते. तेव्हा तिची स्थिती नाजूक असते. गुरुशिवाय मानवाला दिशा नाही, मार्ग नाही असाही विचार तो सांगतो. शरीर हे नश्वर आहे तर आत्मा अमर आहे अशी भावनाही तो व्यक्त करतो.

'भावा - भावाचं दुश्मन बनं

सर्व पैश्याकडे माझं ध्यान

आत्मा गेला सोडून सर्व

जाशील जाशील

संगती काय नेशील'

अशी विविध भावभावनांची अभिव्यक्ती वासुदेवाच्या गीतातून झालेली दिसते.

८. सूचकता :-

वासुदेव अनेक गीते व कथागीते सादर करत असतो. यामधून त्याला काही ना काही सूचवायचे असते. श्रीयाळ-चांगुणा, कबिराची आतिथ्यशीलता यासारख्या कथागीतातून वचनाचे महत्त्व, मानवी मनाचा मोठेपणा व नीतीचे महत्त्व सूचित केलेले आहे. नशिबापेक्षा कर्मावर भरवसा ठेवा असा सूचक अर्थ त्याच्या अनेक गीतातून व्यक्त होतो. कथागीते पातिव्रत्यासारख्या मूल्यांचा आविष्कार करतात. या सूचकतेमुळेच लोकसंस्कृतीच्या जडणघडणीत वासुदेवाचेही योगदान आहे. वासुदेव हा गायक, उत्तम कथाकथनकार, लोकमानसाचे उत्तम ज्ञान असणारा, समाजजीवनाचे निरीक्षण करणारा एक लोककलावंत आहे. 'दानधर्म करा' असे म्हणताना इतरांना मदत करण्याची भावनाच तो सूचित करतो. नात्यांची महतीही तो गीतातून सूचित करतो. उदा. 'वैभव नव्हे राम भावा रे वाचून

बोळवण नव्हे राम माम्या रे वाचून'

दान देणा-या व्यक्तीला तो शेवटी आशीर्वाद देतो अन् गुरुचे महत्त्व अधोरेखित करतो.

'वासुदेव येगळा आशीर्वाद नाही

गुरु येगळा (वेगळा) मार्ग नाही'

९. दान पावते करण्याची पध्दती :-

वासुदेवाला दान मिळाल्यावर दान सर्व देवतांना तसेच दात्याच्या वाडवडलांना तो पावते करतो. यावेळेस तो टाळाच्या ठेक्यात अतिशय कलात्मक पध्दतीने गीत म्हणतो. देवदेवतांची नावे गुणगुणत टाळ व चिपळया तो वाजवितो. कधी अंगाभोवती हलकीच गिरकी घेतो. स्त्री सुपात धान्य, हळदीकुंकवाचा करंडा घेऊन येते. हळदी कुंकू वाहून धान्य झोळीत ओतते. दान मिळाल्यावर तो एखादे गीतही म्हणतो.

'गुणवंत सून गुणवंत देखिले

विठ्ठलराव बापूच्या नावाने देऊन

वासुदेवा म्हणून दान रे देऊन

चरण धरुन पाची रे बोटांनी

अन्नदान देऊन, शिधादान देऊन

रुपैदान देऊन, गहूदान देऊन

गायीदान देऊन, धनधान्य देऊन'

असे आवाहन करुन तो ते दान देवतांना पावते करतो.

'वडिलाच्या नावाने

अहो दान केले राव

दानधर्म पावन

जगदंबे नावानं

दान पावलं दान पावलं

भिमाशकंरी महादेवाला

कोल्हापुरात महालक्ष्मीला

पंढरपुरात विठु रायाला

जेजुरीमधी खंडेरायाला

आळंदीमधी ज्ञानदेवाला

देहुमधी तुकोबारायाला'

अशा पध्दतीने तो देवदेवतांना दान पावते करतो.

१०. स्थलविशिष्टता :-

वासुदेवाच्या गीतातून अनेक देवदेवतांचे स्थलवैशिष्टयांसह वर्णन येते. विविध तीर्थक्षेत्रे व तेथील प्रसिध्द दैवत यांची जोडी त्याच्या गीतातून येते. दान पावलं म्हणत असताना असे विविध तीथक्षेत्रे व दैवते यांचा उल्लेख करत तो ज्या गावात दान मागत असतो तेथील गावाचा व ग्रामदैवताचा उल्लेखही करतो. उदा. औंढयामध्ये नागनाथाले, परळीमध्ये वैजानाथाले,

आळंदीमध्ये ज्ञानेश्वराले, देहूमध्ये तुकारामाले, पंढरपुरात विठोबादेवाले, रुक्मिणी मातेले, पुंडलिक भक्ताले, रोहिदास कुंभाराले, गोरा कुंभाराले, नामदेव पायरीले, कान्होपात्राले गरुडखांबाले, शेगावमध्ये गजाननबुवाले, बामनगावाचे बोधलेबुवाले, तुळजापूरचे जगदंबा मातेले, कोल्हापुरात लक्ष्मीमातेले, तोरडीमध्ये हैबतबाबाले, अयोध्यामध्ये सीतामातेले, जेजुरीमध्ये खंडोबादेवाले, पैठणमध्ये एकनाथाले, गावच्या हनुमंता चौफेर, अशी विविध स्थलनामे व दैवतनामे तो घेत असतो.

१. आजच्या प्रश्नांविषयी जाणीवजागृती :-

वासुदेव आपल्या गीतातून आजच्या जीवनातील काही प्रश्नांची मांडणीही करत असतो. काही उपक्रमांच्या प्रसंगी तो त्या स्वरुपाची गीते पारंपरिक पध्दतीसारखी तयार करुन सादर करत असतो. रामकृष्ण मोरे सभागृह चिंचवड, पुणे येथे तिसरे अखिल भारतीय मराठी लोककला संमेलन भरले होते. या संमेलनाचे आमंत्रण वासुदेवांनी शहरवासियांना दिले होते.

"तेरा चौदा तारखेला, रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहाला

डोळे भरुन पाहू चला, महाराष्ट्राची ही लोककला"

अनेक निवडणुकीत मतदानाची टक्केवारी वाढावी म्हणून शासनस्तरावर वासुदेव पथकही नेमले जाते. मतदारांत जनजागृती व्हावी, मतदानाचे प्रमाण वाढावे, लोकांनी आपले मतदानाचे पवित्र कर्तव्य पार पाडावे या हेतूने वासुदेवाचे पथक जनजागृती व जाणीवजागृती करते.

"वासुदेव आला हो वासुदेव आला

मतदानाला चला, आता मतदानाला चला

घरी कोणी आता राहू नका

मतदानाचा हक्क प्रत्येकाने गाजवा"

हे गीत ऐकल्यानंतर बहुरुप्याच्या 'लग्नाला चला तुम्ही लग्नाला चला' या गीताची आठवण होते. काही ठिकाणी महानगरपालिकेच्या निवडणुकीत उमेदवारांच्या प्रचाराचे कार्य काही वासुदेवांनीही गीतातून केले. तसेच जुन्या परंपरा आणि नव्या तंत्रज्ञानाचा मेळ घालून उमेदवारांचा प्रचार करण्यासाठी काही खाजगी संस्थाही आता 'वासुदेव' कलाविष्काराची मदत घेत आहेत. "वासुदेव म्हणून गल्ली बोळातून फिरताना लोक आता संशयाच्या नजरेतून पाहतात. त्यामुळे पहाटे ऐवजी फिरण्यास वासुदेव भल्या सकाळी सूर्योदयानंतर बाहेर पडतो. वासुदेवाची गाणी म्हणण्याऐवजी आता आम्ही टाळ चिपळीच्या संगतीत जनजागरण करणाऱ्या कविता म्हणतो"[७] पारंपरिक गीताबरोबरच वासुदेवांनी परिवर्तनाची गाणी म्हणावी. आजचे प्रमुख प्रश्न उदा. प्रदूषण,

पर्यावरण, भ्रष्टाचार, अनीती, स्त्रियांवरील अत्याचार, अपघात, व्यसनाधीनता इत्यादींवर आधारित गीतरचना तयार करुन समाजजागृतीचे काम करावे.

## ४.३ समारोप :-

वासुदेवाची गीते अभ्यासल्यानंतर वरील काही महत्त्वाचे विशेष त्यांच्या गीतांची सांगता येतात. वासुदेवाच्या गीतातील विचारसौंदर्य, कल्पनासौंदर्य, सूचकता, शब्दवैभव, भावभावनांची अभिव्यक्ती, नीतिबोधाची शिकवण, स्थलविशिष्टता, जाणीवजागृतीचे कौशल्य इत्यादी विशेषांमुळे या गीतांची निर्मिती म्हणजे एका प्रतिभावंताचीच निर्मिती आहे, असे लक्षात येते. प्राचीन काळापासून अस्तित्वात असलेल्या वासुदेवास लोकजीवन व लोकसंस्कृतीत आगळेवेगळे स्थान आहे. लोकभाषेचा वापर, प्रसंगवर्णन, व्यक्तिवर्णन, गीतातील लालित्य आणि गीतांना नृत्य व संगीताची साथ लाभल्यामुळे ही गीते अधिक प्रत्ययकारी झालेली आहेत. सात्त्विक मनोवृत्तीचा व सद्विचाराचा प्रसारक म्हणून आजही त्याला लोकमानसात महत्त्वपूर्ण स्थान आहे. मात्र वासुदेवाची गाणी व कहाणी आता काळाआड जाऊन या कलेचे अस्तित्व संपणार आहे अशी खंत काही वासुदेवांनी प्रस्तुत अभ्यासकाजवळ व्यक्त केली. अभंगवाणी म्हणत गावाला जागे करणारी वासुदेवाची स्वारी पहायला मिळणे आता दुर्मीळ झाले आहे. वंशपरंपरा जपत वासुदेवाची कला जपणे व त्या माध्यमातून जनजागृतीबरोबरच कुटुंबाचा चरितार्थ चालविण्याचे काम वासुदेव अद्यापही करत आहेत. वासुदेवाला पूर्वी समाजजीवनात आदराचे स्थान होते.

संदर्भटिपा :-


१. डॉ.सुमती देशपांडे, '<u>मराठी - हिंदी भारुड काव्य एक अभ्यास</u>', प्र.आ., दिलीपराज प्रकाशन प्रा.लि., पुणे, २००५, पृ.६४ - ६५.

२. डॉ.दिनकर कुलकर्णी, '<u>मराठी लोककथागीत</u>', प्र.आ., गोदावरी प्रकाशन, औरंगाबाद, १९९८, पृ.१३५.

३. डॉ.विश्वनाथ शिंदे, '<u>लोकसाहित्यमीमांसा भाग पहिला</u>', प.आ., स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, १९९८, पृ.७८.

४. प्रस्तुत अभ्यासकाने संकलित केलेले वासुदेव सूर्यभान तारापुरे यांचे गीत. गीत क्र.-४.

५. प्रस्तुत अभ्यासकाने संकलित केलेले वासुदेव नितीन विधाते यांचे गीत. गीत क्र.-१०.

६. डॉ.रा.चिं.ढेरे, '<u>लोकसंस्कृतीचे उपासक</u>', पुर्नमुद्रण, पद्मगंधा प्रकाशन, पुणे, २०१५, पृ.१४.

७. वासुदेव महेश वाकुडे यांचे मनोगत, दै.पुढारी, अहमदनगर आवृत्ती, दिनांक १८ जानेवारी २०१९, पृ.४.

# प्रकरण पाचवे

## वासुदेव, लोककलेचे अभ्यासक व सामाजिक कार्यकर्ते यांच्या मुलाखती आणि निष्कर्ष

# प्रकरण पाचवे

## वासुदेव, लोककलेचे अभ्यासक व सामाजिक कार्यकर्ते यांच्या मुलाखती आणि निष्कर्ष

५.१ प्रास्ताविक

५.२ वासुदेवांच्या मुलाखती

५.२.१ वासुदेवांच्या मुलाखती व वर्तमानपत्रातून भेटलेले वासुदेव

५.२.२ वासुदेव महादेव सातपुते यांची मुलाखत

५.२.३ वासुदेव अमित विधाते यांची मुलाखत

५.३ लोककलेचे अभ्यासक डॉ.प्रकाश खांडगे यांचे विचार व मुलाखत

५.४ लोककलेचे अभ्यासक डॉ.रामचंद्र देखणे यांचे लोककलाविष्कार व वासुदेव याविषयक विचार

५.५ लोककलेचे अभ्यासक व सामाजिक कार्यकर्ते श्री भगवान राऊत यांचे विचार व मुलाखत

५.६ निष्कर्ष

५.७ समारोप

संदर्भटिपा

## प्रकरण पाचवे

## वासुदेव, लोककलेचे अभ्यासक व सामाजिक कार्यकर्ते यांच्या मुलाखती आणि निष्कर्ष

### ५.१ प्रास्ताविक :-

लोककला या वर्षानुवर्षे एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे लोकसंस्कृतीचे संवर्धन करत आलेल्या आहेत. लोककलांना प्रायोगिक मूल्य असते. संशोधन करत असताना लोकमनाच्या मनोरंजनाबरोबरच, प्रबोधनाचे व संस्कृती जतन करणारे वासुदेव यांच्या प्रत्यक्ष भेटी घेऊन मुलाखती घेतल्या. त्या माध्यमातून त्यांचे कार्य समजून घेता आले. लोककलेचे जाणकार अभ्यासक व लेखक डॉ.प्रकाश खांडगे व डॉ.रामचंद्र देखणे हे लोकसाहित्याचे व लोककलांचे व्यासंगी अभ्यासक आहेत. त्यांचे लोककला व वासुदेवविषयक विचार समजून घेतले व मुलाखत घेतली. लोककलावंताना मानधन मिळावे, लोककलांना व्यासपीठ उपलब्ध व्हावे या हेतूने कार्यरत असणारे सामाजिक कार्यकर्ते श्री.भगवान राऊत यांची मुलाखत घेतली. प्रस्तुत अभ्यासकाने चर्चा व मुलाखत या माध्यमातून त्यांच्या विचारांची मांडणी या प्रकरणात करुन काही निष्कर्ष मांडलेले आहेत.

### ५.२ वासुदेवांच्या मुलाखती :-

वासुदेव हा लोककलाकार गावातील लोकजीवनाशी एकरुप झालेला एक लोककलावंत आहे. लघुसंशोधनाचा आवश्यक भाग म्हणजे वासुदेवाची मुलाखत होय. यासंदर्भात महाराष्ट्रात क्षेत्रीय पध्दतीने अभ्यास करुन काही वासुदेवांच्या भेटी घेऊन मुलाखती घेतल्या. लोककलांचा अभ्यास व त्यासंदर्भात संशोधन म्हणजे परिश्रमपूर्वक केलेले प्रयत्न होय. "एखादे तत्त्व अथवा वस्तुस्थिती शोधून काढताना तसेच एखाद्या गोष्टीची निश्चिती करण्याकरिता केलेले परिश्रमपूर्वक अन्वेषण, काळजीपूर्वक चिकित्सापूर्ण चौकशी अथवा तपासणी म्हणजे संशोधन"[१] ही व्याख्या लोककलेच्या संशोधनासंदर्भात यथार्थ वाटते.

#### ५.२.१ वासुदेवांच्या मुलाखती व वर्तमानपत्रातून भेटलेले वासुदेव :-

प्रस्तुत अभ्यासकाने पुढील अभ्यासकांच्या भेटी घेऊन मुलाखती घेतलेल्या आहेत. त्याचबरोबर काही वर्तमानपत्रातूनही वासुदेव विषयक आलेल्या माहितीचे संकलन अभ्यासकाने केलेले आहे.

१. श्री. महादेव भानुदास सातपुते (उस्मानाबाद)

२. श्री. भैरव भानुदास सातपुते

३. श्री. बाबासाहेब भानुदास सातपुते

४. श्री. परशुराम भानुदास सातपुते

५. श्री. राजेंद्र गजेंद्र धुर्वे

६. श्री. नवनाथ उत्तम धुर्वे

७. श्री. मोहन उत्तम धुर्वे

८. श्री. लहू सातपुते

९. श्री. बालाजी अडसूळ

१०. श्री. राहुल धुर्वे

११. श्री. नितीन सूर्यवंशी

१२. श्री. संतोष देविदास कानडे (परळी वैजनाथ)

वरील सर्व वासुदेवांची भेट दि.१३/४/२०१८ रोजी चिंचवड येथील रामकृष्ण मोरे सभागृहात झाली. तिसरे अखिल भारतीय लोककला संमेलन तेथे आयोजित केले गेले होते.

त्याचबरोबर १) श्री सूर्यभान लक्ष्मणराव तारापुरे, श्रीकृष्णनगर, तरोडा ।।बु।।जि. नांदेड २) श्री. विठ्ठल संतुका कानडे ३) श्री शकंर जयवंतराव शेडगे ४) श्री. नरसिंग नागेंद्र घोगरे ५) श्री. उत्तम माणिक ढवळे यांचीही भेट व मुलाखत घेतली. यापूर्वी श्री. रखमा शकंर सुपेकर (मोशी, पुणे), श्री. अमृता शकंर वाघ (सटाणा, नाशिक) यांच्याही मुलाखती घेतलेल्या होत्या. श्री. ज्ञानदेव कौतिक जोशी (जामनेर गाव शृंगार ता.जामनेर, जि.जळगाव) यांचीही भेट झाली होती. श्री. अमित विधाते व नितीन विधाते या वासुदेव बंधूंचीही भेट झाली व मुलाखत घेतली. श्री. बापू गडई (मु.पो.भोकरखेकर, ता.श्रीरामपूर, जि.अहमदनगर), श्री. वामन रामभाऊ जाधव (औंढा नागनाथ) यांची भेट प्रत्यक्ष तसेच वर्तमानपत्रातूनही झाली. लोककलेचे संवर्धन करुन नीतिबोधाची शिकवण देणाऱ्या या सर्वच वासुदेवांनी बहुमोल सहकार्य केले. मुलाखतीतून त्यांचे जीवन, आजची परिस्थिती, लोककलेकडे समाजाचे व शासनाचे होणारे दुर्लक्ष आणि लोककलावंतांना अधिक मानधन मिळावे या अपेक्षा त्यांनी व्यक्त केल्या. प्रातिनिधिक स्वरुपात वासुदेव श्री. महादेव भानुदास सातपुते यांची व श्री. अमित विधाते यांची मुलाखत दिलेली आहे.

५.२.२ वासुदेव श्री. महादेव सातपुते यांची मुलाखत :-

[अभ्यासक प्रा.डॉ.सुभाष आहेर यांनी वासुदेव श्री. महोदव भानुदास सातपुते यांची घेतलेली मुलाखत. स्थळ - रामकृष्ण मोरे सभागृह चिंचवड, पुणे दि.१३/४/२०१८ सायं.६.००]

अभ्यासक - नमस्कार.

सातपुते - हां बोला नमस्कार.

अभ्यासक - आपले पूर्ण नाव व मूळ गाव याविषयी माहिती सांगा?

सातपुते - माझे नाव महादेव भानुदास सातपुते. मूळ गाव माझे उस्मानाबाद आहे.

अभ्यासक - किती वर्षापासून 'वासुदेव' म्हणून फिरतात?

सातपुते - आमची कुलपरंपराच आहे. अनेक वर्षापासून मी वासुदेव म्हणून महाराष्ट्रभर फिरतो.

अभ्यासक - आपले शिक्षण किती झाले आहे?

सातपुते - इयत्ता ७ वी पर्यंत शिकलो होतो.

अभ्यासक - घरी कोण कोण असते?

सातपुते - घरी आई, वडील, भाऊ असतात.

अभ्यासक - दररोज किती रुपये मिळतात?

सातपुते - २०० - ३०० रुपये मिळतात. कधी कधी फारच कमी मिळतात.

अभ्यासक - तुम्ही समाजाचे प्रबोधन कशा पद्धतीने करतात?

सातपुते - आम्ही व्यसनमुक्ती, पर्यावरण संवर्धन, झाडे लावा, झाडे वाचवा, मुलगी वाचवा याविषयीची गाणी गातो व प्रबोधन करतो.

अभ्यासक - तुमची पुढची पिढी पुन्हा 'वासुदेव' होऊन फिरणार का?

सातपुते - पुढच्या पिढीने आता शिक्षण घेऊन नोकरी करावी. या फिरण्यात आता काही राम नाही. पहिल्यासारखे लोक आता विचारत नाही.

अभ्यासक - शासनाकडून काय अपेक्षा आहेत तुमच्या?

सातपुते - शासनाने आम्हा कलाकारांना मानधन द्यावे. वृध्द कलाकारांना मानधन व पेन्शनची सोय करावी. शासनाच्या सवलती द्याव्यात. 'वासुदेव' या जमातीस आरक्षण मिळावे.

अभ्यासक - खेडयात व शहरात नेमका कोणता फरक तुम्हाला बघायला मिळतो?

सातपुते - खरं सांगू का? खेडयात आम्हाला अजूनही मान आहे. भल्या पहाटे गाव जागे झालेले असते. त्यामुळे थोडीफार दक्षिणाही मिळते. शहरात 'पाहिल्यानंतर' दारे लावून घेतात किंवा 'पुढे जावा' म्हणतात. तरी आम्हाला त्याचे वाईट वाटत नाही. कुलपरंपरा म्हणून आम्ही हे जोपासतो.

अभ्यासक - जेव्हा प्रबोधन व मनोरंजनाची काहीही साधने नव्हती तेव्हा तुम्ही लोककलावंतांनी फार मोठे काम केलेले आहे. त्याबद्दल तुम्हाला धन्यवाद व तुमचे आभार.

सातपुते - होय सर.

अभ्यासक - धन्यवाद, मी आपला आभारी आहे.

५.२.३ वासुदेव श्री अमित विधाते यांची मुलाखत :-

[अभ्यासक प्रा.डॉ.सुभाष आहेर यांनी वासुदेव श्री. अमित विधाते, ताथवडे, पुणे येथे दि.१८/११/२०१८ रोजी सकाळी ८.३० वाजता मुलाखत घेतली.]

प्रस्तुत अभ्यासक - नमस्कार भाऊ, नमस्कार.

विधाते - नमस्कार, बोला की..

अभ्यासक - काय झालं. माझा तुमच्याविषयी अभ्यास चालू आहे. हजारो वर्षापासून समाजाची तुम्ही सेवा करतात. तेव्हा टि.व्ही. नव्हती, दुसरी साधने नव्हती. तेव्हा खरे साधन वासुदेव. भल्या पहाटे वासुदेव अंगणात यायचा. दानधर्माचं महत्त्व सांगायचा. चांगलं वागायला सांगायचा. काय? बरोबर आहे ना?

विधाते - हो! हे बरोबर आहे.

अभ्यासक - आता हे तुम्ही किती वर्षापासून हे करतात सगळं?

विधाते - आता पहिल्यापासूनच ही परंपरा आमची.

अभ्यासक - आता वय किती आहे तुमचं?

विधाते - आता आसलं वय पंचवीस.

अभ्यासक - पंचवीस, बरं. म्हणजे तुमचे वडील, आजोबा सर्वच हे करत होते का?

विधाते - हो, हो.

अभ्यासक - तुमच शिक्षण वगैरे किती झालं?

विधाते - आमचं शिक्षण नाही झालं.

अभ्यासक - आता तुमची मुले वगैरे काय? पुढची पिढी हे करणार की थांबवणार?

विधाते – आता कसं आहे. सारी दुनिया बदलत चाललीय. आता पहिल्यासारखं राहयलं नाही काही. मग आता मुलांना घालू शाळमंदी. परंपरा जी होती आता ती थांबवू. मुलांना घालू आता शाळेत. इथनं पुढे नाही करणार.

अभ्यासक – आता तुम्ही रोज फिरतात शहरात आणि ग्रामीण भागात. काय फरक वाटतो तुम्हाला?

विधाते – कसं आहे. आपल्या खेडयावर थोडं वेगळं आहे. ग्रामीण भागात दानधर्म जास्त करतात. शहरात नाही तसं.

अभ्यासक – शहरात लोक भल्या पहाटे उठलेली असतात का? तुम्हाला तुमचा टायमिंग बदलावा लागला का?

विधाते – टायमिंग हां. पहिले आम्ही पहाटे चार वाजता फिरायला जायचो खेडयात. इकडे शहरात सात वाजता किंवा सहा वाजता जातो.

अभ्यासक – पहिल्यापेक्षा आता उशिरा जावं लागतं. मग दिवसभरात किती पोटापाण्यासाठी मिळतं.

विधाते – मिळते थोडसं पोटापुरतं.

अभ्यासक – पूर्वी तुमची गाणी ऐकली जायची? आता लोक गाणी ऐकतात का? लोक थांबतात का? मोबाईल चित्रपट यांचा परिणाम झाला का?

विधाते – हो... हो....हां. पहिल्यासारखी गाणी ऐकत नाहीत.

अभ्यासक – आता तुम्ही दोघे आहात ना?

विधाते – हो... मी अमित विधाते व माझा भाऊ नितीन विधाते आहे.

अभ्यासक – तुमच्या वेशभूषेविषयी थोडी माहिती सांगा?

विधाते – हे काय बघा ना तुम्हीच. डोक्यावर शंकूच्या आकाराची मोरपंखांची टोपी, टोपीला मोती किंवा मोत्यांच्या माळा, देवदेवतांची छोटी मूर्ती असते. कपाळी, गालावर, कानाच्या पाळीवर बुका व अष्टगंध, गळयात तुळशीच्या तीन चार माळा, गळयात अडकवलेली गळदावण व छोटी पिशवी, उजव्या हातात टाळ, डाव्या हातात चिपळया, केशरी रंगाचा घोळदार अंगरखा, पांढरे धोतर, गळयातून पुढे दोन्हीकडे सोडलेला शेला, कमरेला बांधलेला शेला त्यात खोवलेली बासरी, डाव्या खांद्यावर काखेत अडकवलेली केशरी रंगाची झोळी. अशी वेशभूषा.

अभ्यासक – शासनाकडून काही पैसे मानधन वगैरे मिळते का? ज्येष्ठ वृध्द कलावंतांनाा शासन मानधन देते.

विधाते – नाही, आम्हाला नाही मिळत.

अभ्यासक – दान पावलं, दान पावलं याच्यापेक्षा इतर कोणती गाणी तुम्ही म्हणता?

विधाते – म्हणतो की. पण आता ती कशी म्हणायची? आम्ही ती पहाटेच म्हणतो. बर ठीक आहे म्हणतो.

अभ्यासक – खरोखर समाजासाठी तुम्ही दोन चांगल्या गोष्टी सांगतात बरोबर आहे ना?

विधाते – हो. हो. लोकांनी चांगले वागावे अशीच आमची अपेक्षा आहे

अभ्यासक – आभारी आहे भाऊ, आपण मला तुमच्याविषयी महत्त्वाची माहिती दिली.

५.३ लोककलेचे अभ्यासक डॉ. प्रकाश खांडगे यांचे विचार व मुलाखत :-

डॉ. प्रकाश खांडगे यांना २०१७ चा केंद्र सरकारतर्फे दिला जाणारा संगीत नाटक अकादमी पुरस्कार प्राप्त झाला आहे. सध्या लोककला अकादमी अंतर्गत शाहीर अमरशेख अध्यासन प्रमुख असलेले डॉ.खांडगे १९७८ पासून संशोधन क्षेत्रात आहे. त्यांनी इंडियन नॅशनल थिएटर, लोककला संशोधन केंद्र, ज्येष्ठ नाटककार अशोक परांजपे आणि ज्येष्ठ संशोधक रा.चिं. ढेरे यांच्या मार्गदर्शनाखाली संशोधनाला सुरुवात केली. त्यांनी चीनमध्ये लोककला लोकसंगीत परिषदेचे चार वेळा प्रतिनिधित्व केले, तर सॅन होजे (अमेरिका) येथे विश्व मराठी साहित्य संमेलनातही व्याख्यान दिले. नॅशविलमध्ये अमेरिकन फोकलोअर सोसायटीमध्ये भारताचे प्रतिनिधत्व केले. याशिवाय ते राज्य आणि केंद्राच्या विविध सांस्कृतिक समित्यांवर कार्यरत आहेत. त्यांचा 'महाराष्ट्राच्या प्रयोगात्म लोककला परंपरा आणि नवता' हा ग्रंथ प्रसिद्ध आहे. डॉ. प्रकाश खांडगे हे प्रयोगरुप लोककलांचे सुप्रसिद्ध अभ्यासक आहेत. आपल्या जीवनातील फार मोठा काळ लोककला आणि लोककलावंत यांच्या सहवासात व्यतीत केलेला आहे. मुंबई विद्यापीठाच्या लोककला अकादमीचे ते अनेक वर्षे प्रमुख होते.

महाराष्ट्रातील लोककलांवर संशोधनपर लेखन करणारे, लोककलावंतांना सरकारतर्फे अनुदान मिळवून देण्यात त्यांनी महत्त्वाची भूमिका पार पाडलेली आहे. लोककलावंतांनी अनेक वर्षापासून मनोरंजनाबरोबरच लोकप्रबोधनाचे काम केले. ज्या कला स्थलकालसंवादी आणि कालसुसंगत अनुकूलन साधणाऱ्या असतात त्या टिकतात. अलीकडच्या काळात लोककलांना एक उपयुक्ततावादी दृष्टिकोन आला आहे. लोकसंवादाची ताकद आजही लोककलांमध्ये आहे.

[लोकसाहित्याचे अभ्यासक, लोकरंग सांस्कृतिक मंचाचे अध्यक्ष डॉ.प्रकाश खांडगे यांची प्रस्तुत अभ्यासकाने मुलाखत दि.१३/४/२०१८ रोजी घेतली]

अभ्यासक - नमस्कार सर. प्रथमतः मी आपले हार्दिक अभिनंदन करतो की, आपण पिंपरी चिंचवड महानगरपालिका, अखिल भारतीय नाटय परिषद पिंपरी चिंचवड आणि लोकरंग सांस्कृतिक मंचाच्या साहाय्याने तिसरे अखिल भारतीय मराठी लोककला संमेलन दि. १३ व १४ एप्रिल २०१८ रोजी चिंचवड येथे आयोजित केले.

डॉ.खांडगे - धन्यवाद. हे तिसरे संमेलन आहे.

अभ्यासक - यापूर्वीची दोन संमेलने कोठे घेतली होती?

डॉ.खांडगे - पहिले अखिल भारतीय मराठी लोककला संमेलन मुंबई येथे आयोजित केले होते. त्याचे अध्यक्षपद सुलोचना चव्हाण यांनी भूषविले होते. दुसरे संमेलन कराड येथे माझ्याच अध्यक्षतेखाली संपन्न झाले होते आणि आता हे तिसरे संमेलन डॉ.रामकृष्ण देखणे यांच्या अध्यक्षतेखाली चिंचवड येथे संपन्न होत आहे.

अभ्यासक - ही संमेलने कोण आयोजित करतो? याचा हेतू काय?

डॉ.खांडगे - लोकरंग सांस्कृतिक मंचाच्या वतीने व शासनाच्या सहकार्याने भारतीय स्तरावर लोककला संमेलन भरविण्यात येते. लोककलेचा तसेच लोककलावंतांचा गौरव व्हावा, कलामहर्षींचा गौरव व्हावा, तसेच महाराष्ट्राच्या अस्सल लोकसंस्कृतीचे दर्शन लोकांना व्हावे, त्याचबरोबर हा सांस्कृतिक वारसा टिकून रहावा आदी उद्देश लोककला संमेलने आयोजित करण्यामागे आहे.

अभ्यासक - लोकसाहित्याचा अभ्यास करताना आम्ही अभ्यासक डॉ.रा.चिं.ढेरे, डॉ.प्रभाकर मांडे, डॉ.गंगाधर मोरजे यांच्या ग्रंथांचा अभ्यास करतो. त्याचबरोबर प्रयोगात्म लोककलेचा अभ्यासक म्हणून डॉ.प्रकाश खांडगे ही ओळख झालेली आहे. आपण या अभ्यासाकडे कसे वळलात?

डॉ.खांडगे - माझे 'महाराष्ट्राच्या प्रयोगात्म लोककला' हे पुस्तक महाराष्ट्र शासनाने प्रकाशित केले आहे. पुण्यात फोटो झिंको मध्ये ते तुम्हाला मिळेल. ते तुम्ही निश्चित वाचा.पहिल्यापासूनच घरात वारकरी परंपरा होती. वडील कीर्तनकार होते. बालपणापासूनच संतपरंपरा व लोकपरंपरा यांचे संस्कार व अभ्यास होत गेला. पुणे जिल्हयातील नारायणगाव हे विठाबाईचे गाव त्याच्या जवळच माझे गाव. 'खंडोबाचे जागरण' या विषयावर मी पीएच.डी.केली. माझ्या प्रबंधास उत्कृष्ट प्रबंध म्हणून पुरस्कार मिळाला तसेच महाराष्ट्र शासनाचा उत्कृष्ट संशोधन ग्रंथ पुरस्कार प्राप्त झालेला आहे.

अभ्यासक - वासुदेव हजारो वर्षापासून प्रबोधनाचे काम करीत आहे. या वासुदेवाच्या परंपरेविषयी आपणास काय वाटते?

डॉ.खांडगे - काय झालं माहीत आहे का? हे सगळे लोककलावंत आहेत. यांना आजच्या काळाचे सामाजिक भान आलेले आहे. समाजातील समकालीन वेगवेगळे प्रश्न त्यांच्या कलाप्रकारातून मांडत आहेत. उदा. व्यसनमुक्ती, स्त्रीभ्रूणहत्या, साक्षरता प्रसार, स्त्रियांवरील अत्याचार इ. प्रश्न त्यांच्या गीतातून मांडलेले आहेत. त्यासंदर्भात ते समाजाचे प्रबोधन करतात.

अभ्यासक - आजच्या धावपळीच्या युगात लोककलांची काय स्थिती आहे?

डॉ.खांडगे - या लोककलांचे संवर्धन होणे ही काळाची गरज आहे. या लोककला म्हणजे लोकसंचित आहे. महाराष्ट्राच्या उभारणीत लोककलांचा आणि लोककलावंताचा मोठा वाटा आहे. लोकमनाचा आरसा म्हणजे या लोककला आहेत. त्यांचे जतन व संवर्धन होणे गरजेचे आहे. लोककलांची सामाजिक प्रासंगिकता व त्यांचे कालसुसंगत औचित्य हळूहळू कमी होत आहे. पूर्वीचा गावगाडा आता राहिलेला नाही.

अभ्यासक - वासुदेवाची लोककला व प्रबोधन याविषयी आपले काय मत आहे? उपासकांना विषय देऊन तुम्ही प्रबोधनाचे काही सांगतात काय?

डॉ.खांडगे - हो.हो. आता महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था, महाराष्ट्र राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळ या सगळया संस्था लोककलांच्या माध्यमातून प्रबोधनाचे काम करत आहेत. लोककलावंताच्या माध्यमातून अपेक्षित संदेश त्यांच्या कलेव्दारा समाजापर्यंत पोहचविला जातो. त्यामाध्यमातून समाजाचे प्रबोधन होत आहे. आजही जनसंवादाचे प्रभावी माध्यम म्हणून या लोककलेकडे पाहिले पाहिजे.

अभ्यासक - आपण लोककलावंतांना परदेशवारी घडवून आणली त्याचा तपशील थोडक्यात सांगा.

डॉ.खांडगे - होय, हे बरोबर आहे. १९८६ मध्ये पॅरीस येथे माया जाधव व राजारामभाऊ कदम यांना पाठविले होते. आयफेल टॉवर समोर भारत महोत्सवात त्यांचा कार्यक्रम सादर झाला होता. त्यानंतर विठ्ठल उमप यांना जपानमध्ये पाठविले होते. २०१४ मध्ये मी स्वतः तेरा लोकांचे पथक आंतरराष्ट्रीय महोत्सवासाठी चीन (किंगडॉन) येथे घेऊन गेलो होतो. त्यामुळे लोककला व लोककलावंतांकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलण्यास मदत झाली. परदेशात मात्र लोककलावंतांना व कलांना मोठया आस्थेने वागवले जाते. त्यांना मोठा दर्जा बहाल केलेला असतो.

अभ्यासक - लोककलावंतांच्या समाजाकडून तसेच शासनाकडून काय अपेक्षा आहेत?

डॉ.खांडगे - समाजानेही या कलासंवर्धनात पुढे आले पाहिजे. समाजाने या लोककलेकडे व लोककलावंतांकडे दुर्लक्ष करु नये. शासनाने लोककलावंतांना मानधन योजना सुरु केली आहे. ही जाणीव लोककलावंतांना करुन देणे महत्त्वाचे आहे.
लोककलावंतांनीही भविष्यासाठीची आर्थिक नियोजनाची घडी बसवावी. म्हणजे अखेरचे दिवस हलाखीत जाणार नाही.

अभ्यासक - बरोबर आहे सर. आपण माझ्यासाठी वेळ काढून मुलाखत दिली. प्रयोगात्म लोककलांचे सादरीकरण या विषयी आपला दांडगा व्यासंग आहे. या मुलाखतीचा मला निश्चितच लोककलांचा अभ्यास करताना उपयोग होईल. मी आपला आभारी आहे सर. धन्यवाद सर.

डॉ.खांडगे - ठीक आहे. अभ्यासासाठी शुभेच्छा!

५.४ लोककलेचे अभ्यासक डॉ.रामचंद्र देखणे यांचे लोककलाविष्कार व वासुदेव याविषयक विचार :-

प्रसिद्ध साहित्यिक, प्रवचनकार, वारकरी कीर्तनकार, लोककला व संतसाहित्याचे ज्येष्ठ अभ्यासक डॉ.रामचंद्र देखणे यांचा जन्म शिरुर तालुक्यातील कारेगाव येथे झाला. ललित, संशोधनात्मक, चिंतनात्मक अशा ५० पुस्तकांचे लेखन त्यांनी केलेले आहे. बहुरुपी भारुड व लोककलाविष्काराचे राज्यभरात त्यांनी अनेक प्रयोग केलेले आहेत. लोककलेच्या जाणकार अभ्यासकाबरोबरच ते लोककला अभिनीत करणारे एक कलावंतही आहेत. अमेरिका, दुबई व अन्य देशातही विविध उपक्रमांत त्यांचा सहभाग असतो. ते उत्तम अभ्यासक व वक्ते आहेत. पहिल्या ग्रामजागर साहित्य संमेलनाचे अध्यक्ष (राळेगणसिध्दी), बाराव्या राष्ट्रीय बंधुता साहित्य संमेलनाचे अध्यक्ष, चाळकवाडी (जुन्नर), कडोली - बेळगाव येथील २१ व्या मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष, अंमळनेर येथील पहिल्या साने गुरुजी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष, महाराष्ट्र साहित्य परिषदेचे २४ वे विभागीय साहित्य संमेलनाचे अध्यक्ष, महाराष्ट्र साहित्य सभा, इंदूर - १०० व्या अधिवेशनाचे अध्यक्ष, मराठी वाङ्मय परिषद बडोदे - ६८ व्या साहित्य संमेलनाचे अध्यक्ष, विटा येथील २९ व्या ग्रामीण मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष इ. संमेलनाच्या अध्यक्षपदावरुन त्यांची भाषणे अभ्यासपूर्ण झालेली आहेत. पिंपरी चिंचवड शहरात दि.१३ व १४ एप्रिल २०१८ रोजी तिसरे अखिल भारतीय मराठी लोककला संमेलनाचे अध्यक्षपद त्यांनी भूषविले. संशोधनाच्या माध्यमातून त्यांच्याशी लोककला व वासुदेव यांच्याविषयी अनेकदा प्रस्तुत अभ्यासकाने चर्चा केली. त्यातूनच लोककलेविषयी त्यांचा अभ्यास, व्यासंग व लोककलाकाराविषयी त्यांची तळमळ दिसून आली. त्यांच्या मते लोककलांनी आणि लोककलावंतांनी संस्कृती जतन करण्याबरोबरच सांस्कृतिक अभिसरण घडविण्यासाठी प्रयत्न केले आहेत. संतांनी महाराष्ट्राला ज्ञानसाक्षर केले. सुधारकांनी बुध्दिसाक्षर केले तर लोककलावंतांनी महाराष्ट्राला भावसाक्षर केले. या लोककलाकारांना केवळ लोककलाकार म्हणून नव्हे तर 'लोकसाहित्यकार' म्हणून प्रतिष्ठा मिळणे गरजेचे आहे. लोककलांचा राजाश्रय संपल्यामुळे समाजाने लोककलेकडे बघण्याची भूमिका

बदलणे आवश्यक आहे. लोककला जगवायच्या असतील तर हे लोककलाकार जगले पाहिजेत. त्यासाठी लोककलांना राजाश्रय मिळाला पाहिजे. आधुनिक कलांना लोककलांचा आधार घ्यावाच लागतो. साहित्य व लोककला यांचे अव्दैत नाते आहे. परंतु आज अनेक लोककलांचे प्रमाण कमी होत आहे. त्यांच्या मते "लोककलाकार शरीराने मनोरंजन करीत असले तरी मनाने प्रबोधन करत असतात. लोककलांच्या संवर्धनासाठी प्रयत्न व्हायला हवेत. स्वाभाविकता, स्वच्छंदता, तरलता आणि लोकाभिमुखता हे लोककलेचे गुण आहेत. लोकमनाच्या अभिव्यक्तीचे कलात्मक भावदर्शन म्हणजे लोककला होय" (संदर्भ - दै.महाराष्ट्र टाईम्स पुणे दि.१४ एप्रिल २०१८). महाराष्ट्राची लोककला म्हणजे मनोरंजनातून प्रबोधन घडविणारे अंगणाअंगणातील विद्यापीठ आहे. महाराष्ट्राच्या लोककला या निरुपण प्राधान्य आहेत. लोककलेची मौखिक परंपरा आता संहिताबध्द होणे आवश्यक आहे. लोककलांचे स्वतंत्र विद्यापीठ हवे. त्यांच्या मते, "लौकिक लोकजीवनातील प्रसंगांना अलौकिक आविष्कारांचे स्वरुप देऊन लोककलांनी समाजाला जागते ठेवले. आध्यात्मिक प्रबोधन आणि लौकिक लोकरंजन घडवीत लोकसंस्कृतीचे उत्कट दर्शन घडविणाऱ्या लोककला आज सर्वार्थाने संपुष्टात आल्या नसून, आपल्या मूळ परंपरेला बाधा न आणता विविध स्थित्यंतरातून वाटचाल करीत उभ्या आहेत. हे महाराष्ट्राच्या प्रभावी लोकसंस्कृतीचे द्योतक आहे, लोककलांचे संवर्धन व्हावे"(संदर्भ - दै. लोकमत पुणे, पिंपरी चिंचवड - दि.१४ एप्रिल २०१८)

महाराष्ट्रातील लोककला ही आपली ग्रामीण संस्कृती आणि परंपरा आहे. लोककलावंतांनी समाज जागता ठेवला. महाराष्ट्राच्या लोककला, लोकभूमिका व लोकसाहित्य यांच्यातून महाराष्ट्राच्या लोकसंस्कृतीचे दर्शन होते. महाराष्ट्राला समृध्द लोककलांचा वारसा मिळालेला आहे. डॉ.रामचंद्र देखणे यांच्या मते "लोककलांच्या लोकरंगात मराठी मनाचे भावदर्शनही अनुभवायला मिळते. उद्‌बोधन, मनोरंजन आणि प्रबोधन घडविणारी, लोककलेच्या अंगाने वेदान्ताला बोलीभाषेत मांडून नैतिकतेची मूल्ये जनमानसात रुजविणारी तसेच कळणारी भाषा आणि पेलणारे तत्त्व देणारी महाराष्ट्राची लोककला म्हणजे लोकरंजनातून प्रबोधन घडविणारे एक स्वतंत्र विद्यापीठ आहे. या लोककलांचे शरीर जरी मनोरंजनाचे असले तरी आत्मा हा प्रबोधनाचा आहे"[२] आजच्या अभिजात रंगभूमीचा जन्म लोकरंगभूमीतून झालेला आहे. मौखिक साहित्याच्या परंपरेतील लोकसाहित्याला नृत्य, नाटय, संवाद, संगीत, लोकभूमिका यांचा स्पर्श होतो. तेव्हा साहित्यातील लोकरंग, कलेच्या अंगाने आविष्कार घेत घेत लोककला जन्म घेते. महाराष्ट्राची प्रत्येक लोककला ही निरुपणप्रधान आहे. निवेदन, निरुपण, संवाद किंवा बतावणी सांगूनच कला सादर केली जाते. म्हणून लोककलेतील नृत्य, नाटय, गीत हा जरी मनोरंजनाचा भाग असला तरी त्यातील निरुपण, निवेदन, बतावणी यातून लोकमनाशी संवाद करीत सहजपणे प्रबोधन घडविले जाते. लोककलावंताचा लोकाश्रय संपला त्यामुळे त्यांना पोटासाठी इतर व्यवसायाकडे वळावे लागले. लोककला, लोकभूमिका, लोकनाटय यातून उभी राहिलेली एक समर्थ

लोकसंस्कृती हळूहळू लोप पावत चालली. "या लोककलांच्या संवर्धनासाठी पुढील गोष्टी आवश्यक आहेत"[३] (डॉ.रामचंद्र देखणे यांचे विचार)

१. लोककलावंतांनी लोकपरंपरेचे लौकिकीकरण करुन अभिजनांच्या परंपरेने समाविष्ट होणे आणि अभिजनांच्या परंपरेने लोककलांच्या कलाघटकांचा स्वीकार करणे या आदानप्रदानातून लोककलांचे बदलते स्वरुप समाजापुढे उभे राहील. हे निश्चित.

२. मूल्ये हरविलेल्या सांस्कृतिक ठेव्यापासून दुरावत चाललेल्या आधुनिकीकरणाच्या प्रक्रियेत आत्मकेंद्री बनलेल्या समाजमनाला आपली उदात्त संस्कृती, त्यातील सामाजिक मूल्ये, नैतिकता, मोकळेपणा, सामूहिक जीवनाची ओढ यासाठी मूळ स्वरुपाला बाधा न आणता नवे रुप धारण करुन 'नवा फॉर्म' घेऊन लोककलांनी पुढे यावे.

३. लोककलावंतांनी समाजाला जागते ठेवले, समाजाचे आध्यात्मिक उद्‌बोधन, सामाजिक प्रबोधन आणि लौकिक लोकरंजन घडविले.

४. लोककलांनी जीवनमूल्ये रुजविली व नैतिकतेचे धडे दिले.

५. संतांनी महाराष्ट्राला ज्ञानसाक्षर केले, सुधारकांनी बुध्दिसाक्षर केले तर लोककलावंतांनी महाराष्ट्राला भावसाक्षर केले. म्हणून त्यांना लोककलाकार म्हणून नव्हे तर लोकसाहित्यकार म्हणून प्रतिष्ठा मिळायला हवी.

६. लोककलाकारांकडे अभिजात कलाकाराच्या भूमिकेतून पाहिले पाहिजे. पोटार्थी कला व पोटार्थी कलावंत म्हणून उपेक्षाच होत आहे. पूर्वी या कलांना राजाश्रय व लोकाश्रय होता. आज कलेच्या अंगाने पोट भरणे अवघड झाले आहे. या लोककलांना राजाश्रय व लोकाश्रय दोन्ही मिळाले पाहिजे. शासनाच्या वतीने लोककला महोत्सव, दारुबंदी महोत्सव यासारख्या जनजागृतीच्या उपक्रमात अधिकाधिक कलाकारांना संधी मिळावी, शहराप्रमाणेच खेडयापाडयातही लोककला महोत्सव भरवावेत.

७. शासनाच्या वतीने दिल्या जाणाऱ्या वृद्ध कलाकारांच्या मानधनात वाढ करावी.

८. आज मनोरंजनाची साधने भरपूर उपलब्ध आहेत. टि.व्ही., फेसबुक, व्हॉट्स अप. परंतु तरीही लोकसंस्कृतीचा वारसा म्हणून या कला जपायला हव्यात. ही माध्यमे यांत्रिक स्वरुपाची आहेत. लोककला प्रेक्षकांशी संवाद साधणारी जिवंत कला आहे. त्यामुळे लोककलेचे संपूर्ण चित्रिकरण होणे आवश्यक आहे.

९. मौखिक संहिता लिखित स्वरुपात आणणे आवश्यक आहे.

१०. लोककलांच्या संदर्भात नव्याने संशोधन होणे गरजेचे आहे.

११. लोककलेकडे आता लोककलाशास्त्र म्हणून पहायला हवे. त्यासाठी लोककलांचे स्वतंत्र विद्यापीठ असायला हवे.

५.५ लोककलेचे अभ्यासक व सामाजिक कार्यकर्ते श्री भगवान राऊत यांचे विचार व मुलाखत :-

[लोककलेचे अभ्यासक व सामाजिक कार्यकर्ते श्री भगवान राऊत, शेवगाव, जि.अहमदनगर यांची प्रस्तुत अभ्यासकाने मुलाखत दि.२२/४/२०१८ रोजी घेतली]

अभ्यासक - नमस्कार, आपल्याविषयी थोडक्यात माहिती सांगा.

राऊत - नमस्कार, माझे नाव श्री भगवान राऊत, शेवगाव, जि.अहमदनगर. गेली २० वर्षापासून मी लोककलेचा अभ्यास करतो. तसेच लोककलावंतांच्या हितासाठी सामाजिक कार्य करतो. शासनाच्या योजना त्यांच्यापर्यंत कशा पोहचतील यासाठी प्रयत्न करतो.

अभ्यासक - लोककलेविषयी काही माहिती सांगा.

राऊत - साहित्य, संगीत, नृत्य या कला आहेतच. परंतु या व्यतिरिक्त २४ लोककला आहेत. त्यात पोतराज, पांगूळ, पिंगळा जोशी, त्याच्यानंतर वासुदेव आहे. किंगरीवाला, एकतारीवाला हे सुद्धा लोककलावंत आहेत. आता या सगळया लोककला दुर्लक्षित राहिल्या आहेत. या लोककलावंतांना फक्त मिरवणुकीपुरते स्थान. त्यांना स्टेज मिळत नाही.

अभ्यासक - तुम्ही लोककला व कलावंताचा 'प्रयोगात्म' स्तरावर प्रत्यक्ष अनुभव घेतलेला आहे. त्यांच्या वाद्यांविषयी तुम्ही माहिती सांगा.

राऊत - प्रत्येक लोककलावंताचे वाद्य वेगवेगळे आहे. वासुदेव बासरी किंवा टाळ, चिपळया इ. उपयोगात आणतो. पण समाजाला या लोककलांचा विसर पडत चालेला आहे. अनेकांना डक्कलवार हा लोककलावंत माहीतच नाही. डक्कलवार हे मांगांचे मागते, त्याचे वाद्य आहे ते किंगरी. ते अनेक अभ्यासकांना माहीत नाही. तीन भोपळे, बांबू, तारा अन् लाकडाचा मोर तयार करुन हा पारंपरिक डक्कलवार कलावंत हे वाद्य स्वतः तयार करतो. तीन वेगवेगळया आकाराचे भोपळे असतात. एकाच वेळेस त्या वाद्यातून तो डाव्या बोटाने तारा छेडतो म्हणजे तो किंगरी वाजवतो व उजव्या हाताच्या बोटाने तो लाकडी मोर नाचवितो अन् तोंडाने तो बसवपुराण गातो. एकाच वेळेस तीन क्रिया करणारा तो या लोकरंगभूमीवरील एकमेव कलावंत आहे. तरीही तो दुर्लक्षित आहे.

अभ्यासक - लोककलांचे भविष्य काय? भविष्यात त्या टिकतील का?

राऊत - खरं सांगू का? दिवसेंदिवस लोककला आता लोप पावत आहे. नगर जिल्हयात माझे गाव शेवगाव. नगर जिल्हयात १४ तालुके. फक्त एका तालुक्यात डक्कलवाराचे एक कुटुंब आहे. त्याच्यानंतर औरंगाबादमध्ये खुलताबाद येथे. जालन्यात जांभवळी अन् तुळजापूरमध्ये आहे. हाताच्या बोटावर मोजण्या - इतपत या कलावंताची स्थिती आहे. वासुदेवाचीही संख्या दिवसेंदिवस कमी होत आहे. खंडोबाचे जागरण व गोंधळ घालणारे कलावंतही संख्येने कमीच आहेत.

अभ्यासक - लोककलेकडे समाज कोणत्या दृष्टीने पाहतो?

राऊत - लोककलेकडे 'एक कला' व लोककलावंतांकडे 'एक कलावंत' म्हणून पाहिले जात नाही. लोककला या भीक मागण्याच्या कला आहेत या दृष्टीने समाज लोककलेकडे पाहतो. लोककलेकडे तुच्छतेने पाहिले जाते. शहरात तर महत्त्वच उरले नाही.

अभ्यासक - लोककलेकडे प्रबोधनाचे साधन म्हणून पाहता येईल का?

राऊत - होय. बरोबर आहे. खरे पाहता लोककलावंताने समाजाचे मनोरंजनच नाही तर प्रबोधन केले आहे. प्रबोधनासाठी या कलांचा वापर शासनस्तरावर होत आहे. उदा. माझ्या गावात महिला बचत गटाचे कार्यक्रम होते. पूर्वी पुणे मुंबईहून कलावंत बोलावले जाई. मी त्यांना स्थानिक कलावंतांना संधी देण्याची विनंती केली. ती मान्य झाली. मानधन फारसे देऊ नका पण या कलावंतांना व्यासपीठ द्या कारण त्यांची कला ही अस्सल कला आहे. झाडे लावा - झाडे वाचवा, मतदान जागृती पर्यावरण, स्वच्छता अभियान इ. संदर्भात लोककलावंतांनी आजही प्रबोधनाचे काम चालू ठेवलेले आहे.

अभ्यासक - लोककलेविषयी काही अंधश्रध्दा समाजात आहेत का?

राऊत - होय लोककला व लोककलावंतांविषयी अनेक अंधश्रध्दा समाजात आहेत. अहो स्मशानात बसलेला स्मशानजोगी मी स्टेजवर आणला होता. त्याच्याबद्दल खूप अंधश्रध्दा आहेत. उदा. तो बाळंतिणीची कवटी काढून नेतो, मूठ मारतो, तुमची तो माशी - गोमाशी बनवितो. त्याच्याजवळ जी घंटा असते. त्या घंटेत तो अनेक पोती धान्य साठवू शकतो आणि ज्या घरात बाळंतीण असेल त्या घरात जर तो भिक्षा मागावयास गेला तर घराची दारे बंद केली जातात. आणखी सांगायचे म्हणजे काही वर्षापूर्वी नागपूरमध्ये बहुरुपी - रायरंद साडया नेसले होते. तीन बहुरुप्यांची हत्या झाली होती. थोडक्यात पिंगळा जोशी, वासुदेव, देवीचे भुत्ये, पोतराज हे लोक काही जादूटोणा करतात. अशा स्वरुपाच्या अंधश्रध्दा या लोककलावंताबद्दल पाळल्या जातात.

अभ्यासक – या लोककलावंतांसाठी काही शासकीय योजना आहेत का?

राऊत – आहेत ना. त्यांच्यासाठी जी यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना आहे ती प्रभावीपणे प्रत्यक्षात राबविली जात नाही. शिक्षण, आरोग्य यासारख्या मुलभूत गरजाही भागवल्या जात नाहीत.

अभ्यासक – अन् लोककलावंताच्या मानधन योजनेचे काय?

राऊत – हो हो. आहे ना. महाराष्ट्र शासनाची ज्येष्ठ कलावंत मानधन योजना आहे. त्याची अंमलबजावणी योग्य व्हावी. पंचायत समितीपासून जिल्हा परिषद – समाजकल्याण खाते ते सांस्कृतिक संचालनालय या सर्वांनी ही योजना खऱ्या अर्थाने राबविली पाहिजे. बोगस प्रमाणपत्र काढून कोणीही लाभार्थी होत आहेत. संबंधितांनी त्या व्यक्तीची कला बघावी. खरा कलावंत दुर्लक्षित राहता कामा नये.

अभ्यासक – प्रामुख्याने योजनांचा लाभ कोणत्या अडचणींमुळे घेता येत नाही या कलावंतांना?

राऊत – अहो, या लोकांकडे कागदपत्रे नसतात. आधारकार्ड – रेशनकार्ड – पॅनकार्ड – मतदानकार्ड नाही. रहिवासी दाखला नाही. कारण हे मुळातच भटके कलावंत आहे. ते जेथे असतील तेथील अधिकाऱ्यांनी विचार केला पाहिजे. त्यांना लाभ मिळवून दिले पाहिजे. प्रसारमाध्यमांनीही या लोककलावंताचे प्रश्न शासनस्तरावर पोहचविले पाहिजे.

अभ्यासक – तुम्ही अभ्यासक व सामाजिक कार्यकर्ते म्हणून शासनाकडे या संदर्भात काही पाठपुरावा केला का?

राऊत – केला ना पाठपुरावा. १५ – २० वर्षापासून मी शासनाकडे या लोककलावंतांचे प्रश्न मांडतो आहे. सर्व लोककलावंतांची जनगणना होणे आवश्यक आहे. कलावंतांना मानधन मिळाले पाहिजे.

अभ्यासक – धन्यवाद देतो मी तुम्हाला. तुमच्यामध्ये या लोककलावंतांविषयी फारच तळमळ दिसून येते. मुलाखत दिल्याबद्दल मी आपला आभारी आहे.

राऊत – ठीक आहे सर.

५.६ निष्कर्ष :-

१. ज्यावेळी समाजात कसलीही प्रसारमध्यमे, मनोरंजनाची साधने नव्हती, अशावेळी भल्यापहाटे अंगणात येऊन नीतिबोधाची शिकवण व सद्वर्तनाच्या चार गोष्टी पुराणाचा आधार घेऊन वासुदेव या लोककलावंताने सांगितल्या.

२. अनेक वासुदेवांना भेटल्यावर असे जाणवले की, त्यांची कौटुंबिक व आर्थिक स्थिती हलाखीची होती. सर्वच वासुदेवांनी एक खंत व्यक्त केली ती म्हणजे, 'पूर्वीसारखा दानधर्म लोक आम्हाला करत नाही. तसेच परंपरागत चालत आलेला व्यवसाय पुढची पिढी करणार नाही. आमचा कुळधर्म पाळला जाणार नाही.'

३. राष्ट्रीय कार्यक्रमाचा प्रसार करण्यासाठी, पर्यावरण संवर्धन, मतदानजागृती, साक्षरता अभियान, अंधश्रद्धा निर्मूलन तसेच राष्ट्रीय प्रश्नासंबंधी जनजागृती करण्यासाठी वासुदेवाच्या लोककलेचा उपयोग करता येईल. त्यातून त्यांना मानधनही मिळेल.

४. क्षेत्रीय पध्दतीने लोककलावंतांचा अभ्यास करणे, त्यांची मुलाखत घेणे, त्यांची गीते ध्वनिमुद्रित करणे, ती लिहून काढणे या गोष्टी संशोधकास काळजीपूर्वक कराव्या लागतात.

५. लोककलेचे अभ्यासक डॉ.रा.चिं.ढेरे, डॉ.प्रभाकर मांडे, डॉ.गं.ना.मोरजे, डॉ.तारा भवाळकर, डॉ.प्रकाश खांडगे, डॉ.रामचंद्र देखणे, डॉ.विश्वनाथ शिंदे यांनीही यासंदर्भात मौलिक ग्रंथनिर्मिती केलेली आहे. परिश्रमपूर्वक अभ्यास करुन लोककला व लोककलावंत यांच्याविषयीची मते त्यांनी मांडलेली आहेत.

६. परंपरागत लोककला म्हणजे लोकसंचित आहे. या लोककलांचे जतन व संवर्धन होणे आवश्यक आहे. वासुदेवाच्या लोककलेकडे आजही जनसंवादाचे प्रभावी माध्यम म्हणून पाहिले पाहिजे.

७. लोककलांकडे आता लोकशास्त्र म्हणून पाहायला हवे, त्यासाठी लोककलेचे स्वतंत्र विद्यापीठ असायला हवे.

८. लोककलावंतांना शासकीय स्तरावरुन मानधन योजना राबविली जाते. त्याचा लाभ खऱ्या लोककलाकारास मिळाला पाहिजे. प्रसारमाध्यमांनीही या लोककलावंतांचे प्रश्न शासनस्तरावर पोहचविले पाहिजे.

९. पूर्वी वासुदेवासारख्या लोककलावंतांची लोक आतुरतेने वाट बघत व त्यास भरभरुन दानधर्म करत, आता तसे राहिलेले नाही.

१०. आधुनिक कला व लोककलांचा अतूट संबंध आहे. वासुदेवाची वेशभूषा, गीत सादरीकरण पध्दती, टाळ - चिपळया - बासरी वाजवणे व नृत्य अशा सर्व भूमिका चपखलपणे करणारा वासुदेव, त्याच्या लोककलाविष्कारात पथनाटयाचे दर्शन घडते.

## ५.७ समारोप :-

एक 'कुळाचार' म्हणून वासुदेव ही लोककला जोपासतात. पण आता पुढील पिढीचे जीवनमान सुधारण्यासाठी त्यांनी शिक्षण घेतले पाहिजे. तसेच शासकीय योजना, आरक्षण, शिष्यवृत्ती योजना इ. चा लाभ घेऊन पुढील पिढी सुशिक्षित झाली पाहिजे. नोकरी व्यवसायाकडे त्यांनी वळले

पाहिजे. कारण या परंपरागत लोककलेला पहिल्यासारखा लोकाश्रय व राजाश्रयही राहिलेला नाही. उलट या लोककलावंतांचे शब्दसंचित, गीते अधिकाधिक शब्दबध्द करुन, ध्वनिमुद्रित करुन हा वारसा जतन करुन ठेवला पाहिजे.

संदर्भटिपा :-


१. सदा कऱ्हाडे, 'संशोधन सिध्दांत व पध्दती', प्र.आ.,लोकवाङ्मयगृह, मुंबई, १९९७, पृ.६.

२. प्रकाशक श्री. भाऊसाहेब भोईर, स्मरणिका - तिसरे अखिल भारतीय मराठी लोककला संमेलन २०१८, डॉ.रामचंद्र देखणे यांचे अध्यक्षीय भाषण, श्री काशिका प्रिटींग प्रेस, चिंचवड, २०१८, पृ.१०.

३. तत्रैव, पृ. ३२ व ३३.


-------------- × --------------

परिशिष्टे-

१. क्षेत्रीय संशोधन करत असताना वासुदेव, लोककलेचे अभ्यासक, सामाजिक कार्यकर्ते यांची घेतलेली छायाचित्रे.

## लोककलेच्या अभ्यासकांच्या मुलाखती

| | |
|---|---|
|  |  |
| **लोककलेचे अभ्यासक डॉ.प्रकाश खांडगे व प्रस्तुत अभ्यासक** | **लोककलेचे अभ्यासक डॉ.प्रकाश खांडगे यांची मुलाखत घेताना प्रस्तुत अभ्यासक** |
|  |  |
| **लोककलेचे अभ्यासक डॉ.प्रकाश खांडगे यांची मुलाखत घेताना प्रस्तुत अभ्यासक** | **लोककलेचे अभ्यासक व सामाजिक कार्यकर्ते श्री. भगवान राऊत यांच्या समवेत प्रस्तुत अभ्यासक** |
|  |  |
| **लोककलेचे अभ्यासक डॉ.रामचंद्र देखणे यांच्या समवेत प्रस्तुत अभ्यासक** | **वासुदेवांसमवेत प्रस्तुत अभ्यासक व विद्यार्थी चंद्रकांत सोनवणे** |

# वासुदेवांच्या भेटी व मुलाखती

| | | |
|---|---|---|
|  |  |  |
| वासुदेव सूर्यभान लक्ष्मणराव तारापुरे | वासुदेव सूर्यभान लक्ष्मणराव तारापुरे | वासुदेव अमित विधाते |
|  |  |  |
| वासुदेव महादेव भानुदास सातपुते समवेत प्रस्तुत अभ्यासक | वासुदेवांसमवेत प्रस्तुत अभ्यासक | वासुदेव महादेव भानुदास सातपुते समवेत प्रस्तुत अभ्यासक व विद्यार्थी चंद्रकांत सोनवणे |
|  |  |  |
| वासुदेव अमृता शंकर वाघ | वासुदेव नितिन विधाते | वासुदेव रखमा शंकर सुपेकर |

# क्षेत्रीय भेटी

| | |
|---|---|
|  |  |
| **भोसरी- वासुदेवाचा लोककलाविष्कार** | **आळंदीतील वासुदेव भेट** |
|  |  |
| **चिंचवड-वासुदेव बाबासाहेब सातपुते व इतर वासुदेव प्रबोधन करताना** | **आळंदी- वासुदेव वामन रामभाऊ जाधव व इतर वासुदेव** |
|  |  |
| **पुणे- वासुदेव बापू गडई** | **बारामती-वासुदेव महेश वाकुडे** |

# वर्तमानपत्रातील वासुदेवदर्शन



लोकसंस्कृतीचे घडले दर्शन

चिंचवड येथील पट्ठे बापूराव कलानगरीत अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पिंपरी-चिंचवड शाखा, लोकरंग कला मंच आणि महापालिकेच्या वतीने आयोजित अखिल भारतीय तिसऱ्या मराठी लोककला संमेलनात ढोल-ताशांचा दणदणाट अखंड सुरु होता. ढोलकीच्या तालावर लावणीनेही ठेका धरला होता. आधी नमन माय मराठीला... असे मर्दानी शाहिरी गरजत होती. 'बये दार उघड' म्हणत, कडकलक्ष्मी अंगावर आसूड ओढून घेत होती. यासह विविध लोककलांचे सादरीकरण करण्यात आले.

दैनिक लोकमत पुणे (पिंपरी -चिंचवड)
दि. १४ एप्रिल २०१८



दान पावलं!

दैनिक लोकमत पुणे (पिंपरी -चिंचवड)
दि. १६ डिसेंबर २०१७



मतदानाला चला, आता मतदानाला चला...

'वासुदेव' करतोय जनजागृती; कव्वाली पथकेही सज्ज

कोई अपने वोट का पैसा न मांगे...

दैनिक सकाळ नाशिक दि. २१ मे २०१७



सकाळच्या पारी हरिनाम बोला।
वासुदेव आला हो वासुदेव आला।

हे स्वर कानी पडत आहेत. सिमेंटच्या जंगलातही लोककला जोपासली जात आहे. घरोघरी महिला परंपरेप्रमाणे सुपात धान्य देऊन वासुदेवाचे स्वागत करीत आहेत. पिंपरी येथे टिपलेले छायाचित्र.

दैनिक लोकमत पुणे (पिंपरी -चिंचवड)



**वासुदेव आला रे वासुदेव आला... :** 'वासुदेव करितो फेरा वाडियांत बाहेर दारा, कोणी कांही तरी दान पुण्य करो, जाब नेदा तरी जातो माघारा गा' या संत तुकोबारायांच्या रचनेप्रमाणे वासुदेवाचा फेरा आला. मात्र, आता वाड्यांची जागा सदनिकांनी घेतल्याने विकासनगर, किवळे येथील एका मोठ्या गृहसंकुलात आलेला वासुदेवाचा फेरा .

दैनिक लोकमत पुणे (पिंपरी -चिंचवड)



पोटासाठी गातो गाणी, ऐका वासुदेवाची कहाणी...

अशा चिंताक्रांत अवस्थेत बसलेल्या वासुदेवांच्या या भावमुद्रा टिपल्या आहेत छायाचित्रकार नीलेश कुलकर्णी यांनी.

दैनिक लोकमत पुणे (पिंपरी -चिंचवड)

२. सूची :-

अ) संदर्भग्रंथ सूची -

१. कर्वे इरावती, मराठी लोकांची संस्कृती, दु.आ., देशमुख आणि कं., पुणे, १९६२.

२. कऱ्हाडे सदा, संशोधन सिध्दांत व पध्दती, प्र.आ., लोकवाङ्मयगृह, मुंबई, १९९७

३. कुलकर्णी दिनकर, मराठी लोककथागीत, प्र.आ., गोदावरी प्रकाशन, औरंगाबाद, १९९८.

४. खंदारे साहेब, लोकसाहित्य शब्द आणि प्रयोग, प्र.आ., प्रतिमा प्रकाशन, पुणे, २००४.

५. ढेरे रा.चिं., लोकसंस्कृतीचे उपासक, पद्गंधा प्रकाशन, पुणे, १९९६.

६. ढेरे रा.चिं., लोकसंस्कृतीचे उपासक, पुनर्मुद्रण, पद्मगंधा प्रकाशन, पुणे,२०१५.

७. देखणे रामचंद्र, अंगणातील विद्यापीठ, प्र.आ., संस्कृती प्रकाशन, पुणे, २०१७.

८. देशपांडे सुमती, मराठी - हिंदी भारुड काव्य एक अभ्यास, प्र.आ., दिलीपराज प्रकाशन प्रा.लि., पुणे, २००५.

९. संपा.बाबर सरोजिनी, एक होता राजा, व्दि.आ., महाराष्ट्र राज्य लोकसाहित्य समिती, पुणे, प्रसिध्दी संचालनालय, महाराष्ट्र शासन, पुष्प दहावे, १९६५.

१०. भागवत दुर्गा, लोकसाहित्याची रुपरेखा, दु.आ.(सु.आ.), वरदा बुक्स, पुणे, १९७७.

११. भोसले द.ता., संस्कृतीच्या पाऊलखुणा, प्र.आ., पद्मगंधा प्रकाशन, पुणे, २००१.

१२. मांडे प्रभाकर, लोकरंगभूमी, प्र.आ., गोदावरी प्रकाशन, औरंगाबाद, १९९४.

१३. मांडे प्रभाकर, लोकसाहित्याचे अंतःप्रवाह, दु.आ., गोदावरी प्रकाशन, औरंगाबाद, १९९७.

१४. मांडे प्रभाकर, लोकसाहित्याचे स्वरुप, सहावी आ., गोदावरी प्रकाशन, औरंगाबाद, २०१७.

१५. मांडे प्रभाकर, लोकसाहित्याचे स्वरुप, तृ.आ., गोदावरी प्रकाशन, औरंगाबाद, १९९५.

१६. मोरजे गंगाधर, लोकसाहित्य आकलन आणि आस्वाद, दास्ताने रामचंद्र आणि कंपनी, पुणे, १९९३.

१७. संपा. वरखेडे र.ना., लोकसाहित्य, सु.आ., मुक्त विद्यापीठ प्रकाशन, नाशिक, २००४.

१८. व्यवहारे शरद, लोकवाङ्मय रुप - स्वरुप, प्र.आ., साहित्यसेवा प्रकाशन, औरंगाबाद, १९९१.

१९. व्यवहारे शरद, लोकसंस्कृतीचा अंतःप्रवाह, प्र.आ., प्रतिमा प्रकाशन, पुणे, १९९९.

२०. व्यवहारे शरद, लोकसाहित्य उद्‌गम आणि विकास, प्र.आ., विश्वभारती प्रकाशन, नागपूर, १९८७.

२१. शिंदे विश्वनाथ, लोकसाहित्यमीमांसा भाग पहिला, प्र.आ., स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, १९९८.

❖ वृत्तपत्रे :-

१. दैनिक महाराष्ट्र टाईम्स, पुणे आवृत्ती, दि.२३ जून २०१८, स्वप्निल जोशी यांनी डॉ.प्रकाश खांडगे यांच्याशी साधलेला संवाद.

२. दैनिक महाराष्ट्र टाईम्स, पुणे आवृत्ती, दि.२० मे २०१८ (रविवार संवाद पुरवणी), डॉ.प्रभाकर मांडे यांचे भाषण - 'लोककला परंपरा आणि नवता'.

३. दैनिक महाराष्ट्र टाईम्स, पुणे आवृत्ती, दि.१२ मे २०१८, डॉ.प्रकाश खांडगे लिखित डॉ.प्रभाकर मांडे यांच्या कार्याचा आढावा घेणारा लेख – 'लोकसाहित्याचा द्रष्टा संशोधक'.

४. दैनिक महाराष्ट्र टाईम्स, पुणे आवृत्ती दि.२० जून २०१८, दि.१४ मे २०१८, दि.६ मे २०१८, दि.१४ फेब्रुवारी २०१८.

५. दैनिक लोकमत, पुणे आवृत्ती (पिंपरी – चिंचवड), दि.२० एप्रिल २०१८, दि.१२ एप्रिल ते १५ एप्रिल २०१८, दि.१६ डिसेंबर २०१७, दि.३० जानेवारी २००४, दि.१३ नोव्हेंबर २००३, दि.११ ऑक्टोबर २००१.

६. दैनिक सकाळ, नाशिक आवृत्ती, दि.२१ मे २०१७.

७. दैनिक पुढारी, अहमदनगर आवृत्ती, दि.१८ जानेवारी २०१९.

स्मरणिका :-

१. प्रकाशक श्री.भाऊसाहेब भोईर, स्मरणिका – तिसरे अखिल भारतीय मराठी लोककला संमेलन २०१८, श्री काशिका प्रिटींग प्रेस, चिंचवड.

❖ कोश :-

१. भारतीय समाजविज्ञान कोश, संपा. व प्रका. स.मा.गर्गे, संचालक समाजविज्ञान मंडळ, पुणे, खंड – १, प्र.आ., १९८६.

२. मराठी विश्वकोश, संपा – तर्कतीर्थ श्री लक्ष्मणशास्त्री जोशी, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई, खंड – २, प्र.आ.१९७६.

❖ ध्वनिमुद्रित व हस्तलिखित गीते :-

प्रस्तुत अभ्यासकाने लोककलावंत वासुदेवांच्या भेटी घेऊन ध्वनिमुद्रित व संकलित केलेली गीते, त्यांच्या व अभ्यासकांच्या घेतलेल्या मुलाखती.

## ब) निर्देशसूची :-


१) ग्रंथनाम :- पृ.क्र.

पुराण १९,५०
बसवपुराण ६६
महाराष्ट्राच्या प्रयोगात्म लोककला परंपर आणि नवता ६०,६१
रामायण ११,२६
वेद ४९

२) व्यक्तिनाम :-

अनंतफंदी, २१
अनुसया, ३०,३१
अमृत, ४१
उमप, विठ्ठल, ६२
एकनाथ , १२,३१,५३
कदम, राजाभाऊ, ६२
कबीर, २६,४७,५१
कानिफनाथ, ३६
कान्हुपात्रा, ३०,३१,५३
कौशल्या, १९
खंडोबा , ६,१२,१६,३१,३९,५२,५३
खांडगे, प्रकाश, ५५,६०,६१,६९
गजानन, ३०,३१,५३
गंगा, १०
गिरिजा , ४१,४२
गोंविद, १९
चव्हाण, सुलोचना, ६१
चंद्रभागा, ३०,३७,३८
चांगदेव , १२
चांगुणा , १४,१५,२६,४६,५१
चिंधूभाऊ, ३९
छत्रपती शिवाजी महाराज, १०
जगदंबा , ३०,३९,५२,५३
जनाबाई, १५,२६,३४,४७
जाधव, माया, ६२
ढेरे, रा.चिं., ५,६१,६९
तारामती, १४,१५
तुकाराम, १२,२९,३१,३३,५२,५३
दुर्योधन , २०
देखणे, रामचंद्र, ५५,६०,६१,६३,६९
द्रौपदी, १४
नंद, १७
नामदेव, ३०,३१,५३
नारायणा, ३५,३६
परशुराम, ३०
पंढरीनाथ, ३५,३७,३८,४४
पांडुरंग , ३२,३४,३५,३७,३८
पुंडलिक, ३०,३१,३२,४८,५३
प्रवीण, ३९

| | |
|---|---|
| बळी, | २२ |
| भवानीमाता, | १२ |
| भवाळकर, तारा, | ६९ |
| भस्मासूर, | २० |
| भैरव, | ६ |
| मरीआई, | ६ |
| महादेव , | ६,१२,२७,३५,५२ |
| महालक्ष्मी, | १२,३०,५२,५३ |
| मारुती , | २३,३१ |
| मांडे, प्रभाकर, | ६१,६९ |
| मुरलीधर, | १७ |
| मुरारी, | १७ |
| मोरजे, गंगाधर, | ६१,६९ |
| यशोदा, | १६,१७ |
| राऊत, भगवान, | ६६ |
| राधा, | १६ |
| राम, | ११,१९,२१,२८ |
| रामदास, | १२ |
| रामजोशी, | २३ |
| रावण, | १९,५० |
| रुक्मिणी, | ३०,३१,४८,५३ |
| रेणुकामाता, | ३०,३१ |
| वाल्मिकी, | २९,३१ |
| विठुराय, | १२,१५,३०,३१,३२,३५,४४,४८,५०,५२,५३ |
| विठ्ठलराव, | २८,३१,५२ |
| शिंदे, विश्वनाथ, | ६९ |
| सत्यवान, | १४ |
| सहदेव, | १० |
| साईनाथ, | १२ |
| सावित्री , | १४,१५ |
| सीता, | ११,१९,५३ |
| श्रावणबाळ, | १५ |
| श्रीकृष्ण, | ६,१०,११,१४,१५,१६, १७,४६ |
| श्रीयाळ, | १४,१५,२६,४६,५१ |
| हरिश्चंद्र, | १४,१५ |
| हैबतबाबा, | ५३ |
| ज्ञानदेव, | १२,२९,३४,५२,५३ |
| **३) स्थलनाम :-** | |
| अयोध्या | ३०,५३ |
| अहमदनगर | ५६,६६ |
| आळंदी | २९,५२,५३ |
| उस्मानाबाद | ५५,५७ |
| औंढानागनाथ | २९,५२ |
| कराड | ६१ |
| काशी | २१ |
| कोल्हापूर | ३०,५२,५३ |
| चिंचवड | ५५,६१ |
| चीन | ६२ |

जपान ६२
जळगाव ५६
जालना ३०
जेजुरी ३१,५२,५३
तुळजापूर ३०,५३,६७
तोरडी ३०,५३
देहू २९,३१,५२,५३
नारायणगाव ६१
नाशिक ५६
नांदेड ३१,५६
परळी वैजनाथ २९,५२,५५
पंढरपूर १२,३०,३१,३२,३७,५२,५३
पुणे ६१
पैठण ३१,५३
पॅरीस ६२
भिमाशंकर ५२
मुंबई ६०,६१,६७
मोशी ५६
येरमाळा १२
वाळकी ३०
शनि शिंगणापूर ३९
शेगाव ३०,५३
श्रीरामपूर ५६
सज्जनगड २७
सटाणा ५६
सॅनहोजे ६०

४) विषयनाम :-

अधिष्ठान ५
अनौपचारिक ७
अलौकिकता ६
आदिम संस्कृती ५
आर्येतर ५
कुलाचार ६,६९
कृषिजीवन ५
धोंडामारी ३
नित्यनूतन ६,९,४६
नीतिबोध १,२,६,७,१०,२४,३४,४४,४६,४७,४९,५४,५६,६८
नीतिशिक्षण ७,४८
पापाचरण २१
पारलौकिक ४
पारंपरिक १,५,६,११,१२,२३,४७,५३,६६
प्रयोगात्मता ६,७,१४,२३,४६,६०,६६
प्रेक्षकसापेक्षता ८
बहुआयामी ३
भगत ५
भौतिक संस्कृती २,३,८
मनोभूमिका १

मुद्राविभ्रम ८
लोकगायक ५,६
लोकधर्मी ११
लोकमानस ५,५१
लोकविद्यापीठ १
लोकशिक्षक ८,११,१९,४८
लोकशिक्षण १,४७
लोकसंचित ४७,४८,६२
लोकसंवाद १,२
विधिनाटय ३,८
सदाचरण १८,१९,४३,४४
समाजप्रबोधन १,८
समूहभाव ४,८
संप्रेषण १
सादरीकरण ५,७,८,१४,२३,२६,६९
सौंदर्यदर्शन ४५,४९
सौंदर्यभावना ८


------------- ✕ -------------